जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मतदार एसआयआर मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करण्यात बीएलओ पर्यवेक्षकांची मोलाची भूमिका- आ. खोडके

## अमरावती तहसील कार्यालयात बीएलओ पर्यवेक्षकांची सभा

### कमी मॅपिंग करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना बजावणार नोटीस

अमरावती/प्रतिनिधी :-

मतदाराचे एकच ओळखपत्र असणे व त्याने एकाच मतदान केंद्रात नियमानुसार मतदान करणे अभिप्रेत आहे. त्यापार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम (एसआयआर ) प्रत्येक मतदार संघामध्ये राबविला जात आहे. त्याअनुषंगाने अमरावतीमध्ये निवडणूक विभागाकडून मतदार यादीच्या पडताळणी संदर्भातील कामकाजाबाबत अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी बीएलओ पर्यवेक्षकांची सभा घेऊन विस्तृत माहिती जाणून घेतली. अमरावती नवीन तहसील कार्यालय येथे झालेल्या निवडणूक विभागातील बीएलओ पर्यवेक्षकांच्या सभेला आ. सुलभा खोडके यांच्या समवेत महाराष्ट्र विधान परिषद सदस्य संजय खोडके , अमरावतीचे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर , अमरावती तहसीलदार विजय लोखंडे, नायब तहसीलदार (निवडणूक ) राजेश धवणे, नायब तहसीलदार सुनील रासेकर, निवासी नायब तहसीलदार डॉ. क्रिष्णा गाडेकर,



नायब तहसीलदार (महसूल ) टिना चव्हाण आदींसह निवडणूक विभागातील जवळपास ३१ बीएलओ पर्यवेक्षक यांची उपस्थिती होती.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम (एसआयआर ) अंतर्गत अमरावती मध्ये वर्ष २००२ च्या मतदार यादी सोबत सद्याची वर्ष २०२४ च्या मतदार यादीची पडताळणी करून मॅपिंग करण्यात येत आहे. यामध्ये मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ ) मार्फत ऑनलाईन पद्धतीने अथवा मतदारांच्या घरी जाऊन मॅपिंग केले जात आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात मतदारांचे जास्तीत जास्त मॅपिंग करण्याकरिता ३२२ बीएलओ कार्यरत असून त्यांच्या कडून सदरचे काम पूर्ण करून घेण्यासाठी ३१ बीएलओ पर्यवेक्षक नेमण्यात आले आहे. अमरावती मध्ये निवडणूक विभागाकडून मतदार यादीच्या पडताळणीचे काम जवळपास ५३ टक्के झाले असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी दिली.

तसेच मतदाराचे नाव २००२ च्या मतदार यादीत नसेल तर त्याचे आई-वडील, आजी-आजोबा यांचे नाव ECINET अँप द्वारे शोधून यांचे २००२ मधील मतदार संघ क्रमांक, मतदान केंद्र क्रमांक व अनुक्रमांक असा हा तपशील तपासून मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे. असेही यावेळी सांगण्यात आले.

दरम्यान सभेला उपस्थित सर्व बीएलओ पर्यवेक्षकांनी आपल्या अधिनस्त येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व त्यांनी मतदार यादी भाग प्रमाणे बुथवाईज केलेले मतदार मॅपिंग बाबत माहिती दिली. बहुतांश मतदार यादी भाग मध्ये ५० टक्के हुन कमी मॅपिंग झाले असल्याचे समोर आले असता आमदार महोदयांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या संदर्भात बीएलओकडून अपेक्षित काम होत नाही, ऑनलाईन नावे मिळत नाही तसेच घरोघरी गेल्यास मतदारांकडून प्रतिसाद मिळत नाही. अशा अनेक अडचणी येत असल्याबाबत पर्यवेक्षकांनी आमदार महोदयांना अवगत गेले.

यावर आ. सुलभा खोडके यांनी सुचित केले कि, मतदार यादी पडताळणी करण्याचे काम हे संबंधित मतदान केंद्रस्तर अधिकाऱ्यांच्या माध्यमातून पूर्ण होणे अपेक्षित आहे. यासाठी संबंधित पर्यवेक्षकांनी बीएलओ कडून सदरचे काम जास्तीत जास्त पणे पूर्ण करण्यात यावे, याबाबत प्रचार -प्रसारावर सुद्धा लक्ष देऊन मतदारांमध्ये जागृती करावी, तसेच ज्या बीएलओ चे मॅपिंगचे काम ५० टक्क्यापेक्षा कमी आहे, त्यांना नोटीस बजावून सदर प्रक्रिया गतीने पूर्ण करण्यासंदर्भात सुचना करावी, अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याबाबत सुद्धा बीएलओ यांना कळविण्यात यावे. अशा सुचना आ. सुलभा संजय खोडके यांनी बैठकीतून दिल्या.

निवडणुकांदरम्यान फेक मतदान व बोगस मतदान सारखे प्रकार होऊ नये म्हणून मतदाराचे एकच ओळखपत्र असणे व त्याने एकाच मतदान केंद्रात नियमानुसार मतदान करणे अभिप्रेत आहे. यासाठीच निवडणूक आयोगाने मतदार यादीचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम (एसआयआर ) राबविला आहे. त्याअनुषंगाने निवडणूक विभागाकडून मतदार यादीच्या पडताळणी संदर्भातील प्रक्रिया तातडीने व गतीने पूर्ण करण्यात यावी. अशी सूचना आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली. बैठकीला यश खोडके, यांच्यासमवेत अमरावती तहसील कार्यालय निवडणूक विभागातील कर्मचारी तसेच बीएलओ पर्यवेक्षक उपस्थित होते.

# बोरमध्ये वाघ 'गायब', प्रशासन 'झोपेत'

### शिवाजी'नंतर 'युवराज'ही बेपत्ता; व्याघ्र संरक्षणावर प्रश्नचिन्ह

**वर्धा/प्रतिनिधीः-** बोर व्याघ्र प्रकल्पातील ढिसाळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सन २०१२ पासून बेपत्ता असलेल्या बीटीआर-४ 'शिवाजी' या नर वाघाचा अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही, आणि आता बीटीआर-८ 'युवराज' हा दुसरा नर वाघही मागील दोन वर्षांपासून गायब असल्याचे उघड झाले आहे. दोन-दोन वाघ बेपत्ता होऊनही प्रशासन गप्प असल्याने वन्यजीव संरक्षणाच्या दाव्यांची पोलखोल झाली आहे.

बोर प्रकल्पात यापूर्वी बीटीआर-२ 'बाजीराव' या वाघाचा २०१७ मध्ये अपघाती मृत्यू झाला होता. त्यानंतर 'शिवाजी' बेपत्ता झाला. या प्रकरणी पाठपुरावा झाला, निवेदने दिली गेली, पण वन विभागाला काहीच साध्य झाले नाही. आता 'युवराज'ही गायब झाल्याने हा प्रकार अधिकच गंभीर बनला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, वाघांच्या नोंदीतही गोंधळ असल्याचे समोर आले आहे. 'युवराज' कोणत्या वाघिणीचा बछडा आहे, याबाबतच विसंगती दिसून येत आहे. त्यामुळे प्रकल्पातील माहिती व्यवस्थेवरच प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, 'शिवाजी'च्या अधिवासावर बीटीआर-१७ या नर वाघाने ताबा मिळविल्याचे दिसत आहे. बफर क्षेत्रात बीटीआर-१७ आणि बीटीआर-७ 'पिंकी' या वाघिणीचे दर्शन



वाघांचे संरक्षण म्हणजे केवळ आकडेवारी नाही. प्रत्येक वाघाचे अचूक निरीक्षण आवश्यक आहे. वाघ बेपत्ता होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.

**-संजय इंगळे** तिगावकर, मानद वन्यजीव रक्षक

पर्यटकांना झाले. मात्र 'युवराज'चा काहीच मागमूस नसल्याने संशयाचे सावट अधिक गडद झाले आहे.

**सफारीत वाघ दिसतात, पण 'युवराज'चा पत्ता नाही-** बोरच्या बफर क्षेत्रात पर्यटकांना वाघांचे दर्शन होत असले तरी 'युवराज' दोन वर्षांपासून गायब आहे. त्याच्या शोधाबाबत प्रशासनाने मौन बाळगल्याने अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. दोन नर वाघ बेपत्ता होऊनही बोर प्रशासन निष्क्रिय असल्याने वन्यजीवप्रेमींमध्ये संताप उसळला आहे. आता तरी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# कांदा विक्रीचे २ लाख लंपास करणारा चोरटा जेरबंद

### -गाडगेनगर गुन्ह्याचा उलगडा; ४.४५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतकऱ्याच्या कांदा विक्रीतून मिळालेल्या रोख रकमेवर डोळा ठेवत दुचाकीच्या डिक्कीतून २ लाख रुपये चोरणाऱ्या सराईत चोरट्याला गुन्हे शाखेने अटक केली आहे. आरोपीकडून रोख रक्कम, बुलेट मोटारसायकल व महागडा मोबाईल असा एकूण ४ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गाडगेनगर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार, फिर्यादीच्या वडिलांनी अंजनगाव सुर्जी येथून कांदा विक्रीचे २ लाख रुपये एसबीआय, राठी नगर शाखेत जमा करण्यासाठी दिले होते. फिर्यादीने ही रक्कम दुचाकीच्या डिक्कीत ठेवून बँकेसमोर गाडी उभी केली. बँकेत गर्दी आहे का हे पाहण्यासाठी ते आत गेले असता, अज्ञात आरोपीने संधी साधत डिक्की फोडून रोख रक्कम लंपास केली. या घटनेनंतर गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ तपास सुरू करत तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीचा माग काढला. तपासात आरोपीने गुन्ह्यासाठी बुलेट मोटारसायकलचा वापर केल्याचे स्पष्ट झाले. अखेर सापळा रचत मनकर्णा नगर येथून शंतनु गजानन पटोळे (वय २२) याला ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून २ लाख रुपये रोख, रॉयल एनफिल्ड बुलेट (क्र. एमएच-२७-ईई-६२१६) व आयफोन १३ असा एकूण ४.४५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी हा बँका व गर्दीच्या ठिकाणी पाळत ठेवून वाहनांच्या डिक्कीत ठेवलेली रक्कम चोरण्याची सवय असलेला सराईत गुन्हेगार असल्याचे उघड झाले आहे. विशेष म्हणजे, चोरीतून मिळालेल्या पैशातून तो जुगार खेळणे, महागड्या हॉटेलमध्ये राहणे व ऐशोआरामाची जीवनशैली जगत असल्याचेही तपासात समोर आले आहे. यापूर्वीही त्याच्यावर गाडगेनगर, राजापेठ व सिटी कोतवाली पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ, श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात स.पो.नि. मनीष वाकोडे, पोहवा सतीश देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, नाझीमोद्दीन सैय्यद, रणजित गावंडे यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

# सुनंदा मानकर यांना राज्यस्तरीय 'स्त्री सन्मान' पुरस्कार प्रदान




अमरावती/प्रतिनिधीः-

स्थानिक हिम सोसायटी (Humanity Education and Multipurpose Society), अमरावती यांच्या वतीने दिनांक २९ मार्च २०२६ रोजी महिला दिनाच्या औचित्य साधून आयोजित राज्यस्तरीय सन्मान सोहळ्यात सुनंदा मानकर (इंगळे)यांना 'राज्यस्तरीय स्त्री सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

श्रीमती मानकर या १९९५ पासून आरोग्य सेवेत कार्यरत असून त्यांनी आपल्या सेवाकाळात जिल्हा रुग्णालय गोंदिया, स्त्री रुग्णालय अमरावती, जिल्हा रुग्णालय अमरावती तसेच ग्रामीण रुग्णालय नांदगाव खंडेश्वर येथे उल्लेखनीय सेवा बजावली आहे. सध्या त्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अमरावती येथे सिनियर नर्सिंग ऑफिसर या पदावर कार्यरत आहेत.

आरोग्य क्षेत्रात त्यांनी केलेल्या उत्कृष्ट, समर्पित व उल्लेखनीय कार्याची दखल घेत हिम सोसायटीतर्फे त्यांना हा राज्यस्तरीय सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### बाहेरील मतदारांचा समावेश

होते. फार्म ६ चा चुकीचा वापर करून मतदार नोंदणी केल्याच्या आरोपावरून हे आंदोलन करण्यात आले. दरम्यान, यापूर्वीच विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी मुख्य निवडणूक अधिका-यांच्या कार्यालयाला भेट देत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरोधात त्यांनी अशांतता निर्माण केल्याचा आरोप केला होता, अशी माहिती एका वरिष्ठ पोलीस अधिका-याने दिली.

### देश नक्षलमुक्तीच्या शेवटच्या

रुपयांची विक्रमी मालमत्ता जप्त केली आहे. यात २.९० कोटींची रोख रक्कम आणि ११.१६ कोटी रुपये मूल्याचे ७.२० किलो सोने हस्तगत करण्यात आले आहे. तसेच एके-४७, एलएमजी, एसएलआर आणि इन्सास सारखी ९३ घातक शस्त्रेही पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत. २००४ मध्ये पीपल्स वार ग्रुप आणि माओइस्ट कम्युनिस्ट सेंटरच्या विलीनीकरणानंतर भाकपा (माओवादी ) हा पक्ष आकाराला आला होता. मुप्पाला लक्ष्मण राव उर्फ गणपतीच्या काळात ही चळवळ १७० जिल्ह्यांपर्यंत फोफावली होती. मात्र, २१ मे २०२५ रोजी नंबला केशव राव उर्फ बसव राजूचा खात्मा झाल्यानंतर या चळवळीच्या पडझडीला वेग आला. पोलिसांच्या वाढत्या दबावामुळे दुस-या फळीतील भूपती, देवजी यांसारख्या नेत्यांनी आधीच आत्मसमर्पणाचा मार्ग स्वीकारला आहे. सध्या नक्षलवाद्यांच्या पॉलिट ब्युरोमध्ये केवळ दोन सदस्य शिल्लक आहेत. यात ३.५ कोटींचे बक्षीस असलेला मुप्पाला लक्ष्मण राव उर्फ गणपती सध्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे नेपाळमध्ये लपल्याची शक्यता आहे, तर झारखंडचा रहिवासी असलेला मिशिर बेसरा बिहार-ओडिशा सीमाभागात सक्रिय असून त्याच्यावर १.५ कोटींचे बक्षीस आहे. यामुळे प्रशासनाला नक्षलमुक्तीसाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### ९० मिनिटे केवळ बडबड

काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) आणि भाजपच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारच्या काळात के. विजय कुमार हे गृह मंत्रालयात सुरक्षा सल्लागार होते. अतयंत प्रतिष्ठिक असलेल्या या पोलीस अधिका-याला यंदा पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी एका मुलाखतीत दोन दशकांतील नक्षलविरोधी रणनीती आणि कारवायांमध्ये असलेले सातत्य उघड केले. झारखंडच्या समृद्ध वनक्षेत्रात ऑक्टोबर २०११ मध्ये सुरू करण्यात आलेली सारंडा कृती योजना हा एक परिवर्तनकारी उपक्रम होता, ज्याने एक असे माडेल प्रदान केले जे इतरत्रही स्वीकारले गेले, असे ते म्हणाले होते, असे रमेश यांनी सांगितले. रमेश यांनी ऑक्टोबर २०११ मध्ये तत्कालीन झारखंडचे मुख्यमंत्री अर्जुन मुंडा यांना लिहिलेले आपले पत्रही समाज माध्यमावर प्रसारित केले. डिसेंबर २०२५ मध्ये लोकसभा अध्यक्षांविरुद्धच्या अविश्वास ठरावावर झालेल्या चर्चेदरम्यान गृहमंत्री अमित शहा यांनी आक्षेपार्ह शब्द वापर होता.

### 'जय श्री राम'च्या घोषणा

त्याचे नाव, वडिलांचे नाव, वय आणि पत्ता विचारतो. यानंतर तो मुलीशीही बोलतो. यानंतर ऋषभ ठाकूर मुलाला म्हणतो की, तुम्हाला अनेकदा समजावून सांगितले आहे की लव्ह जिहाद करायचा नाही. यानंतर ऋषभ मुलाचा कड्डलर पकडून त्याला अनेक थप्पड मारतो. नंतर त्याला खाली जमिनीवर बसवतो आणि जय श्री राम म्हणायला सांगतो. तो चप्पलने मारत म्हणतो- बोल, प्रत्येक मुलगी माझी बहीण आहे. यानंतर तो मुलाला लाथा-बुक्क्यांनी मारू लागतो. ऋषभवर आरोप आहे की, त्याने त्या तरुणाला जीवे मारण्याची धमकीही दिली. तसेच त्याला धमकावले की, जर त्याला पोलिसांकडे जाण्यापासून वाचायचे असेल, तर त्याला पैसे द्यावे लागतील. भीतीपोटी त्या तरुणाने ऋषभ ठाकूरला ९ हजार रुपये दिले.

### इराणचा अमेरिकेला मोठा

इंटेलिजन्स यांचा प्रभावी वापर केला आहे. हे तंत्रज्ञान फक्त स्वतंत्रपणे काम करत नाही, तर ते एका महाकाय 'इंटेलिजन्स नेटवर्क'चा भाग आहे.

**माहितीचे संकलन** -या प्रणालीचा कणा म्हणजे 'डेटा'. अमेरिकन यंत्रणा विविध माध्यमांतून अफाट माहिती गोळा करत आहे.

**AI द्वारे माहितीचे विश्लेषण -**गोळा झालेली माहिती इतकी प्रचंड असते की ती माणसांना वेळेत तपासणे शक्य नसते. येथे AI महत्त्वाची भूमिका बजावते. हजारो फोटोंमधून संशयास्पद हालचाली किंवा बदलांचे पॅटर्न ओळखणे. मानवी विश्लेषकांपेक्षा हजारो पटीने वेगाने माहितीवर प्रक्रिया करून लष्करी नियोजनकर्त्यांना सद्यस्थितीची स्पष्ट फोटो देणे.अचूक लक्ष्यांचा शोध -या तंत्रज्ञानामुळे अमेरिकेला आपले लक्ष्य अधिक अचूकपणे निवडता येते. मग ते शस्त्रास्त्रांचे साठे असोत, कमांड सेंटर्स असोत किंवा फिरती लष्करी वाहने. AI च्या मदतीने त्यांचा अचूक मागोवा घेतला जातो.

### ट्रम्प यांचा 'विनाशकारी'

वाटाघाटी सुरू आहेत आणि त्या अधिक तीव्र होत आहेत, परंतु हा संघर्ष केवळ राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या अटींवरच संपेल, असेही ते म्हणाले.दरम्यान, जनरल डॅन केन यांनी सांगितले की, अमेरिकी सैन्य इराणच्या लष्करी क्षमता सातत्याने नष्ट करत आहे. 'आम्ही त्यांच्या नौदलातील १५० हून अधिक जहाजे नष्ट केली आहेत, ज्यात सर्व जमरान-श्रेणीच्या फ्रिगेट्सचा समावेश आहे. आम्ही त्यांच्या संरक्षण औद्योगिक तळावर एक मोठी मोहीम राबवत आहोत, ज्यात कारखाने, गोदामे, अण्वस्त्र संशोधन आणि विकास प्रयोगशाळा, तसेच त्यांची युद्धक्षमता पुन्हा उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा समावेश आहे.

### उधारीच्या पैशासाठी अपहरण

विशाल वैद्य (वय ३२, आंबेडकर वार्ड, गणेशपुर, भंडारा) आणि कपिल महेश वाधवानी (वय २७, नेहरू वार्ड, भंडारा) असे अटकेतील आरोपींची नावे आहे.

माहितीनसार अपहृत भारत उंबरकर यांची सासरवाडी भंडारा असल्यामुळे ते काही वर्ष तिथे राहिले होते. त्यांनी एक वर्षांपूर्वी आरोपी अखिलेश वैद्य याच्याकडून २ लाख ५० हजार रुपये उसने घेतले होते. ही रक्कम हळूहळू चुकते करण्याचे त्यांनी म्हटले होते. पण गेल्या काही दिवसा पासून ते पैसे देत नसल्यामुळे अखिलेश वैद्य आणि उंबरकर यांच्या मध्ये भंडारा येथे वाद झाला. वाद झाल्याने भारत अमरावतीत परत आले. यामुळे आरोपी अखिलेश वैद्य संतापला आणि तो त्याच्या एका सहकारी महेश वाधवानी याला घेऊन अमरावतीला आला. सोमवारी २९ मार्चच्या रात्री भारत जेव्हा वडील अशोक सोबत दुचाकीने घरी जात होता. त्यावेळी आरोपीनी गोड बाबा मंदिर जवळ त्यांना थांबवले आणि भारतला उचलून घेऊन गेले. या प्रकरणाची तक्रार त्यांचे वडील अशोक उंबरकर यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात दिली होती. पोलिसांनी प्रकरणाची गंभीरता पाहून गुन्हा दाखल केला आणि दोन पथक आरोपींच्या शोधासाठी पाठवले. तांत्रिकी दृष्ट्या तपास केल्यावर आरोपींचे लोकेशन भंडारा जिल्ह्यात मिळाले. यावरून पोलिसांनी तेथे जाऊन दोन्ही आरोपींना अटक करून भारत उंबरकर यांची सुटका केली.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठचे ठाणेदार पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात डीबी पथक प्रमुख पीएसआय मिलिंद हिवरे, मनीष करपे ,सागर भजगवरे ,रवी लिखितकर, पंकज खटे यांनी कारवाई केली.

### पिकअप दरीत कोसळल्याने

रामचरण जांभेकर (वय २०), अस्मिता रामेश्वर जांभेकर (वय १६), ममता राजेश्वर कासदेकर (वय २६) यांच्यासह इतर मजूर जखमी आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहे. माहिती नुसार, लवादा गावातील सर्व मजूर मंगळवारी सकाळी टरबूज आणि खरबूज तोडणीच्या कामासाठी जात होते. सकाळी ते घरून निघाले होते. लवादा गावाजवळ अलई नदीच्या पुलावर चालकाचे पिकअप वरून नियंत्रण सुटले आणि त्यामुळे वाहन दरीत कोसळले. यात समाया सावरकर आणि मालती भिलावेकर यांचा जागीच मृत्यू झाला तर ६ मजूर जखमी आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमींना तातडीने धारणी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या मार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, ओव्हरलोडिंग किंवा तांत्रिक बिघाडामुळे हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

**आमदार केवलराम काळे पोहचले रुग्णालयात-** घटनेची माहिती मिळताच मेळघाटचे आमदार केवळराम काळे उपजिल्हा रुग्णालयात पोहोचले. त्यांनी जखमी रुग्णांशी संवाद साधला आणि त्यांना मदतीचे आश्वासन दिले. या मार्गावर सुरक्षा व्यवस्था करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

### शिवसेना शिंदे गटात

यवतमाळ ,वाशिम हे त्यांचे कार्यक्षेत्र राहणार आहे. माजी खासदार आनंदराव अडसूळ व माजी आमदार अभिजीत अडसूळ यांना पदावरून हटविल्यानंतर शिंदे सेनेमध्ये हे परिवर्तन करण्यात आले आहे. यामुळे जोरदार चर्चा रंगलेली आहे. चर्चेनुसार मनपा निवडणुकीमध्ये शिवसेना शिंदे गटाने चांगले प्रदर्शन केले नाही. तीन जागा पार्टीला या निवडणुकीत मिळाल्या. नेत्यांचे यामध्ये कोणतेही योगदान नव्हते. तसेच नंदुरबार जिल्हयात माजी आमदार गिरीश चौधरी, धुळे सचिन भाऊसाहेब चौधरी, जळगाव जिल्हयात आमदार दिलीप लांडेंसह इतरांवर पार्टीने जबाबदारी सोपवली आहे.

### बंद घरातून ३.९८ लाखांचा

हजार रोख, १८ ग्रॅमचा सोन्याचा हार किंमत ७५ हजार, १० ग्रॅमची सोन्याची माळा किंमत ४५ हजार, ३ अंगठ्या किंमत २७ हजार, सोन्याचे कानातले किंमत १८ हजार, चांदीची पायल असा एकूण ३ लाख ९८ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.या प्रकरणात गाडगे नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तिथे जाऊन पंचनामा केला. आरोपींना शोधण्यासाठी परिसरात लागलेले सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत आहे.

### चाकू घेऊन दहशत निर्माण

प्रमुख राहुल महाजन, योगेश श्रीवास, मनोज कालबांडे, जयेश परिवाले, अखिल दळवी यांनी केली.

### कत्तलीसाठी जाणाऱ्या आठ

३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे , मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक सागर रोकडे, आकाश शिवणकर, संतोष तेलंग, निरंजन आमटे ,रुपेश चंडिकापुरे, अक्षय इंगोले , किशोर सुने यांनी केली.

### विधानसभा प्रमुखपदी

बीएलए विधानसभा प्रमुखपदी सतीश शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. सतीश शर्मा यांनी आपल्या नियुक्तीचे श्रेय आमदार प्रविण तायडे तसेच भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांना दिले आहे.

### कंत्राटी शिक्षक बेमुदत

आंदोलन करीत आहेत,त्यांच्या मागण्या न्याय आहेत, त्यांच्या मागण्या प्रशासनाने पूर्ण कराव्यात. मेळघाट सारख्या अति दुग्रम भागात हे शिक्षक कंत्राटी म्हणुन मानधनावर काम करत आहे.त्यांनी सेवेत नियमित करण्याची रास्त मागणी केली आहे.त्यांच्या मागण्या तात्काळ मार्गी लागाव्या म्हणुन जिल्हा परीषद यांनी शासनाकडे शिफारस करावी अशी भूमिका यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जि.अमरावती च्या वतीने मांडण्यात आली.यावेळी अजयानंद पवार (जिल्हाध्यक्ष) राजेश सावरकर (राज्य प्रसिद्धी प्रमुख) व शैलेंद्र स.दहातोंडे (जिल्हा सरचिटणीस) उपस्थित होते.

**दहा शिक्षक साखळी उपोषणात सहभागी-** सोमवार पासुन सुरु झालेल्या कंत्राटी शिक्षकांच्या आंदोलनात दुसऱ्या दिवशी दहा शिक्षक साखळी उपोषणाला बसले आहे.या मध्ये रितेश शिंद,अविनाश उदापुरे,सागर सुर्यवंशी, विशाल हगवणे,राहुल सोनार,मंगेश आठवले, सिमा बानो शाहा,प्रियंका चोपडे,सरिता राऊत,दिपक मेमणकर यांचा सहभाग आहे.

**विविध पदाधिकारी यांची उपोषण मंडपाला भेट-** या आंदोलनाला अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे,अखिल महाराष्ट्र संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कीरण पाटिल,संतेदू अभ्यंकर,समाज कल्याणचे ज्ञानबा कुंड,मंगेश खेरडे,दत्ता भेले,रविकीरण सदानशिव,मुरलिधर डहाने यांनी भेट देऊन आंदोलनाला पाठींबा दिला.आंदोलनात मेळघाट मधिल कार्यरत कंत्राटी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित आहे.

### कुऱ्हा परिसरात अवकाळी

मागणी समीर ढांगे यांनी केले आहे.

शेतकरी शेतात कर्जबाजारी होऊन आपली शेती पेरतो. काढणीच्या अगदी तोंडावर वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडातील घास हिरावून नेला आहे. काही शेतकऱ्यांच्या शेतातील गव्हाचे पीक अक्षरशः जमीनदोस्त झाले असून त्यातून त्यांना उत्पादन अर्ध्यावर आल्याची शक्यता नाकारता येत नाही.

ऐन कांदे काढणीच्या वेळेस अवकाळी पाऊस आल्यामुळे कांद्याचे नुकसान होण्याचे शेतकऱ्यांना दिसून येत आहे. ३० मार्च रोजी झालेल्या वादळामुळे अक्षरशः आंबा व संत्रा मोठ्या प्रमाणात गळती झाली आहेत.हवामान विभागाने आणखी पाऊस आणि वादळ येण्याची शक्यता असल्याचे सांगितले आहे.त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, १ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# रिसोड पोलिसांची धडाकेबाज कामगिरी : सशस्त्र आंतरजिल्हा टोळी गजाआड

## तीन गुन्हे उघडकीस; ३.५७ लाखांचा मुद्देमाल जप्त

*रिसोड : रिसोड पोलीस स्टेशनने जबरी चोरीच्या गुन्ह्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत सशस्त्र आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश केला आहे. विविध ठिकाणी घडलेल्या तीन गंभीर गुन्ह्यांचा उलगडा करत पोलिसांनी एकूण ३ लाख ५७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.*



दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी दत्ता नामदेव उगले (रा. बिबखेडा शेतशिवार, मोठेगाव, ता. रिसोड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २३ डिसेंबरच्या रात्री त्यांच्या शेतातील घरात घुसून तीन अनोळखी व्यक्तींनी चाकूचा धाक दाखवत कुटुंबीयांकडील सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल व रोख रक्कम असा एकूण ८१ हजार रुपयांचा ऐवज लुटला होता.

तसेच १० मार्च २०२६ रोजी विकास विश्राम जायभाये (रा. चाकोली, ता. रिसोड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चार अनोळखी आरोपींनी त्यांच्या घरात तसेच शेजारील आसाराम पोटे यांच्या घरात घुसून चाकूचा धाक दाखवत दागिने, मोबाईल व रोख रक्कम असा सुमारे ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरीने चोरून नेला होता.

या दोन्ही गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या मदतीने दोन आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणांहून अटक केली. चौकशीत त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल, गुन्ह्यात वापरलेले शस्त्र, जिवंत काडतूस व पल्सर मोटारसायकल असा एकूण ३ लाख ५० हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याशिवाय २९ मार्च २०२६ रोजी रिसोड येथील चाफेश्वर चौकातील किराणा दुकानातून ७५०० रुपयांचे तीन कॅन चोरी करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अवघ्या दोन तासांत अटक करून मुद्देमाल हस्तगत केला.


या कारवाईमुळे पीडित शेतकरी व शेतमजुरांमध्ये समाधान व्यक्त होत असून पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले जात आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अनुज तारे (IPS), अपर पोलीस अधीक्षक लता फड, सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदिप अग्रवाल (IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, ग्रेड पोउपनि कदीर खाँ पठाण, पोलीस हवालदार मंगेश मालवे, निलेश तायडे, पोलीस अंमलदार रवि अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे, रवि इरतकर, अमोल हाके, सायबर सेलचे पोलीस अंमलदार अभिनव वाघाड यांनी केली आहे.

# जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुकीत विश्वनाथ पाटील ताथोड यांचा विजय

■ प्रतिनिधी | कारंजा ■

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अत्यंत चुरशीच्या निवडणुकीत श्री. विश्वनाथ पाटील ताथोड यांनी दमदार कामगिरी करत उल्लेखनीय विजय संपादन केला. मतमोजणीदरम्यान शेवटपर्यंत उत्कंठा कायम राहिली असून अखेर त्यांनी २८ मते मिळवत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. या निवडणुकीत त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी श्री. दिगंबर पाटील वानखडे यांना २५ मते, तर सौ. कानकिरड यांना ८ मते मिळाली. याशिवाय १ मत अवैध ठरले. एकूण निकाल पाहता ही निवडणूक अत्यंत अटीतटीची झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

या निवडणुकीत श्री. विश्वनाथ पाटील ताथोड यांची उमेदवारी ही आमदार तथा सभापती कृ. ऊ. बा. स. कारंजा (लाड) सईताई डहाके पुरस्कृत उमेदवारी होती. श्री विश्वनाथ पाटिल ताथोड यांच्या विजयाने आमदार सईताई डहाके यांच्या मार्गदर्शनात प्रथमतः



सहकार क्षेत्रातील भाजपाने महत्वाचे पद काबीज केले आहे, हे येथे उल्लेखनीय आहे. विश्वनाथ पाटील ताथोड यांनी यापूर्वी जिल्हा परिषद मनभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आपल्या कार्यकौशल्याचा ठसा उमटविला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण जनसंपर्क, सामाजिक बांधिलकी आणि प्रामाणिक कार्यपद्धतीमुळे मतदारांनी पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. ताथोड यांचे व्यक्तिमत्त्व मितभाषी, संयमी आणि अभ्यासू म्हणून ओळखले जाते. वादापासून दूर राहून विकासाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. याच गुणांच्या बळावर त्यांनी मतदारांची मने जिंकण्यात यश मिळवल.

विश्वनाथ ताथोड यांच्या विजयाची बातमी समजताच त्यांच्या मूळगावी धानोरा ताथोड त्याचप्रमाणे कारंजा येथे आनंदाचे वातावरण निर्माण झाले. समर्थकांनी फटाके फोडून, मिठाई वाटून आणि जल्लोष करत विजय साजरा केला.

### सहकार क्षेत्रातील पाठबळ निर्णायक

या विजयामागे सहकार क्षेत्रात प्रभाव असलेल्या आमदार सईताई प्रकाशदादा डहाके, माजी नगराध्यक्ष दत्तराजजी डहाके, तसेच स्व. प्रकाशदादा डहाके मित्र मंडळ आणि सहकाऱ्यांचे भक्कम पाठबळ लाभल्याचे मानले जात आहे. एकूणच, शांत, संयमी आणि विकासाभिमुख नेतृत्वाच्या बळावर विश्वनाथ पाटील ताथोड यांच्यारूपाने विजय मिळवत सहकार क्षेत्रात डहाके परिवाराने आपले वर्चस्व पुन्हा अधोरेखित केले आहे.

# शिवछत्रपती तरुण मित्र मंडळ व हिंदवी परिवाराच्या वतीने श्रमदान व स्वच्छता मोहीम



■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजीक कार्यात अग्रेसर असलेल्या शिवछत्रपती तरुण मित्र मंडळ, हिंदवी परिवार, आपत्ती व्यवस्थापन पथक व पतंजली परिवाराच्या वतीने मुर्तीजापुर तालुक्यातील पुंडलिकनगर येथील पुंडलीकबाबांचा जन्मोत्सव व यात्रा कार्यक्रमात २५ मार्च रोजी श्रमदान व स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संदेश दिला.

यावेळी गाजीपूर, सालतवाडा, किन्ही रोकडे तसेच वाशिम येथील छत्रपती नगरातील महिला भजनी मंडळांनी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरणात भजन सादर केले. पहाटे पाच वाजता योगगुरू डॉ. भगवंतराव वानखेडे यांनी सकाळी पाच ते सात या वेळेत योग वर्ग घेतला. भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आरोग्यदायी उपक्रमाचा लाभ घेतला. त्यानंतर चहापान झाल्यावर स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली. सुमारे तीन तास चाललेल्या या मोहिमेत कार्यकर्ते व भाविकांनी मंदिर परिसरातील प्लास्टिक, कागद, उष्टावळ, प्लास्टिक ग्लास, चमचे व इतर कचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला. श्रमदानातून स्वच्छतेचा आदर्श घालून देत 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश देण्यात आला.

# हळद काढणी पश्चात व्यवस्थापन तंत्रज्ञानावर मार्गदर्शन प्रशिक्षण संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व नवचैतन्य शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ मार्च रोजी सावरगाव जिरे, ता. जि. वाशिम येथे प्रगतिशील शेतकरी गजानन लक्ष्मण नागुलकर यांच्या शेतावर 'हळद काढणी पश्चात तंत्रज्ञान' या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर.एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गंगाराम पडघान उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती म्हणून सेवा सहकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष सोपान पाटील तसेच उपसरपंच बबन सावळे यांनी सहभाग नोंदविला. तांत्रिक मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्रातील उद्यानविद्या तज्ञ निवृत्ती पाटील व नवचैतन्य



शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी श्री. कृष्णा मानवतकर उपस्थित होते.

प्रशिक्षणादरम्यान निवृत्ती पाटील यांनी हळद पिकाच्या काढणीची योग्य अवस्था, काढणीची वैज्ञानिक पद्धत, उकळणी, वाळवणी, पॉलिशिंग यांसारख्या काढणी पश्चात प्रक्रिया तंत्रज्ञानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी योग्य बेणे निवड, मातृकंद वापरण्याचे महत्त्व, तसेच साठवणूक व्यवस्थापन यावरही विशेष भर देण्यात आला. यावेळी कृष्णा मानवतकर यांनी हळद पिकातील एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, मृदा स्वास्थ्य सुधारण्यासाठी जिप्समच्या वापराचे महत्त्व, तसेच उत्पादन व गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक कृषी तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात सरपंच गंगाराम पडघान यांनी शेतकऱ्यांनी काढणी पश्चात तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास हळदीची गुणवत्ता सुधारून बाजारात अधिक दर मिळण्यास मदत होईल, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक इडोळे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार सुनील कोल्हे यांनी मानले.

## जिल्हा परिषद पदोन्नती प्रक्रियेवर नागपूर उच्च न्यायालयाचा स्थगनादेश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व उच्च श्रेणी मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रियेवर नागपूर खंडपीठाने अंतरिम स्थगनादेश दिल्याने जिल्ह्यातील शिक्षकवर्गात मोठी खळबळ उडाली आहे.

जिल्हा परिषद शिक्षण विभागाने दि. १२ मार्च २०२६ रोजी काढलेल्या पत्रानुसार केवळ टीईटी उत्तीर्ण शिक्षकांनाच पदोन्नती प्रक्रियेत समाविष्ट करण्यात आले होते. यामुळे अनेक सेवाज्येष्ठ शिक्षक तसेच सीटीईटी परीक्षा दिलेल्या शिक्षकांना या प्रक्रियेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर संबंधित शिक्षकांनी या निर्णयावर आक्षेप घेतला होता. मात्र, प्रशासनाकडून याबाबत कोणताही ठोस निर्णय न झाल्याने शिक्षकांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला.

# महावीर जयंतीनिमित्त मालेगाव नगरपंचायतीत भक्तिमय वातावरणात पूजन सोहळा



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

नगरपंचायत कार्यालयात जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या जन्म कल्याणक उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे यांच्या हस्ते भगवान महावीरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विधिवत पूजन करण्यात आले.

या प्रसंगी उपाध्यक्ष महादेव खवले, नगरसेवक सनी घुगे, अभी घुगे, अंकुश गुजरे, संजय सारडा ,उदय तोंडे, विशाल बनचरे यांच्यासह नगरपंचायतचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तसेच जैन समाजातील मंगलचंद बांडे, तुषार कान्हेड, अनिल गोरे, आशिष डहाळे, धीरज कान्हेड, नितीन कान्हेड, प्रफुल टिकाईत, प्रदीप सावले आदी मान्यवरांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमादरम्यान भगवान महावीरांच्या अहिंसा, सत्य व शांतीच्या संदेशाचा जागर करण्यात आला असून उपस्थितांनी त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन करण्यात आले.

# मनसे सदस्य नोंदणी अभियानाला प्रतिसाद



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) सदस्य नोंदणी अभियानाला वाशिम जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जोरदार मोहीम राबविली आहे. दि. २९ मार्च रोजी वाशिम शहरात जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे आणि जिल्हा सचिव गजानन वैरागडे यांच्या नेतृत्वात सदस्य नोंदणी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या अभियानामागील मुख्य उद्दिष्ट मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या नेतृत्वाला बळकटी देणे तसेच विदर्भातील वाशिम जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे हे आहे. कार्यक्रमादरम्यान कार्यकर्त्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत पक्षाच्या विचारसरणीची माहिती दिली आणि नव्या सदस्यांना पक्षात सामील होण्यासाठी प्रोत्साहित केले.

या वेळी वाशिम तालुकाध्यक्ष विठ्ठल राठोड, शहर उपाध्यक्ष गजानन इंगोले, आकाश लोलप, महाराष्ट्र सैनिक गजानन पाटील, निखिल बुरकुले, शिवाभाऊ इंगोले यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाभरातील कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत अभियानाला यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

यावेळी राजू पाटील किडसे आणि गजानन वैरागडे यांनी सांगितले की, 'राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मनसे महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी व मराठी माणसाच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देत आहे. वाशिम जिल्ह्यातील युवकांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने या अभियानात सहभागी व्हावे, जेणेकरून विदर्भात मनसेची ताकद अधिक भक्कम होईल.'

# भीम जयंतीच्या मिरवणुकीस पोलीस संरक्षण द्यावे; आझाद समाज पार्टीचे पोलीस अधिक्षकांना निवेदन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भीम जयंतीच्या मिरवणुकीस पोलीस सरंक्षण देण्यात यावे . अशी मागणी आझाद समाज पार्टीचे विदर्भ अध्यक्ष उमेश हिवराळे यांच्या नेतृत्वात अतिरिक्त पोलिस अधीक्षक लता फड यांना एका निवेदनाव्दारे करण्यात आली आहे . वाशीम जिल्ह्यातील सोनखास या गावातील भीम जयंतीच्या मिरवणुकी दरम्यान कुठलाही तणाव होऊ नये यासाठी पोलिस संरक्षण देण्यात यावे, अशा आशयाचे निवेदन देण्यात आले . यावेळी पोलिस अधीक्षक यांनी योग्य तो पोलिस बंदोबस्त पुरवू असे आश्वासन दिले . यावेळी आझाद समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रा, सुभाष अंभोरे, जील्हा कार्याध्यक्ष दिलीप कंकाळ , जिल्हाउपाध्यक्ष बाळासाहेब भगत, माजी प्राचार्य गोविंद राऊत, तालुका अध्यक्ष किशोर खडसे, शहर अध्यक्ष विजय पट्टेबाहद्दुर , संविधान ढोले, मिलिंद सरकटे, आझाद समाज पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष संजय पडघान यांच्यासह आझाद समाज पार्टीचे बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते .

# दहा हजार भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

## आमली बारस निमित्त ढवळेश्वर संस्थांनचा उपक्रम

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा आमली बारस निमित्ताने मालेगाव शहराचे आराध्य दैवत ढवळेश्वर संस्थान येथे दहा हजार भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ घेतला आहे.

ढवळेश्वर संस्थान येथे भागवत सप्ताह निमित्त भव्य महाप्रसादाच्या आयोजन सोमवार दिनांक ३० मार्च रोजी करण्यात आले होते या वेळी प्रसाद वाटप बारी पद्धतीने देण्यात आला. त्यावेळी सोंहम गिरी महाराज शिरपूर यांच्या हस्ते प्रसाद वाटपाला सुरुवात झाली त्यावेळी पोळी २१ क्विंटल ची आणि भाजी दहा क्विंटलची वांग्याची असा ३१ क्विंटल चा प्रसाद वाटप केला.



ढवळेश्वर संस्थान येथे २३ एप्रिल पासून तीस मार्च पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व संगीतमय भागवत कथा चे आयोजन करण्यात आले होते.

त्यावेळी कथा वाचक म्हणून भागवताचार्य अर्चनाताई निबोकार अकोला यांनी भागवत वाचन केले या सप्ताहात वेगवेगळे दिग्गज व महान कीर्तनकार यांची दररोज आठ ते दहावाजेपर्यंत कीर्तन झाली होती त्यामध्ये संदीप महाराज पाटील विजय महाराज गवळी ऋषिकेश महाराज सौभागे किरण महाराज शिंदे माऊली महाराज भिमटे अमोल महाराज घुगे तसेच गजेंद्र महाराज कावरखे यांचे काल्याचे किर्तन दिनांक ३० रोजी सकाळी झाले असून दुपारी चार वाजता पासून भव्य महाप्रसाद वाटप करण्यात आला या महाप्रसादाचा लाभ परिसरातील सर्व भाविक भक्तांनी घेतला आहे. परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते.

# २१ एप्रिल रोजी पासपोर्ट मोबाईल व्हॅन शिबिर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पासपोर्ट अर्जदारांना घराजवळच सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय, नागपूर यांच्या वतीने २१ एप्रिल रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, काटा रोड, वाशिम येथे प्रायोगिक पासपोर्ट मोबाईल व्हॅन शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या एकदिवसीय शिबिरासाठी २० ऑनलाइन अपॉइंटमेंट्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाल्यास, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, काटा रोड, वाशिम येथे हे शिबिर दर आठवड्याला आयोजित करण्यात येणार आहे.

या शिबिरात नवीन पासपोर्ट तसेच पुनर्निर्गमन (Re-issue) पासपोर्ट अर्ज स्वीकारले जाणार आहेत. मात्र, तत्काळ (Tatkaal) अर्ज, पीसीसी अर्ज तसेच कागदपत्रांच्या अभावामुळे किंवा इतर कारणांमुळे प्रलंबित असलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

अर्जदारांनी www.passportindia.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज भरावा, विहित शुल्क भरावे आणि 'नियोजन भवन, कलेक्टर ऑफिस, काटा रोड, वाशिम' येथे पासपोर्ट मोबाईल व्हॅनसाठी अपॉइंटमेंट बुक करावी. त्यानंतर निश्चित केलेल्या तारीख, वेळ व स्थळी अर्जदारांनी मूळ कागदपत्रे व स्व-साक्षांकित छायाप्रतींसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्याठिकाणी कागदपत्र पडताळणी, छायाचित्रण आणि बोटांचे ठसे घेण्यात येतील. आवश्यक कागदपत्रांची माहिती जाणून घेण्यासाठी अर्जदारांनी संकेतस्थळावरील आणि इतर मार्गदर्शक लिंकचा वापर करावा.

# शेंडीने गाडे ओढण्याचा नवस फेडण्यासाठी भाविकांची गर्दी

## - हजारो भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ
## - भर पाऊसात देखील भाविक-भक्तांचा उत्साहात कायम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील र. नं. ५०१ 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून ओळख असलेल्या ईचा-नागी येथील श्री क्षेत्र महादेव संस्थान येथे सोमवार, दि. ३० मार्च रोजी बारस उत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात संपन्न झाला. 'हर हर महादेव' च्या जयघोषात पार पडलेल्या या यात्रेला जिल्हाभरातून हजारो भाविकांनी उपस्थिती लावली.

यावेळी उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरले ते तब्बल ५१ क्विंटल महाप्रसादाचे भव्य आयोजन. दुपारी १ वाजल्यापासून महाप्रसादाचे वितरण सुरू झाले आणि संपूर्ण दिवस भाविकांनी मोठ्या प्रमाणावर याचा लाभ घेतला. हजारोंच्या संख्येने उपस्थित भाविकांसाठी संस्थानच्या वतीने उत्तम नियोजन करण्यात आले होते.

महाप्रसादासाठी मोठ्या प्रमाणावर भोजन व्यवस्था करण्यात आली होती. थंड व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय, बसण्याची सुसज्ज



व्यवस्था आणि स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला होता. या सर्व व्यवस्थेसाठी सुमारे १००० महिला-पुरुष स्वयंसेवकांनी अहोरात्र सेवा बजावली, ज्यामुळे संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

विशेष म्हणजे, सध्या गॅसची टंचाई असतानाही संस्थानच्या स्वयंसेवकांनी हार न मानता पारंपरिक इंधनाचा वापर करून महाप्रसाद तयार केला. हजारो भाविकांसाठी वेळेत आणि उत्कृष्ट दर्जाचा प्रसाद तयार करून त्यांनी सेवाभावाचे उत्तम उदाहरण घालून दिले. या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

तसेच, शेकडो वर्षांची परंपरा असलेली शेंडीने गाडे ओढण्याची नवस फेडण्याची प्रथा पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. ही आगळीवेगळी परंपरा आजही तेवढ्याच श्रद्धेने जपली जात असल्याचे यावेळी दिसून आले.

या महाप्रसादा दरम्यान अचानक आलेल्या अवकाळी पाऊसामुळे गोंधळून न जात ईचा-नागी येथील नवयुवक स्वयंसेवकांनी आलेल्या भाविकांची पर्यायी व्यवस्था केल्यामुळेप्रसंगावधाना देखील परिचय बघायला मिळाला. या भव्य महाप्रसाद व बारस उत्सवामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. गावकऱ्यांसह भाविकांमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १२४ ■ बुधवार, १ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


### बोरमध्ये वाघ 'गायब' प्रशासन 'झोपेत'

## शिवाजी'नंतर 'युवराज'ही बेपत्ता; व्याघ्र संरक्षणावर प्रश्नचिन्ह



**वर्धा जनमाध्यम :** बोर व्याघ्र प्रकल्पातील ढिसाळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सन २०१२ पासून बेपत्ता असलेल्या बीटीआर-४ 'शिवाजी' या नर वाघाचा अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही, आणि आता बीटीआर-८ 'युवराज' हा दुसरा नर वाघही मागील दोन वर्षांपासून गायब असल्याचे उघड झाले आहे. दोन-दोन वाघ बेपत्ता होऊनही प्रशासन गप्प असल्याने वन्यजीव संरक्षणाच्या दाव्यांची पोलखोल झाली आहे.

बोर प्रकल्पात यापूर्वी बीटीआर-२ 'बाजीराव' या वाघाचा २०१७ मध्ये अपघाती मृत्यू झाला होता. त्यानंतर 'शिवाजी' बेपत्ता झाला.

या प्रकरणी पाठपुरावा झाला, निवेदने दिली गेली, पण वन विभागाला काहीच साध्य झाले नाही. आता 'युवराज'ही गायब झाल्याने हा प्रकार अधिकच गंभीर बनला आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, वाघांच्या नोंदीतही गोंधळ असल्याचे समोर आले आहे. 'युवराज' कोणत्या वाघिणीचा बछडा आहे, याबाबतच विसंगती दिसून येत आहे. त्यामुळे प्रकल्पातील माहिती व्यवस्थेवरच प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, 'शिवाजी'च्या अधिवासावर बीटीआर-१७ या नर वाघाने ताबा मिळविल्याचे दिसत आहे. बफर क्षेत्रात बीटीआर-१७ आणि बीटीआर-७ 'पिंकी' या वाघिणीचे दर्शन पर्यटकांना झाले. मात्र 'युवराज'चा काहीच मागमूस नसल्याने संशयाचे सावट अधिक गडद झाले आहे.

#### सफारीत वाघ दिसतात, पण 'युवराज'चा पत्ता नाही

बोरच्या बफर क्षेत्रात पर्यटकांना वाघांचे दर्शन होत असले तरी 'युवराज' दोन वर्षांपासून गायब आहे. त्याच्या शोधाबाबत प्रशासनाने मौन बाळगल्याने अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

दोन नर वाघ बेपत्ता होऊनही बोर प्रशासन निष्क्रिय असल्याने वन्यजीवप्रेमींमध्ये संताप उसळला आहे. आता तरी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

वाघांचे संरक्षण म्हणजे केवळ आकडेवारी नाही. प्रत्येक वाघाचे अचूक निरीक्षण आवश्यक आहे. वाघ बेपत्ता होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे,

संजय इंगळे तिगावकर, मानद वन्यजीव रक्षक

### शेतकऱ्याच्या लेकीची दिल्लीत झेप

## गिरडच्या माहेश्वरी गिरडेचा राष्ट्रीय नेतृत्व पुरस्काराने होणार गौरव



**समुद्रपूर जनमाध्यम –** तालुक्यातील गिरड येथील शेतकरी कुटुंबातून आलेल्या माहेश्वरी मंगेश गिरडे हिने जिद्द, चिकाटी आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. तिची प्रतिष्ठित राष्ट्रीय नेतृत्व पुरस्कारासाठी निवड झाली असून, ११ मे रोजी नवी दिल्ली येथे तिचा सन्मान होणार आहे.

भारत सरकारच्या 'माझा भारत' उपक्रमांतर्गत आयोजित या सोहळ्याचे आयोजन नेहरू युवा केंद्र संघटना आणि युनिव्हर्सल पीस फेडरेशन यांच्या उपस्थितीत होणार आहे. विश्व युवा केंद्र येथे होणाऱ्या या कार्यक्रमात देश-विदेशातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. देशभरातील निवडक युवकांमधून माहेश्वरीची निवड झाली असून, महाराष्ट्रातून ती एकमेव प्रतिनिधी ठरली आहे.

माहेश्वरी ही आपल्या कुटुंबातील उच्च शिक्षण घेणारी पहिली पिढी असून, ग्रामीण पार्श्वभूमीतून येत तिने अल्पवयातच उल्लेखनीय यश संपादन केले आहे. राज्य युवक संसदेत मंत्री म्हणून काम करत तिने नेतृत्वाची क्षमता सिद्ध केली आहे. प्रभावी वक्तृत्वाच्या जोरावर तिने अनेक जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश मिळवले आहे. सामाजिक बांधिलकी जपत नेहरू युवा केंद्र संघटना आणि युनिव्हर्सल पीस फेडरेशन यांसारख्या संस्थांसोबत कार्य करत तिने युवकांमध्ये जनजागृतीचे कार्यही केले आहे.

ग्रामीण भागातील मुलीने राष्ट्रीय स्तरावर झेप घेणे अभिमानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

माहेश्वरीच्या या यशामुळे गिरड गावासह संपूर्ण तालुक्याचा मान उंचावला असून, तिची कामगिरी इतर युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## देवळी मतदारसंघातील प्रश्नांवर प्रशासन धारेवर

### आ.राजेश बकाने यांची जिल्हाधिकाऱ्यांसोबत तातडीची बैठक

#### -प्रश्न मार्गी लावा, अन्यथा आंदोलन अटळ



**वर्धा जनमाध्यम -** देवळी मतदारसंघातील प्रलंबित आणि ज्वलंत प्रश्नांवरून आ. राजेश बकाने यांनी प्रशासनाला धारेवर धरत आक्रमक भूमिका घेतली. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्यासोबत घेतलेल्या बैठकीत बकाने यांनी विविध प्रश्नांवर ठोस तोडगा काढण्याची मागणी करत नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष सहन केले जाणार नाही, असा इशारा दिला.

या बैठकीत सिरूड लघु सिंचन प्रकल्पामुळे बाधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याचा प्रश्न ऐरणीवर आला. बॅकवॉटरमुळे शेती जमीन गमावणाऱ्या शेतकऱ्यांचे तातडीने अधिग्रहण करून न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली. एकुर्ली येथे मोबाईल टॉवर स्थापनेमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींवरही संताप व्यक्त करण्यात आला.

भूगाव परिसरातील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांनी सीएसआर निधीतून स्थानिक विकासकामे करावीत, अशी जोरदार मागणी बकाने यांनी केली. पुलगाव शहरातील हिंगणघाट फैल, बरांडा व हाउसिंग बोर्ड कॉलनीतील नागरिकांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्याबाबतही त्यांनी प्रशासनाला खडे बोल सुनावले.

इंझापूर येथील कचरा डेपोचा प्रश्न गंभीर होत चालल्याने तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच नाचणगाव आणि गाडगेनगर परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्वरित विशेष बैठक घेण्याची मागणी करण्यात आली.

जनतेच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्या, अन्यथा रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा आ. बकाने यांनी दिला.

जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी सर्व मुद्द्यांवर गांभीर्याने विचार करून संबंधित विभागीय अधिकारी व लोकप्रतिनिधींसोबत लवकरच संयुक्त बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, या बैठकीनंतर देवळी मतदारसंघातील प्रश्नांवर आता प्रशासन खडबडून जागे होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अवकाळीचा तडाखा: बाजार समितीत ३०० क्विंटल धान्य भिजले, व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान



**वर्धा जनमाध्यम :** हवामान विभागाने दिलेला अवकाळी पावसाचा इशारा खरा ठरत सोमवारी (३० मार्च) रात्री वर्धा शहरासह परिसरात अचानक पावसाने जोरदार हजेरी लावली. दामिणीच्या कडकडाटासह कोसळलेल्या या पावसाने थेट कृषी उत्पन्न बाजार समितीवर घाला घातला असून उघड्यावर ठेवलेले मोठ्या प्रमाणातील धान्य भिजल्याने व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

सध्या बाजार समितीत गहू, हरभरा व तूर या पिकांची मोठ्या प्रमाणात आवक सुरू आहे. शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी आणत असताना व्यापारी खरेदी करून पोती भरत होते. मात्र, रात्री सुमारे नऊ वाजताच्या सुमारास अचानक पावसाने हजेरी लावताच बाजार समितीत एकच धांदल उडाली. व्यापाऱ्यांकडील पोत्यांमध्ये भरलेले व उघड्यावर ठेवलेले जवळपास ३०० क्विंटल धान्य भिजल्याची माहिती समोर आली आहे.

या अवकाळी पावसामुळे व्यापाऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला असून, काही शेतकऱ्यांचे धान्यही उघड्यावर होते. मात्र, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांनी तत्परता दाखवत ताडपत्रीने झाकून शेतकऱ्यांचा माल वाचविण्यात यश मिळवले.

या संदर्भात बाजार समितीचे सचिव समीर पेंडके यांनी सांगितले की, पावसाचा अंदाज असला तरी अचानक जोरदार पाऊस आल्याने व्यापाऱ्यांची तारांबळ उडाली. सुमारे ३०० क्विंटल धान्य ओले झाले असून शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात आल्या.

## हिंगणघाट-नागपूर बसफेऱ्या वाढवण्याची मागणी

### -शिवसेनेचे आगार व्यवस्थापकांना निवेदन; प्रवाशांच्या गैरसोयींकडे लक्ष वेधले

**हिंगणघाट जनमाध्यम :** हिंगणघाट ते नागपूर या मार्गावरील बसफेऱ्यांची संख्या अपुरी असल्याने प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने मंगळवारी स्थानिक बसस्थानक येथे आगार व्यवस्थापकांना निवेदन देऊन बसफेऱ्या वाढवण्याची मागणी करण्यात आली.



नागपूर हे रोजगार, शिक्षण व व्यवसायासाठी महत्त्वाचे शहर असून, हिंगणघाटहून तेथे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. मात्र, सध्या बसफेऱ्या कमी असल्यामुळे प्रवाशांना गर्दीतून प्रवास करावा लागत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तसेच लग्नसराईच्या हंगामात प्रवाशांची संख्या वाढल्याने ही समस्या अधिक तीव्र झाली आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शिवसेना प्रवक्त्या तथा विधानपरिषद आमदार डॉ. मनीषा कायंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा प्रमुख राजेश सराफ व शुभांगी ठमेकर यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले. उपजिल्हाप्रमुख अमित गावंडे यांच्या उपस्थितीत आगार व्यवस्थापक गौतम शेंडे यांना परिस्थितीची माहिती देण्यात आली.

### स्वच्छतेचा झेंडा उंचावला

## राष्ट्रसंत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात पळसगाव बाई अव्वल



**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** स्वच्छतेतून समृद्धीकडे या संकल्पनेला साकार रूप देत पळसगाव बाई ग्रामपंचायतीने जिल्ह्यात मानाचा पहिला क्रमांक पटकावला आहे. राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या नावाने राबविण्यात येणाऱ्या ग्राम स्वच्छता अभियानात मिळालेल्या या यशामुळे गावाचा मान उंचावला आहे.

सरपंच धीरज लेंडे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या काही वर्षांत गावात स्वच्छतेची चळवळ उभी राहिली. माझं गाव, स्वच्छ गाव ही संकल्पना ग्रामस्थांनी कृतीत उतरवली. प्रत्येक रस्ता, गल्ली आणि सार्वजनिक ठिकाण स्वच्छतेच्या तेजाने उजळले. घराघरांत कचरा वर्गीकरण, ओला-सुका कचरा वेगळा करणे, प्लास्टिकमुक्त गाव आणि सांडपाणी व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात आला.

महिला बचत गट, युवक, शाळा, अंगणवाडी आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे स्वच्छता मोहिमा, श्रमदान, वृक्षारोपण आणि जनजागृती रॅली राबवत गावात सकारात्मक बदल घडवला. स्वच्छता हीच सेवा हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचला.

जिल्हास्तरीय परीक्षकांनी गावातील स्वच्छता, शिस्तबद्ध नियोजन आणि लोकसहभाग पाहून समाधान व्यक्त करत प्रथम क्रमांक जाहीर केला. या यशानंतर गावात उत्साहाचे वातावरण असून ग्रामस्थांनी एकमेकांचे अभिनंदन केले. पळसगाव बाई विकासाचे मॉडेल ठरत आहे, असे समीर कुणावार यांनी म्हटले. तर ग्रामस्थांच्या परिश्रमाचे हे फलित आहे, असे रामदास तडस यांनी नमूद केले.

हा पुरस्कार ग्रामस्थांच्या एकजुटीचा सन्मान असून, पुढेही स्वच्छतेचा हा आदर्श कायम ठेवण्याचा निर्धार गावकऱ्यांनी व्यक्त केला आहे.


## पाणी वाचवा, नाहीतर संकट अटळ; प्रशासनाचा इशारा

### १४७ विहिरींचे खोलकरण; खाजगी विहिरीही ताब्यात घेणार

**वर्धा जनमाध्यम :** उन्हाळा सुरू होण्याआधीच जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट डोके वर काढू लागले असून प्रशासनाने आता थेट कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पाण्यासाठी नागरिकांची वणवण होऊ नये म्हणून सार्वजनिक विहिरींसह खाजगी विहिरींचेही अधिग्रहण करण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्ह्यातील ७५७ गावांसाठी ८७६ उपाययोजना राबविण्याचा आराखडा तयार करण्यात आला असून, त्याअंतर्गत १०३ गावांतील १४७ विहिरींचे खोलकरण व अधिग्रहण करण्यात येणार आहे. पाणीटंचाईच्या संकटावर मात करण्यासाठी प्रशासनाने आता 'ॲक्शन मोड'मध्ये प्रवेश केला आहे. स्थिती गंभीर झाल्यास १९२ गावांतील २०१ खाजगी विहिरी ताब्यात घेण्याची तयारी प्रशासनाने दर्शविली आहे. त्यामुळे पाण्यावर खासगी मालकीपेक्षा नागरिकांच्या गरजांना प्राधान्य देण्याचा इशारा दिला जात आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील ११ जलाशय आणि २१ लघुप्रकल्पांमध्ये केवळ ५० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. एप्रिलमध्ये तापमानाचा पारा चढताच हा साठा झपाट्याने घटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिणामी नळपुरवठ्यावरही गंडांतर येण्याची शक्यता आहे.



जिल्हा परिषदेकडून नळयोजनांच्या दुरुस्तीला गती देण्यात येत असून, नव्या बोअरवेल उभारणीची कामेही हाती घेतली जाणार आहेत. ही सर्व कामे जूनपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

प्रशासनाने नागरिकांना स्पष्ट इशारा देत 'पाणी जपून वापरा, अन्यथा संकट अटळ असे आवाहन केले आहे.


## जाहीर नोटीस

माझी पक्षकार सौ. शुभांगी सुभाष पेशकर या मौजा नाचणगाव, ता. देवळी, जि. वर्धा येथील मालमत्तेच्या मालक आहेत. सदर मालमत्ता मौजा क्र. ७५ अंतर्गत येते व ग्रामपंचायत नाचणगाव हद्दीत, रणतकर लेआउट, वॉर्ड क्र. ६, मालमत्ता क्र. ८१३७, फील्ड सर्व्हे क्र. जुने ५०३, ५०४ व नवीन ४७४ मधील प्लॉट क्र. ५८ च्या दक्षिण बाजूस असलेला भाग असून त्याचे क्षेत्रफळ ७५०.०० चौ.फुट (६९.६० चौ.मी.) आहे. सदर जागेवर बांधकाम केलेले घर असून त्याचे बांधकाम क्षेत्रफळ ४४०.०० चौ.फुट आहे।सदर मालमत्तेच्या हद्दी पुढीलप्रमाणे आहेत :-

पूर्वेस : श्री. वसंतराव रावेकर यांचे घर,पश्चिमेस : सार्वजनिक रस्ता

उत्तरेस : सदर प्लॉटचा उर्वरित भाग

दक्षिणेस : रस्ता,माझे पक्षकार श्री. गोपाल लक्ष्मणराव साहू यांनी सौ. सूर्यकांता गोपाल साहू यांच्या संमतीने प्लॉट क्र. ५८, क्षेत्रफळ ७५०.०० चौ.फुट (६९.६० चौ.मी.) ही मालमत्ता दिनांक, २२/०१/२०१८ रोजी दस्त क्र. २२३/२०१८ अन्वये सौ. शुभांगी सुभाष पेशकर यांच्या नावे विक्रीखताने दिली आहे।

माझ्या पक्षकारांकडील दिनांक २८/०५/१९९० चा मूळ लिंक विक्रीखत (दस्त क्र. ५९९/१९९०) हरवलेला आहे। सध्या माझ्या पक्षकारांनी सदर मालमत्तेबाबत श्री. अशफकअली सय्यद बाबा अली यांच्यासोबत विक्री करार केलेला असून त्यांनी Muthoot Housing Finance Company Limited येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे। त्यामुळे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा सदर हरवलेला मूळ लिंक विक्रीखत कोणास आढळल्यास, कृपया या नोटीसच्या प्रसिद्धीपासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा।

**संपर्क :- आर.आर.तिवारी,गंगा रामनगर,**
**वर्धा. मो. ९९२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझी पक्षकार सौ. मनीषा गणेश नाईक या खाली नमूद केलेल्या मालमत्तेच्या मालक आहेत. सदर मालमत्ता मौजा जुने धामणगाव, ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती येथे स्थित असून ग्रामपंचायत जुने धामणगाव हद्दीत येते. वॉर्ड क्र. १, फील्ड सर्व्हे क्र. ९९/२, प्लॉट क्र. १० च्या उत्तरेकडील बाजूस असलेला भाग व घर क्र. ३९०९ (असेसमेंटनुसार), क्षेत्रफळ ७५.०० चौ.मी. (८०७.०० चौ.फुट) आहे.

सदर मालमत्तेच्या हद्दी पुढीलप्रमाणे आहेत :-पूर्वेस : रस्ता

पश्चिमेस : मोकळा प्लॉट

उत्तरेस : श्री. कोळी यांचे घर

दक्षिणेस : श्री. कांबळे यांचा मोकळा प्लॉट,श्री. पुरुषोत्तम ज्ञानेश्वरराव बावणगडे यांनी प्लॉट क्र. १० च्या उत्तरेकडील बाजूचा भाग दिनांक ३१/०१/२०१७ रोजी दस्त क्र. १५३/२०१७ अन्वये सौ. मनीषा गणेश नाईक यांना विक्रीखताने विकला असून, त्याबाबत विक्रीखतामध्ये नमूद केल्याप्रमाणे पूर्ण मोबदला देण्यात आलेला आहे व त्यानुसार मुद्रांक शुल्क अदा करण्यात आले आहे।

माझ्या पक्षकारांकडील दिनांक १५/०३/२००० चा मूळ लिंक विक्रीखत (दस्त क्र. ३९६/२०००) हरवलेला आहे। सध्या माझ्या पक्षकारांनी Muthoot Housing Finance Company Limited येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे।

त्यामुळे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा सदर हरवलेला मूळ लिंक विक्रीखत कोणास आढळल्यास, कृपया या नोटीसच्या प्रसिद्धीपासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा

**ॲड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर, वर्धा. मो.९९२२४२६१६८**


## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेला पालकमंत्री भोयर यांचा बुस्टर डोज

**वर्धा जनमाध्यम –** जिल्ह्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेत राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत ११,८१६ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यास मंजुरी दिली आहे. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेसाठी ६०.३४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

**११,८१६ शेतकऱ्यांना कर्जमाफी; सहकारी बॅंकेला ६०.३४ कोटींचा दिलासा**

देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात सुरू झालेल्या या योजनेपासून वर्धा जिल्हा बॅंकेचे अनेक शेतकरी वंचित राहिले होते. परिणामी, नव्या कर्जासाठी पात्रता मिळत नव्हती तसेच आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. भोयर यांच्या प्रयत्नांमुळे हा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागला असून हजारो शेतकरी कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. योजनेनुसार १.५० लाख रुपयांपर्यंत कर्ज असलेल्या ११,०८१ शेतकऱ्यांना सुमारे ५१.२८ कोटींचा लाभ मिळणार आहे, तर 'वन टाइम सेटलमेंट' (ओटीएस) अंतर्गत १.५० लाखांपेक्षा जास्त कर्ज असलेल्या ७३५ शेतकऱ्यांसाठी ९.०५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

## हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई जनमाध्यम –** महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला गती देण्यात आली असून, २०२७ पर्यंत या आजाराचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

या उपचारपद्धतीत आयव्हरमेक्टिन, डायथिलकार्बामाझिन आणि अल्बेंडाझोल या तीन औषधांचा संयुक्त वापर केला जातो. पारंपरिक उपचारांच्या तुलनेत ही पद्धत अधिक प्रभावी ठरत असून, मायक्रोफिलेरिया या परजीवींचा नाश जलद गतीने करण्यात मदत होते. त्यामुळे रोगाचा प्रसार रोखणे अधिक सोपे होत आहे.

केंद्र सरकारच्या 'मास ड्रग अ?डमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहिमेअंतर्गत देशातील १२ राज्यांमध्ये ही योजना राबवली जात आहे. महाराष्ट्रात सुमारे ५५ लाख नागरिकांना प्रतिबंधात्मक औषधोपचार देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. दरवर्षी पात्र नागरिकांना औषधे देऊन रोगाचा प्रसार कमी करण्यावर भर दिला जात आहे.

विदर्भ विभागात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळत असल्याने गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गोंदिया या जिल्ह्यांत विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. फेब्रुवारी २०२६ च्या अहवालानुसार, राज्यातील सुमारे ७५ टक्के रुग्ण नागपूर विभागात आढळतात. त्यामुळे या भागात उपचार आणि जनजागृतीस प्राधान्य देण्यात आले आहे. या मोहिमेचे सकारात्मक परिणामही दिसून येत आहेत. नागपूर ग्रामीण भागात 'ट्रिपल ड्रग थेरपी'मुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर २०१४ मधील ४.९१ टक्क्यांवरून २०२४ पर्यंत एक टक्क्यांपेक्षा कमी करण्यात यश आले आहे. हे आरोग्य यंत्रणेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित मानले जात आहे.मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत असून, देशातून हत्तीरोग निर्मूलनाच्या उद्दिष्टपूर्तीत महाराष्ट्राचा मोलाचा वाटा आहे.

दरम्यान, आरोग्य विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली औषधे घ्यावीत. समाजाचा सक्रिय सहभाग आणि जनजागृतीमुळेच हत्तीरोगाविरुद्धचा हा लढा यशस्वी होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# अमेरिका कोणत्याही देशाला मदत करणार नाही

## ट्रम्प म्हणाले- आमच्याकडून तेल खरेदी करा, अन्यथा धाडस दाखवा आणि होर्मुझला जाउन तेल घ्या








इस्त्रायलमधील हैफा शहरात सोमवारी हिजबुल्लाहने डागलेल्या इराणी क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर तेल शुद्धीकरण कारखान्याला आग लागली. लेबनॉनमधील बेरूतमध्ये विस्थापित लोकांसाठी तात्पुरती शिबिरे उभारण्यात आली आहेत. चित्रात या तात्पुरत्या शिबिराबाहेर मुले खेळताना दिसत आहेत.

**तेल अवीव/तेहरान/वॉशिंग्टन /वृत्तसंस्था :**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी सांगितले की, अमेरिका यापुढे कोणत्याही देशाला मदत करणार नाही. देशांना आपापली परिस्थिती स्वत?च सांभाळावी लागेल. त्यांनी एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, ब्रिटनसारख्या ज्या देशांना होर्मुझच्या सामुद्रधुनीतून इंधन मिळत नाही, त्यांनी अमेरिकेकडून तेल खरेदी करावे, कारण अमेरिकेकडे तेलाची कमतरता नाही. ट्रम्प म्हणाले की, जर देशांना हवे असेल, तर त्यांनी धाडस दाखवून होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये जाउन स्वतःच तेल मिळवावे. अमेरिका त्यांच्या मदतीला येणार नाही, जसे ते अमेरिकेच्या मदतीला आले नाहीत. आपल्या निवेदनात त्यांनी असेही म्हटले की, इराण मोठ्या प्रमाणात कमकुवत झाला आहे आणि सर्वात कठीण काम आधीच पूर्ण झाले आहे. आता इतर देश जाउन स्वतःच आपले तेल मिळवू शकतात.

**इराणमधील शस्त्रागारावर अमेरिकेचा हवाई हल्ला-**अमेरिकेने इराणमधील इस्फहान शहरातील एका मोठ्या शस्त्रागारावर हवाई हल्ला केला आहे. वाल स्ट्रीट जर्नलच्या वृत्तानुसार, हा हल्ला सोमवारी रात्री २,००० पौंड वजनाच्या बंकर-बस्टर बाम्बचा वापर करून करण्यात आला. एका अमेरिकी अधिका-याचा हवाला देत अहवालात म्हटले आहे की, मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि लष्करी उपकरणे असलेल्या डेपोला लक्ष्य करण्यात आले होते. बंकर-बस्टर बाम्बचा वापर तटबंदीयुक्त आणि भूमिगत लक्ष्ये नष्ट करण्यासाठी केला जातो. डेपोमध्ये साठवलेल्या शस्त्रास्त्रांचा स्फोट झाल्याने या हल्ल्यामुळे अनेक ठिकाणी स्फोट झाले आणि मोठ्या प्रमाणात आग लागली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही या स्फोटांचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला.

**इराणचा आरोप- अमेरिकेचा वाटाघाटींवर विश्वास नाही**

इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांनी म्हटले आहे की, वाटाघाटी सुरू असताना इराणवर दोनदा हल्ला झाला. यावरून राजनैतिक मार्गाने आणि संवादाने प्रश्न सोडवण्यावर अमेरिकेचा विश्वास नाही, हे स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी असेही म्हटले की, होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाढता तणाव हा अमेरिका आणि तिच्या मित्र राष्ट्रांनी केलेल्या हल्ल्यांचा परिणाम आहे. इतकेच नव्हे तर, त्यांनी युरोपीय देशांवर या मुद्द्यावर इराणच्या विरोधात पक्षपाती भूमिका घेतल्याचा आरोप केला.

**लेबनानची राजधानी बेरू तवर इस्रायली हवाई हल्ला**

लेबनॉनची राजधानी बेरू तमध्ये इस्रायली हवाई हल्ल्यात एक इमारत पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. इराण युद्धामुळे लेबनानमधील परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे, जिथे जवळपास १० लाख लोक विस्थापित झाले आहेत आणि शेकडो शाळांचे मदत शिबिरांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे.

**कतार आणि यूएईच्या नेत्यांची भेट, सुरक्षा आणि शांततेवर चर्चा**

कतारचे अमीर शेख तमीम बिन हमद अल थानी आणि यूएईचे अध्यक्ष मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांनी प्रादेशिक सुरक्षा आणि तणाव कमी करण्याच्या मुद्द्यांवर चर्चा केली.

**एअर फ्रान्सने १९ एप्रिलपर्यंत मध्य पूर्वेकडील उड्डाणे रद्द केली.**

एअर फ्रान्सने मध्य पूर्वेकडील उड्डाणांवरील स्थगिती वाढवली आहे. एअर फ्रान्सने जाहीर केले आहे की दुबई, रियाध, तेल अवीव आणि बेरू त यांसारख्या शहरांमधून येणारी आणि जाणारी उड्डाणे १९ एप्रिलपर्यंत रद्द राहतील. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमान म्हटले आहे की, मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे संपूर्ण प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होउ शकते. त्यांच्या अहवालानुसार, हा संघर्ष आता काही देशांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर संपूर्ण प्रदेशासाठी एक मोठे संकट बनले आहे. अहवालात म्हटले आहे की, या युद्धामुळे प्रदेशाची अर्थव्यवस्था ३.७% ते ६% ने घसरू शकते आणि एकूण नुकसान अंदाजे १९४ अब्ज डालर्स (१८.४३ लाख कोटी रु पये) पर्यंत पोहोचू शकते. हे प्रामुख्याने व्यापारातील व्यत्यय, तेल बाजारातील अस्थिरता आणि सागरी मार्गांमधील अडथळ्यांमुळे आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणा-या जहाजांची संख्या ७०% पेक्षा जास्त कमी झाली आहे, ज्यामुळे तेलाच्या किमती प्रति बॅरल जवळपास १२० डालर्सपर्यंत वाढल्या आहेत. याचा परिणाम सामान्य लोकांवरही होईल. अहवालानुसार, अंदाजे ४० लाख अधिक लोक गरिबीत लोटले जाउ शकतात आणि लाखो नोक-या, विशेषतः कमी कौशल्याच्या नोक-या धोक्यात आहेत. इराक, लेबनान आणि सीरियासारख्या देशांना सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. लेबनानमधील परिस्थिती विशेषतः गंभीर असून, जवळपास दहा लाख लोकांना आपली घरे सोडून पळून जाण्यास भाग पडले आहे आणि शेकडो शाळांचे मदत शिबिरांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे.

**इस्त्रायलने २४ तासांत इराणवर २३० हवाई हल्ले केले.**

इस्त्रायली लष्कराने गेल्या २४ तासांत इराणमध्ये २३० हून अधिक हवाई हल्ले केल्याचा दावा केला आहे. इराणची लष्करी शक्ती कमकुवत करण्याच्या उद्देशाने आखलेल्या एका नियोजित मोहिमेचा भाग म्हणून हे हल्ले करण्यात आले आहेत, असे इस्त्रायलचे म्हणणे आहे. इराणचे म्हणणे आहे की, इस्त्रायल आणि अमेरिका केवळ लष्करी तळांवरच नव्हे, तर नागरी भागांवरही हल्ले करत आहेत. दरम्यान, इराणचे परराष्ट्र मंत्री अराघची यांनी मंगळवारी दावा केला की, या हल्ल्यांमध्ये औषध कंपन्यांचेही नुकसान झाले आहे.

## मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा; नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन



**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय हवामान विभागाच्या ३० मार्च २०२६ रोजीच्या पाच दिवसीय अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीज चमकणे, गारपीट आणि वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. हवामान विभागाने दिलेल्या सूचनांनुसार, विजेचा कडकडाट ऐकू आल्यास तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोनचा वापर करू नये. तसेच निवा-यापासून दूर असल्यास जमिनीवर न पडता पाय एकत्र करून बसून राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामपंचायत, पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत तातडीने जनजागृती करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. रु ग्णवाहिका व अग्निशमन दल सतर्क ठेवण्यात यावेत, तसेच शाळा, सभागृहे व सार्वजनिक इमारती सुरक्षित आश्रयस्थळ म्हणून खुले ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हवामान खात्याचे अद्ययावत संदेश गावपातळीपर्यंत पोहोचवण्यावरही भर देण्यात आला आहे. शेतकरी बांधवांनी विजेच्या इशा-याच्या काळात शेतातील कामे टाळावीत, बांधकाम स्थळांवरील कामकाज तात्पुरते थांबवावे, तसेच यात्रास्थळे व मोठ्या जमावाचे कार्यक्रम तातडीने स्थगित करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## हत्तीरोग निर्मूलनासाठी ‘ट्रिपल ड्रग थेरपी’ (आयडीए) मोहिमेला वेग -मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी ट्रिपल ड्रग थेरपी (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

**राज्यात ५५ लाख नागरिकांना औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी ट्रीपल ड्रग थेरपी (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते. महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे.

**नागपूर ग्रामीण भागात मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश**

महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रु ग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.ट्रीपल ड्रग पालिसी (आयडीए) यशाचा दरः नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरू न २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, आयडीए उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचा-यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय हत्तीरोग निर्मूलन शक्य नसल्याचेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

## महिला व बालकांच्या पोषणात लक्षणीय सुधारणेचे उदिष्ट-देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील कुपोषणाच्या समस्येवर मात करु न महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाउल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन यांच्यात महिला व



बालकांच्या पोषणा संदर्भात पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला असून, या भागीदारीमुळे माता व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्ह्ज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMV) सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरु वातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये यासंदर्भातील अंमलबजावणी करण्यात येणार असून, राज्यस्तरावरही तांत्रिक साहाय्य दिले जाणार आहे.तसेच, सीआयएफएफ कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करू न प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या १००० दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रु जवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे. पुराव्यावर आधारित उपाययोजना, तांत्रिक साहाय्य आणि क्षेत्रीय कर्मचा-यांच्या क्षमता विकासाच्या माध्यमातून सेवा अधिक सक्षम केली जाईल. कार्यक्रमांचे रिअल-टाइम निरीक्षण, डेटाआधारित निर्णय प्रक्रिया आणि सक्षम मानिटरिंग प्रणालीमुळे योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्यात येणार आहे. या भागीदारीमुळे सेवा वितरण यंत्रणा अधिक बळकट होउन महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची पोहोच आणि गुणवत्ता वाढेल. परिणामी, महाराष्ट्रातील माता व बालकांच्या आरोग्यपूर्ण आणि सक्षम भविष्यास नवी दिशा मिळणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागामार्फत देण्यात आली आहे.

## उष्माघाताचा कहर; कोंबड्यांचा मृत्यू

**वणी / प्रतिनिधी-**राज्यात वाढत्या उष्णतेने सर्वसामान्य जनजीवनासह आता पशु-पक्ष्यांनाही हैराण केले आहे. सुरगाणा तालुक्यात सध्या तापमानाचा पारा ३७ अंशांच्या आसपास पोहोचला असून, या भीषण उन्हाचा फटका पोल्ट्री व्यवसायाला बसला आहे. बंदिस्त शेडमध्ये वाढवल्या जाणा-या कोंबड्यांना उष्माघाताचा तीव्र फटका बसत असून, दररोज शेकडो कोंबड्यांचा मृत्यू होत असल्याने पोल्ट्री व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत आहे. जणू सूर्य आग ओकत आहे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या वाढत्या तापमानाचा सर्वाधिक फटका पोल्ट्री व्यावसायिकांना बसत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, काही पोल्ट्री फार्ममध्ये उष्माघातामुळे दररोज ५० ते ८० कोंबड्यांचा मृत्यू होत आहे. यामुळे पोल्ट्री व्यावसायिकांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

तापमान ३७ अंशांच्या वर गेल्याने कोंबड्यांची सहनशक्ती संपत आहे. शेडमधील कोंबड्यांना हवा खेळती न मिळाल्यास उष्माघाताचा धोका अधिक वाढतो. उन्हाळा नुकताच सुरू झाला असून, तापमानाचा पारा आणखी वाढण्याची शक्यता असल्याने ही परिस्थिती आगामी काळात अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उष्णतेमुळे कोंबड्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून, त्यांचे खाणे-पिणे मंदावले आहे. आगामी दिवसांत तापमानाने उच्चांक गाठल्यास पोल्ट्री व्यवसायाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

## तुकाराम मुंढेंची गेल्या 21 वर्षात 25 वेळा बदली

### आता आपत्ती व्यवस्थापनासह तीन खात्यांची धुरा

**मुंबई/प्रतिनिधी :** IAS अधिकारी तुकाराम मुंढे यांची पुन्हा एकदा बदली झाली आहे. गेल्या २१ वर्षात त्यांची ही २५ वी बदली आहे. मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदावरून आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल आणि वन विभाग मंत्रालयाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे तुकाराम मुंढे यांच्या खांद्यावर महसूल, वन विभागासारख्या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी टाकण्यात आली आहे. दिव्यांग कल्याण विभागात काम करताना बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांवर मुंढे यांनी कारवाई केली. त्यात जिल्हा परिषदांमधील अनेक कर्मचा-यांवर निलंबनाची प्रक्रिया आणि पडताळणी मोहिम सुरू होती. ही मोहिम सुरू असतानाच तुकाराम मुंढे यांची बदली झाल्याने अनेक चर्चांना उधाण आले. ५ ऑगस्ट २०२५ रोजी दिव्यांग कल्याण विभागात त्यांची सचिव म्हणून नियुक्ती झाली होती. धडाकेबाज आणि शिस्तप्रिय आयएएस अधिकारी म्हणून तुकाराम मुंढे यांची ओळख आहे. २००५ च्या बॅचमधील आयएएस अधिकारी असलेले मुंढे यांच्या गेल्या २१ वर्षात २५ बदल्या झाल्या आहेत. नवी मुंबईत महापालिका आयुक्त असताना तुकाराम मुंढे यांनी अनधिकृत बांधकामे, मालमत्ता कर वसुली आणि प्रशासनातील शिस्त यासारखे कठोर पावले उचलली होती. नागपूरमध्ये आयुक्त म्हणून कोविड काळात खासगी रु



ग्णालयांवरील नियंत्रण, बेड व्यवस्थापन, डाक्टरांची उपस्थिती यावर विशेष लक्ष घातले होते. तुकाराम मुंढे यांच्या अनेक धडाडीच्या निर्णयाने त्यांना लोक पाठिंबा मिळत गेला. परंतु मुंढे राजकीय आणि प्रशासकीय वादात कायम चर्चेत राहिले. त्यांच्या कारकिर्दीतील सर्वाधिक चर्चेत राहिलेला निर्णय म्हणजे नागपूर स्मार्ट सिटी आणि महापालिका प्रशासनातील खर्च व कंत्राट प्रक्रियेतील कथित अनियमिततांवर घेतलेली कठोर भूमिका होती. यामुळे अनेक लोकप्रतिनिधींशी त्यांचे मतभेद उघड झाले. नाशिकमध्ये आयुक्त असताना अतिक्रमण हटाव, पाणीपुरवठा आणि महसूल सुधारणा यामुळे ते चर्चेत राहिले. दरम्यान, प्रशासकीय कारकिर्दीत इतक्या वेळा बदली होउनही तुकाराम मुंढे यांनी कधीच कामाची शैली बदलली नाही. नियमबाह्य कामांना थारा न देणे, वेळेचे काटेकोर पालन करणे यासाठी ते कटाक्ष असतात. त्यामुळे आगामी काळात महसूल, वन यासारख्या विभागात मुंढे काय कामगिरी करतात याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ अभियानाला आजपासून प्रारंभ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करू न देण्यासाठी राज्य सरकारने माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणा-या या राज्यव्यापी अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे. हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होउ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.

**सुदृढ गावांना मिळणार आरोग्यसंपन्न गाव किताब-**माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य स्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. तर आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखालील कृती समिती प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणार आहे. त्याचबरोबर गाव पातळीवर आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणा-या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून गौरविण्यात येणार आहे. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रकमेचा पुरस्कार देउन प्रोत्साहित केले जाणार आहे. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारने ८०.७५ कोटी रु पयांचा निधी मंजूर केला आहे. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणा-या जिल्हा परिषद, पंचायत समिती, गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कोट्यवधी रु पयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

**२ ते ५ कोटींचे पुरस्कार-**राज्य स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत पहिला क्रमांक मिळवणा-या जिल्हा परिषदेला ५ कोटी रु पये, दुस-या क्रमांकाला ३ कोटी रु पये आणि तिस-या क्रमांकासाठी २ कोटी रु पये दिले जाणार आहेत. जिल्हा परिषदेनंतर पंचायत समिती स्तरावरही प्रोत्साहनासाठी मोठ्या रक्कमेची तरतूद आहे. ज्यामध्ये पहिल्या क्रमांकाला २ कोटी, दुस-या क्रमांकाला १.५ कोटी रु पये आणि तिस-या क्रमांकाला १.२५ कोटी रु पये दिले जाणार आहेत. राज्य स्तरावर सर्वोत्तम ठरणा-या ग्रामीण रु ग्णालय आणि उपजिल्हा रु ग्णालयांना ७५ लाख रु पयांचा विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. उपआरोग्य केंद्रांना पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे ५ लाख आणि २५ लाख रु पये दिले जाणार आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हा स्तरावर १० लाख आणि राज्य स्तरावर ५० लाखांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्याचबरोबर गावांनाही पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा, विभाग राज्य स्तरासाठी अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रु पयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत राबवले जाणार असल्याने, प्रत्येक वर्षी गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## बाह्य ऊर्जेचे अवलंबित्व

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाने भारतापुढे भलताच पेच निर्माण केला आहे. होर्मुझचा खाडी मार्ग इराणने बंद केल्यामुळे सर्व जगाचा पेट्रोल आणि गॅसचा पुरवठा ठप्प झाला. भारत या संकटातून मार्ग कसा काढेल हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.या पेचप्रसंगातच एक बातमी समोर आली,ती म्हणजे एकट्या पुण्यातून दररोज २०० विमान उड्डाणे होत होती. त्यातून दररोज ३३ ते ३४ हजार प्रवासी प्रवास करत होते.ही संख्या आता केवळ एकवर आली. पुण्यातून खरेतर पाच आंतरराष्ट्रीय विमान सेवा उपलब्ध आहेत. पण त्यापैकी सध्या केवळ एक सेवा सुरू आहे. हे तर पुण्याचे झाले. पण बाकीच्या ठिकाणीही हीच परिस्थिती आहे. त्यामुळे सर्व ठिकाणची विमानसेवा जवळपास बंद पडली. आखाती देशांत जाणारे आणि तेथून रोज येणारे जवळपास लाखो लोक होते. जसा हा इराण-अमेरिका युद्धाचा पेच सुरू झाला त्यानंतर लगेचच आखातातून भारतात परतणाऱ्यांची संख्या ५२,००० प्रवाशांवर आली. दुबई आणि हैदराबाद येथून रोज ५००० प्रवाशांची सेवा चालत होती. ती आता युद्धामुळे ठप्प झाली. पण त्यापेक्षा महत्त्वाचे आहे ते भारतातील गॅस आणि तेल पुरवठ्याचा माग. 'जो होर्मुझच्या खाडीतून जातो. त्याच्या चाव्या इराणच्या ताब्यात आहेत. भारतातील अनेक क्षेत्रे कच्चा माल आयात करतात. त्यासाठी ते होर्मुझच्या खाडी मार्गावर अवलंबून असतात. त्यामुळे भारताच्या तेल आणि वायू पुरवठ्यात व्यत्यय आले आणि त्याचा फटका बसला तो आपल्या अर्थव्यवस्थेला. जागतिक परस्परावलंबी कधी कधी फायद्याचा असतो पण या बाबतीत तो पुरवठा साखळीत व्यत्यय निर्माण करतो. ऊर्जा हे सर्व क्षेत्रांसाठी बॅकबोन असते. त्यामुळे वीज, उत्पादन, परिवहन आणि सेवा ही क्षेत्रे महत्त्वपूर्ण काम करतात. पण सध्या आपल्याकडे ऊर्जेचा पेच निर्माण झाला आहे. आपण ८५ टक्के तेल आयात करतो. ते होर्मुझच्या मार्गाने आणि ५५ ते ६० टक्के गॅस त्याच मार्गाने आयात करतो. पण ५० टक्के पाईप गॅस आयात करावा लागतो. पाईप गॅस हा एलपीजीच्या तुलनेत स्वस्त.या काळात तर पाईप गॅस आदर्श आहे. पुरवठा साखळी व्यत्ययामुळे एलपीजी हा नेहमीच मिळवणे अवघड. त्या तुलनेत पाईप गॅस हा सहज मिळू शकतो. बहुतांश सरकारे आता पाईप गॅसकडे वळत आहे. अर्थात पाईप गॅसच्या बाबतीत एकच अडचण आहे, ती म्हणजे खेड्यापाड्यात हा गॅस मिळवणे अवघड जाते.शहरी भागात तो सहज उपलब्ध होतो आणि घराघरांत तो उपलब्ध करून देता येतो. होर्मुझच्या खाडीचा मार्ग आता ब्लॉक झाला. भारताला पर्यायी मार्ग शोधणे काळाची गरज आहे. आयात केल्या जाणाऱ्या गॅसवर भारताचे अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. त्यातूनच पाईप गॅसचा पर्याय पुढे आला. पाईप गॅसचे लाभ अनेक आहेत. ज्या सोसायट्या पाईप गॅसची अडवणूक करतात त्यांना आता ती करता येणार नाही. कारण पाईप गॅस ही लोकांची गरज आहे. त्यामुळे पूर्वी कंपन्यांना सोसायटीमध्ये पाईप गॅसची लाईन टाकायची असेल, तर भरपूर परवानग्या मिळवाव्या लागतात. आता सरकारने ती अट काढून टाकली. कारण सरकारचा हेतू आहे, की पाईप गॅसचा वापर ग्राहकांनी करावा आणि सरकारची या ऊर्जा संकटातून मुक्तता करावी. पाईप गॅस हा एलपीजीपेक्षा निश्चितच आरामदायक आहे.क्रूड पुरवठा धोक्यात आल्यामुळे भारताने रिफायनरीकडे लक्ष वळवले. अर्थात पाईप गॅस मिळवण्यात काही भूराजकीय अडचणी आहेत, जसे की पाईप गॅसच्या वाहिनीला जमिनीखालून जाणारी वाहिनी लागते. त्यांना टाकणे हे जोखमीचे ठरू शकते. पण पाईप गॅसच्या बाबतीत सर्वात अडचण असते ती सुरुवातीची किमत खूप जास्त असते. या गॅसच्या ठेवीसाठी रक्कम कधी कधी ५ हजार ते सात हजार रुपये असते. पण गॅस वाहिनी ज्या भूमीतून जाते ती कधी आव्हानात्मक परिस्थितीतून जाते आणि त्याला अभियांत्रिकी कौशल्य गरजेचे असते.पाईप गॅसची सुरुवात जरी राजीव गांधी यांच्या कार्यकाळात सुरू झाली असली तरीही तिचा विस्तार आणि व्यापक उपयोग लोकांना करून दिला तो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच. २०१४ मध्ये पाईप गॅस केवळ ६६ जिल्ह्यांना उपलब्ध होता. तो आता २०२३ मध्ये ६३० जिल्ह्यांमध्ये उपलब्ध होत आहे. आता तर या पेचामुळे तो अधिक व्यापक स्वरूप धारण करणार. होर्मुझचा मार्ग बंद झाल्यामुळे गॅस इकॉनॉमीवर विपरित परिणाम झाला, हे तर निश्चित आहे. एलपीजी आणि एलएनजी वाहतुकीवर विपरित परिणाम झाला. अल्पकालीन उपाय धोके कमी करू शकतील पण दीर्घकालीन उपायांनी भारताचे सप्लाय धक्के पर्यायी इंधन मिळवण्याची भारताचे सामर्थ्य सिद्ध होईल. एक भारतासाठी दिलासादायक बातमी अशी आहे, की भारत पाईप गॅसची निर्मिती करतो आणि सध्या आसाम आणि आंध्र प्रदेशात भारत या गॅसची निर्मिती करतो.पण भारताची एक समस्या आहे, की भारताची गॅसची गरज केवळ अर्धीच भागते. अर्ध्या लोकसंख्येला एलपीजीवर अवलंबून राहावे लागेल. २०२३ मध्ये भारताचे एकूण गॅस उत्पादन ३६.४ अब्ज क्युबिक मीटर्स इतके होते आणि त्यापैकी ५० टक्के पाईप गॅसचे होते. पण भारताचे बाह्य ऊर्जा गरजांवर अवलंबित्व ही स्थिती स्पष्ट करते.

# राज्याचे सिंचन क्षेत्र आहे तरी किती?

**महाराष्ट्रात २०२३-२४ या वर्षात ४३ टक्के शेतजमीन सिंचनाखाली असल्याचे रिझर्व्ह बँकेचा अहवाल सांगतो. प्रत्यक्षात यात वाढही झालेली असू शकेल... पण महाराष्ट्रात सिंचन क्षेत्राच्या मोजणीशी संबंधित विविध विभागांत ताळमेळ नसल्यानेच, राज्याच्या आर्थिक पाहणीत सिंचनाचे आकडेच... आणि यंदा तर उल्लेखसुद्धा... नसल्याची नामुष्की ओढवते!**

सर्वोत्कृष्ट जल व्यवस्थापन आणि जल संवर्धनाचा सन २०२४चा ६वा राष्ट्रीय पुरस्कार महाराष्ट्राला मिळाला असताना आणि राज्यात सिंचित क्षेत्राचा वाटा ४३ टक्क्यावर पोहोचला असताना शासनाने २०२५-२६च्या महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालातून सिंचित क्षेत्राचा तपशील दर्शविणारे नेहमीचे परिशिष्टच वगळणे, हे आश्चर्यजनकच आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी २०११-१२ वर्षाच्या अहवालात २००१ ते २०१० या दशकात सिंचित क्षेत्रात पिकांखालील स्थूल क्षेत्राच्या तुलनेने केवळ ०.१ टक्का वाढ झाल्याच्या मुद्द्यावरून विधिमंडळात मोठा गदारोळ होऊन तत्कालीन शासनास त्याविषयी श्वेतपत्रिका काढावी लागली होती. परिणामी त्यापुढील आर्थिक पाहणी अहवालांत सिंचित क्षेत्राची आकडेवारी निरंक ठेवणेच शासनाने पसंत केले, तर आता २०२५-२६च्या अहवालातून सदर परिशिष्टच काढून टाकण्यात आले!

राज्यातील सिंचित क्षेत्राची टक्केवारी नेमकी किती हा नेहमीच वादाचा मुद्दा राहिला आहे आणि ताज्या आर्थिक पाहणी अहवालातील अनुल्लेखामुळे तो परत ऐरणीवर आला आहे. एकीकडे राज्यात अशी संभ्रमित परिस्थिती असताना दुसरीकडे रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या (२०२४-२५) अहवालात महाराष्ट्रासह ३१ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील गेल्या २० वर्षांची ( २००४ ते २०२४) निव्वळ व स्थूल सिंचन क्षेत्राची माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार महाराष्ट्रात २०२३-२४ या वर्षात एकंदर ६४.९६ लाख हेक्टर निव्वळ व १०४.५७ लाख हेक्टर स्थूल सिंचित क्षेत्र होते. म्हणजे सिंचित क्षेत्र पिकाखालील स्थूल क्षेत्राच्या ४३ टक्के होते. ही आकडेवारी राज्यातूनच केंद्र शासनाकडे गेली असणार, परंतु राज्यात कोणत्याही शासकीय अहवालात किंवा संकेत स्थळावर ती प्रसिद्ध झाल्याचे दिसत नाही. गेल्या १५ वर्षांपासून राज्य शासन सिंचन क्षेत्राची आकडेवारी का प्रसिद्ध करत नाही हे मोठे कोडेच आहे.

राज्यातील सिंचन क्षेत्राची व्याप्ती राज्यात सिंचनाशी निगडित मुख्यत: जलसंपदा विभाग आणि मृद व जलसंधारण विभाग असले तरी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कृषी विभाग, महसूल विभाग, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, तसेच ऊर्जा विभाग यांचाही संबंध येतो. ऊर्जा विभागामार्फत ५१ लाख कृषिपंपांना वीजपुरवठा केला जात असून ७.४ लाख सौर कृषिपंप बसवण्यात आले आहेत. पाणी-ऊर्जा-अन्न हे तिन्ही घटक परस्परावर अवलंबून आहेत. येत्या काळात उपसा सिंचन व तुषार आणि ठिबक सिंचनाचे प्रमाण वाढत जाऊन ऊर्जेची मागणीही झपाट्याने वाढत जाणार आहे. आजमितीस जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत मोठी, मध्यम व लघु अशी एकूण ३६३६ पूर्ण बांधकाम झालेली धरणे आहेत व त्यात ३७.६ अब्ज घनमीटर उपयुक्त पाणीसाठा होऊन २०२४-२५ या वर्षात ४०.६ लाख हेक्टर स्थूल क्षेत्र सिंचित झाले होते. यात ६५ टक्के क्षेत्र कालवा व नद्यांवर होते तर ३५ टक्के क्षेत्र लाभक्षेत्रातील विहिरीद्वारे सिंचित झाले होते. मृद व जलसंधारण विभागाकडे ६०० हेक्टरपेक्षा कमी लागवडीयोग्य लाभक्षेत्र असलेल्या प्रकल्पांचे नियोजन व कार्यान्वयन केले जाते. यामध्ये लघु सिंचन तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, सिमेंट नालाबांध, वळवणीचे बंधारे, उपसासिंचन योजना, गावतलाव, साठवण तलाव, माजी मालगुजारी तलाव, पाझरतलाव आणि भूमिगत बंधारे इत्यादींचा समावेश होतो. आजपर्यंत १,२१,४४५ पूर्ण झालेल्या लघु सिंचन योजना / संरचनांतून २१.७ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होऊन ९.४ लक्ष हेक्टरचे प्रत्यक्ष सिंचन झाल्याची माहिती त्या विभागाकडे आहे. 'जलयुक्त शिवार अभियाना'तून २.७ अब्ज घनमीटर पाणीसाठा निर्माण होऊन ३९ लाख हेक्टर शेतीसाठी सिंचनाची सुविधा निर्माण करण्यात आल्याचे समजते.

पाणीपुरवठा आणि स्वछता विभागा अंतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेनुसार राज्यात एकूण भूजल उपशाच्या ९१ टक्के (१५.१अब्ज घनमीटर) वापर सिंचनासाठी केला गेला. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या सहाव्या (२०२३ मधल्या) लघु सिंचन प्रगणनेनुसार राज्यात उघड्या विहिरी व बोअरवेलची संख्या ३२.३४ लाख असून भूजलाद्वारे ६०.६ लाख हेक्टर क्षेत्राचे सिंचन होते. भूजल सिंचित क्षेत्रात पाटबंधाऱ्यांच्या लाभक्षेत्रातील विहिरीवर होणारे सिंचनक्षेत्र व लाभक्षेत्राबाहेरील सिंचनक्षेत्र किती यांची स्पष्टता नसल्यामुळे ते दुहेरी मोजले जाण्याचा धोका असतो. कृषी विभागामार्फत तुषार व ठिबक सिंचन योजना व 'मागेल त्याला शेततळे' योजना राबवली जाते. यातून सन १९८६-८७ पासून ते आजतागायत ठिबक सिंचनाखाली २२.३ लक्ष हेक्टर व तुषार सिंचनखाली ९.८ लक्ष असे एकूण ३२.१ लक्ष हेक्टर क्षेत्र आले आहे. कृषी विभाग तसेच काही अशासकीय व सेवाभावी संस्थांमार्फत अंदाजे ६ लाखांपेक्षा जास्त शेततळी बांधली गेली असावीत; परंतु त्यातून सिंचित होणाऱ्या क्षेत्राची आकडेवारी उपलब्ध नाही. अशा प्रकारे विविध विभागाच्या सिंचन कामांची व सिंचित क्षेत्राची माहिती आज विखुरलेल्या स्थितीत आहे. त्यासाठी या सर्व विभागांत समन्वयाची



आवश्यकता आहे.

### सिंचित क्षेत्र कशाला म्हणावे ?

राज्यात सिंचन क्षेत्राचा हिशेब मांडताना अनेक शब्दावलींचा/ संज्ञांचा वापर केला जातो जसे – लाभक्षेत्र, लागवडीयोग्य लाभक्षेत्र, प्रकल्पीय सिंचन क्षमता, प्रत्यक्ष सिंचनक्षम क्षेत्र, निर्मित सिंचन क्षमता, अंतिम सिंचन क्षमता, निव्वळ सिंचित क्षेत्र, स्थूल सिंचित क्षेत्र, सिंचनक्षम क्षेत्राचा वापर, निव्वळ पेरणी क्षेत्र आणि पिकाखालील स्थूल क्षेत्र. सन २०१४ मध्ये राज्य शासनाने स्थापन केलेल्या सिंचनविषयक विशेष चौकशी समितीच्या अहवालात या शब्दावलीचा सविस्तर ऊहापोह केला आहे. वास्तविक या शब्दावलीची उपयुक्तता सिंचन प्रकल्पाचे नियोजन व संकल्पन करण्यापुरती असते. प्रकल्प अहवाल तयार करताना गृहीत धरलेली पीक रचना, कालवा वितरण प्रणालीची वहन कार्यक्षमता, धरणातील येवा इत्यादींमध्ये व प्रत्यक्ष व्यवहारात लक्षणीय फरक झाल्यामुळे 'निर्मित सिंचन क्षमता' व 'प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र' यांत फार मोठी तफावत कायम राहाते. त्यामुळे 'निर्मित सिंचन क्षमता' ही आभासी व दिशाभूल करणारी संज्ञा आहे.

या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय स्तरावर सिंचन क्षेत्राचा हिशेब ठेवताना वापरल्या जाणाऱ्या शब्दावलीचा अभ्यास करणे उपयुक्त ठरेल. संयुक्त राष्ट्राच्या अन्न व कृषी संघटनेने (एफएओ- फूड ॲण्ड ॲग्रिकल्चर ऑर्गनायझेशन) केवळ दोन संज्ञा वापरण्याची शिफारस केली आहे : (१) सिंचनासाठी सुसज्ज क्षेत्र – पिकांना पाणी देण्यासाठी, कार्यरत स्थितीत असलेल्या सिंचन पायाभूत सुविधा आणि उपकरणांनी सुसज्ज असलेले जमिनीचे क्षेत्र. संदर्भवर्षात ही उपकरणे वापरलेली असणे आवश्यक नाही. सिंचनासाठी सुसज्ज क्षेत्रामध्ये कालवे व पाइप वितरण प्रणाली, तुषार किंवा सूक्ष्म सिंचन पद्धतींनी सुसज्ज असलेल्या क्षेत्रांचा समावेश होतो. (२ ) सिंचित क्षेत्र – म्हणजे सर्वेक्षणाच्या संदर्भ दिवसाच्या आधीच्या १२ महिन्यांत किमान एकदा प्रत्यक्ष सिंचन झालेले पिकांचे क्षेत्र होय. पाऊस व हवामान परिस्थिती, पाणी वितरण प्रणालीची भौतिक स्थिती, पिकाला पाणी देण्याच्या पद्धती व सिंचनावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांमुळे, सिंचित क्षेत्र दरवर्षी कमी/जास्त होऊ शकते.

### सिंचित क्षेत्र का मोजायचे?

सद्य:परिस्थितीत पाटबंधारे प्रकल्पांतील सिंचित क्षेत्राची आकडेवारी पूर्णतया संकलित होत नाही. सिंचित क्षेत्राची प्रत्यक्ष मोजणी होत नाही. जलाशयातून/ कालव्यांतून/ नदीतून पाण्याच्या अनधिकृत उपशाचे प्रमाण वाढले आहे. कालव्यात डोंगळे टाकून पाणी चोरी होते. आवर्तन काळात रात्री पाणी नाल्यात वाहाते, अनेक सिंचन प्रकल्पात जलाशयातील पाणी उपसा करून लाभक्षेत्राच्या बाहेर दूर १० कि.मी.पर्यंत पाइपद्वारे नेऊन सिंचन केले जाते. त्याचप्रमाणे पाटबंधारे प्रकल्पाच्या निर्मितीमुळे लाभक्षेत्राच्या बाहेरील क्षेत्रातही साधारण दोन कि.मी. अंतरातील विहिरींच्या झिरप्यात वाढ होऊन त्यांचे सिंचन क्षेत्रही वाढते, परंतु सध्या या प्रभाव क्षेत्रातील सिंचित क्षेत्राची मोजदाद होत नाही. या सर्वांचा परिणाम प्रत्यक्षापेक्षा कमी सिंचित क्षेत्राची नोंद करण्यात होतो. जल व सिंचन आयोगाने (१९९९) शिफारस केल्यानुसार दर १० वर्षांनी प्रत्येक सिंचन प्रकल्पात निर्मित सिंचन क्षेत्राचा व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्राचा आढावा घ्यावा आणि त्यानुसार प्रत्येक प्रकल्पासाठी 'सिंचनासाठी सुसज्ज क्षेत्र' निश्चित करावे. पण भूजल-सिंचित क्षेत्राचा हिशेब ठेवला जात नाही. त्यासाठी कृषी, महसूल, पंचायतराज व ऊर्जा विभागांत समन्वयाची आवश्यकता आहे. रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करून विविध पिकांखालील सिंचित क्षेत्र मोजता येईल, पण तशी सुरुवात राज्य सरकारने करायला हवी. अमेरिकेतील कृषी विभागाच्या (यूएसडीए) 'सिंचन आणि जल व्यवस्थापन सर्वेक्षण' प्रमाणे दर तीन वर्षांनी सिंचनक्षेत्राची राज्यस्तरीय प्रगणना व्हावी. या सर्व उपायांनी राज्यातील सिंचित क्षेत्राचा हिशेब ठेवण्यासाठी नवी दिशा मिळेल असा विश्वास वाटतो.

**डॉ. सुरेश कुलकर्णी**

# अंधश्रद्धाळू महाराष्ट्र

**आपल्या सरकारला आपल्याच नेत्यांना श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्याबाबत प्रशिक्षण द्यावे लागेल. अन्यथा, आपला महाराष्ट्र हळूहळू महाअंधश्रद्धराष्ट्र म्हणून ओळखला जाऊ लागेल.**

महाराष्ट्रातील 'एपस्टिन फाईल ' असे म्हणत सध्या आपल्या महाराष्ट्राची प्रचंड बदनामी सुरू झाली आहे. अशोक खरात नावाच्या कोणा बाबाचे उद्योग सापडले आहेत आणि त्यावरून हा गदारोळ उठला आहे. बाबा-बुवांनी केलेल्या शोषणाची प्रदीर्घ परंपरा असलेल्या महाराष्ट्रातील प्रकरणाला विदेशी एपस्टिनचं नाव देणे हा आपल्या स्वदेशी अस्मितेचा अपमान आहे. 'बुवा तिथं बाया' असे नाटक ज्या महाराष्ट्रात १९६४ साली लिहिले गेले त्या महाराष्ट्राचा या बाबतीतला लौकिक मोठा आहे. सामाजिक परिवर्तनासाठी झटणाऱ्या लोकांची जशी महाराष्ट्रात परंपरा आहे, तशीच समाजाला अंधश्रद्धेच्या गर्तेत नेणाऱ्या बाबा-बुवांची देखील परंपरा या महाराष्ट्राला आहे. आत्ता हा प्रश्न मुख्यत्वे करून लैंगिक शोषणाचा दिसत असला, तरी मुळात हा प्रश्न भयानक वाढत चाललेल्या अंधश्रद्धेचा आहे. कोणती तरी अज्ञात शक्ती या विश्वाच्या मागे कार्यरत असते आणि आम्ही त्या शक्तीवर विश्वास ठेवतो, या वरवर साध्या आणि व्यापक वाटणाऱ्या श्रद्धाळू विचारांपासूनच अंधश्रद्धेकडे जाण्याचा हा प्रवास सुरू होतो.



सध्या आपला महाराष्ट्र झपाट्याने अंधश्रद्धेच्या दरीत कोसळताना दिसत आहे. इतिहास अभ्यासकांना माहिती आहे, एकेकाळी संपन्न आणि तत्त्वज्ञानात प्रचंड चिंतन आणि सखोल अभ्यास असलेला आपला देश असाच हळूहळू अंधश्रद्ध होत गेला आणि शतकानुशतकांच्या गुलामगिरीत अडकला. याला कारण, कोणताही समाज जेव्हा धार्मिकतेच्या बाजूने झुकू लागतो तेव्हा त्याचा सर्वाधिक फायदा धर्माच्या नावाखाली कर्मकांडांचे आणि अंधश्रद्धेचे स्तोम माजवणाऱ्यांनाच होऊ लागतो. आपल्या धर्मातील किंवा परंपरेमधील सगळे काही चांगले, हे एकदा मानले की मग त्यातल्या तांत्रिक परंपरा, अनिष्ट शक्तींना दूर करण्याचे उपाय वगैरेवर पण विश्वास बसू लाभतो. मग इतरांचे अनिष्ट घडावे म्हणून सुद्धा उपाय सुरू होतात. स्वतःला मूल होण्यासाठी इतर मुलांचा बळी देण्याचे 'मानवत हत्याकांड' याच महाराष्ट्रात घडले आहे.

करणी, वशीकरण, एखाद्यावर मूठ मारणे यासारखे प्रकार वर्षानुवर्षे चालत आले आहेत. पण तेव्हाच्या आणि आत्ताच्या स्थितीतील फरक म्हणजे राजकारणी, सेलिब्रिटी, धनाढ्य लोक यातील बरेच जण आता या सर्वांत कधी नव्हे एवढा पुढाकार घेताना दिसतात. पूर्वीही सत्यसाईबाबांना मुख्यमंत्री निवासात बोलावले होते. पण त्यावेळी त्याच्यावर माध्यमांनी प्रचंड टीका देखील केली होती. आता अजितदादांच्या घरासमोर लिंबू-मिरची टाकणे, मंत्री होण्यासाठी रेडा बळी देणे, मंत्र्यांच्या निवासस्थानाच्या अंगणात काळ्या जादूचे साहित्य पुरून ठेवणे असे प्रकार माध्यमे चवीने दाखवतात किंवा त्यावर आडून आडून बोलतात. या सगळ्यावर कडाडू?न टीका करणे, यातील सत्य शोधून काढणे आणि संबंधितांना उत्तरे द्यायला लावणे हे प्रकार होत नाहीत. समाजातील सर्वात असुरक्षित आणि घाबरलेला वर्ग म्हणजे समाजातले राजकारणी, सेलिब्रिटी आणि श्रीमंत लोक. आपण कमावलेला पैसा, स्थान आणि सत्ता कोणत्याही क्षणी जाईल अशी धास्ती असलेले हे लोक जगातल्या कोणत्याही बाबाचे नाव ऐकले की त्याच्यासमोर झुकायला तयार असतात.

शकुन-अपशकुन, मुहूर्त, वास्तुदोष, नावाच्या अक्षरांमध्ये बदल करणे, एखाद्या मंदिरात अभिषेक करणे, होम करणे अशा वरवर निरुपद्रवी वाटणाऱ्या प्रकारांनी कोणी कोणी व्यक्ती प्रतिष्ठीत लोकांमध्ये आपले महत्त्व वाढवू लागतात. त्यातून राजकीय हितसंबंध जोडून देण्याची आणि गुप्त अघोर विद्येचे वलय घेऊन स्वतःचे महत्त्व वाढवण्याची कला अंगी असलेले बाबा-बुवा तर अलगद यांना आपल्या जवळ खेचतात. यांनाही विविध पातळ्यांवर बाबांचे फायदे होतात आणि बाबांनाही यांच्यामुळे फायदे होतात. आणि नेते, अभिनेते, सेलिब्रिटी हे भक्त म्हणून लाभल्यावर सामान्य माणसांनाही हे बाबा महान वाटू लागतात. टुथपेस्टपासून टीव्हीपर्यंत सगळे काही सेलिब्रिटी चेहरे पाहून विकत घेणारा समाज दुसरे करणार तरी काय?

मन अनिष्ट कारणांसाठीचे यज्ञ सुरू होतात, बळी सुरू होतात, अघोरी विद्या सुरू होतात. सुरुवातीला भक्तिभावाने किंवा मनःशांतीच्या दृष्टीने या सगळ्यांकडे बघणारे तरुण-तरुणी, विवाहित स्त्रिया-पुरुष हे हळूहळू यांच्या पाशात गुरफटु लागतात. स्त्रिया तर भक्तिभावाने या शोषणाच्या बळी होतात. विविध बाबा-बुवांच्या दरबारात आपल्या लेकराबाळांना आणि नवऱ्यांना घेऊन हजर असलेल्या बायका दिसल्या की कळते, नरेंद्र दाभोलकरांचा हा महाराष्ट्र कोणत्या दुष्टचक्रात अडकत चालला आहे. आपला समाज या सर्वांतून बाहेर येईल, अशी विसाव्या शतकात निर्माण झालेली आशा झपाट्याने नष्ट होत चाललेली आहे. गावोगावी. गल्लोगल्ली मठ स्थापन होत आहेत. बाबा-बुवांचे भक्त इंटरनेटवरून बाबांची प्रसिद्धी वाढवत आहेत. आपल्या आपल्या बुवांचे अचाट किस्से पसरवत आहेत. बरे, हे किस्से चमत्काराने पैसे मिळवून देणे, मृत्यूपासून वाचवणे, आजार बरे करणे, मूल होणे इथपासून ते बाबांमुळे हवी ती बस मिळाली, घरात हरवलेली किल्ली बाबांमुळेच घरातच सापडली असे क्षुल्लकही असतात.

बरे, कलाकारांनी कलेच्या माध्यमातून यावर प्रहार करावा तर ती आशाही संपत चालली आहे. पूर्वी लोकप्रिय आणि समाजावर प्रभाव असलेले अनेक अभिनेते, लेखक अंधश्रद्धेविरोधी उभे राहताना दिसायचे. नाटकांतून, लोकनाट्यांतून, पथनाट्यांतून देवादिकांचीच प्रतिके वापरून अनेक कलाकार समाजाचे प्रबोधन करायचे. पण जसजसे एकविसावे शतक पुढे सरकु लागले तसे 'तुम्हाला आमचेच देव का दिसतात?... तुम्हाला आमचेच बाबा-बुवा का दिसतात?' असे म्हणून दम देऊन, कधी मारहाण करून आणि सातत्याने ट्रोल करून या सर्व कलाकारांना हळूहळू गप्प केले गेले. आज महाराष्ट्रातल्या कलाक्षेत्रात रुढी, परंपरा अंधश्रद्धा या दृष्टिकोनातून होणारे प्रबोधन जवळजवळ शून्य टक्क्यावर आले आहे. समाजातल्या अनिष्ट रुढी, अंधश्रद्धा या गोष्टी खटकणारे कलावंत आता समाज माध्यमांतून जुजबी आणि सूचक पोस्ट टाकण्यापलीकडे काही करू शकत नाहीयेत. वरपासून खालपर्यत समाजाने धर्माच्या बाबतीत चिकित्सक नाहीच राहायचे, असे ठरवून टाकले आहे. म्हणजे ज्या हिंदू धर्माचे वैशिष्ट्यच 'धर्मचिकित्सा' असे सांगितले जाते त्यानेच चिकित्सा हद्दपार केली आहे. एवढी असंख्य आक्रमणे होऊन, एवढे विविध धर्म या देशात येऊनही ज्या पायावर इथला हिंदू धर्म टिकला आहे तो पायाच आता नष्ट केला जातोय. धर्माच्या आडून भोंदू लोक हिंदू लोकांनाच नाडत आहेत.

त्यामुळे आता सर्वांत मोठी जबाबदारी सध्याच्या सरकारची आहे; कारण हिंदूहिताचे रक्षण करण्याबाबत आम्ही कटिबद्ध आहोत, असे सांगतच त्यांनी सत्ता संपादन केली आहे. आपल्या सरकारला हिंदू समाजाची काळजी घ्यायची असेल तर आत्ता महाराष्ट्रात असलेल्या सर्व बाबा-बुवांच्या मठांवर, संस्थांवर मंदिरांवर लक्ष ठेवण्याचे काम त्यांना करावे लागेल. तिथल्या आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवावे लागेल. तिथे येणाऱ्या भक्तांची अडवणूक आणि फसवणूक होत नाहीये ना हे पाहावे लागेल आणि ती तशी होत असेल तर त्यावर योग्य ती कारवाई करावी लागेल. हिंदू धर्म म्हणजे काळी जादू, अघोरी यज्ञ, कर्मकांड नव्हे, हे त्यांना आपल्याच नेत्यांचे अभ्यासवर्ग घेऊन सांगावे लागेल.

**-सचिन मोटे**

# पश्चिम विदर्भात शिवसेनेची संघटनात्मक मोर्चेबांधणी वेगात !

## पश्चिम विदर्भ विभागीय संपर्क प्रमुखपदी मंत्री संजय राठोड, सह संपर्क प्रमुखपदी पराग पिंगळे यांची निवड





**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : राज्यातील बदलत्या राजकीय पार्श्वभूमीवर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने शिवसेनेने संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर संघटन विस्ताराचा निर्णय घेण्यात आला असून, विविध स्तरांवर नव्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.या निर्णयानुसार पश्चिम विदर्भ विभागीय संपर्क प्रमुखपदी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर सह संपर्क प्रमुखपदी पराग पिंगळे यांची निवड करण्यात आली आहे.

या विभागात यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम आणि बुलढाणा या जिल्ह्यांचा समावेश असून, पक्षाची धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद वाढवणे हा मुख्य उद्देश आहे.पक्षाच्या अधिकृत निवेदनात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी ही नव्या संघटनात्मक फळी उभारण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. "कार्यकर्ता हाच पक्षाचा कणा" या ब्रीदाखाली स्थानिक पातळीवर सक्षम नेतृत्व निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. मंत्री संजय राठोड यांच्या प्रशासकीय अनुभवामुळे आणि विदर्भातील व्यापक जनसंपर्कामुळे पक्षविस्ताराला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. तसेच पराग पिंगळे यांच्या संघटन कौशल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये समन्वय अधिक मजबूत होईल, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे.या नियुक्त्यांमुळे पश्चिम विदर्भातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी महापालिका, जिल्हा परिषद व इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही संघटनात्मक मोर्चेबांधणी निर्णायक ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# दुर्गादेवी चौकात वाहतूक कोंडी

## विद्यार्थ्यांपासून रुग्णांपर्यंत सर्वांनाच त्रास



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - शहरातील कॉलेज रोडवरील दुर्गा देवी चौक येथे सकाळच्या वेळेत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः सकाळी ७ ते ८ या वेळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या बसेस, महामंडळाच्या बसेस तसेच सिमेंटने भरलेले सहा चक्का व आठ चक्का ट्रक यांची मोठी गर्दी होते.

टोल टॅक्स टाळण्यासाठी किंवा चुकीच्या मार्गाने येणाऱ्या जड वाहनांमुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनत आहे. या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तसेच शासकीय रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णांना बसत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सकाळी ७ ते ९ तसेच ११ ते १२ या वेळेत वाहतूक पोलिस किंवा शहर पोलिसांची प्रभावी उपस्थिती नसल्यामुळे बेकायदेशीर वाहतूक वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने सकाळच्या गर्दीच्या वेळेत विशेष मोहीम राबवून वाहतूक नियंत्रणासाठी कडक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेषतः जड वाहनांवर निर्बंध आणणे आणि चौकात नियमित पोलिस बंदोबस्त ठेवणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. दरम्यान, ही गंभीर बाब लक्षात घेऊन पोलीस स्टेशन पांढरकवडा यांनी तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# अहिंसेचा जयघोषात भव्य प्रभात फेरी व मोटर स्कूटर रॅली संपन्न



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सवानिमित्त भारतीय जन संघटना, यवतमाळच्या वतीने आज शहरात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. पहाटे साडेसात वाजता बोरास्थान येथून निघालेल्या प्रभात फेरीने संपूर्ण शहरात भक्तिमय वातावरण निर्माण केले. ही प्रभात फेरी शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत राजेंद्र नगर येथील श्रीमद राजचंद्र ज्ञान मंदिर येथे विसर्जित झाली.

"अहिंसा परमोधर्म", "वंदे वीरम" आणि "भगवान महावीर की जय" अशा घोषणांनी संपूर्ण यवतमाळ शहर दुमदुमून गेले.यानंतर सकाळी साडेनऊ वाजता सिव्हिल लाईन परिसरात भगवान महावीर मार्गाच्या अंकाचे अनावरण करण्यात आले. या प्रसंगी जनसेवा समितीचे अध्यक्ष महावीर भन्साली, युवा समितीचे अध्यक्ष श्याम भन्साली, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. संजय जैन, डॉ. रमेश खिवसरा, विजयकुमार बुंदेला, उमेश बैद, संदीप कोचर, आदेश लुणावत, दीपक बोरा, प्रशांत दर्डा, पुखराजजी झांबड, श्रीचंद बोथरा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सकाळी दहा वाजता आराधना भवन येथून भव्य अहिंसा मोटर स्कूटर रॅलीला प्रारंभ करण्यात आला. या रॅलीला महावीर भन्साली, डॉ. रमेश खिवसरा, गौतम कटारिया आणि माजी जिल्हाध्यक्ष विजय कोटेचा यांनी हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. शहरातील विविध ठिकाणी रॅलीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले तसेच नागरिकांसाठी शीतपेयाची व्यवस्था करण्यात आली. दत्त चौक परिसरात विश्व हिंदू परिषदेतर्फे पुष्पवर्षाव करून रॅलीचे भव्य स्वागत करण्यात आले. या रॅलीचा समारोप वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय येथे झाला. यावेळी रुग्णांना फळे व बिस्किटांचे वितरण करण्यात आले तसेच नंदादीप फाउंडेशनच्या वतीने बेघर रुग्णांसाठी भोजनदानाचा उपक्रम राबविण्यात आला. दरम्यान, केसरिया भवन येथे महिला मंडळाच्या वतीने गौतम प्रसादीचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांना जैन समाज बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भगवान महावीरांच्या अहिंसा, सेवा व करुणेच्या संदेशाने यवतमाळ शहर आज अक्षरशः भारावून गेले.

## • वेचक

### दत्तापूर येथे श्रीमद् भागवत कथा



घाटंजी - तालुक्यातील दत्तापूर येथे चैत्र शु. 8गुरुवार दि. 26 मार्च 2026 पासून ते चैत्र शु. पौर्णिमा गुरुवार दि. 2 एप्रिल 2026 पर्यंत भागवत कथा प्रवक्ते श्री सतगुरू जगन्नाथदास ह. प. भ. श्री. दिगांबर महाराज वाघाडे यांच्या सुमधुर वाणीतून भागवत कथेचे आयोजन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.हनुमान जयंतीच्या पावन पार्वाच्या निमित्ताने भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून दि. 26 मार्च ला ह. भ. प. दिगांबर महाराज वाघाडे सोनखासयांच्या हस्ते हनुमान मंदिरावर कळस चढवून होमहवन व अभिषेक करण्यात आलेआणि भागवत कथेला सुरुवात करण्यात आली दररोज कथेची वेळ सकाळी 9 ते 11आणि दुपारी 4 ते 6अशी ठेवण्यात आली आहे. हनुमान जयंतीच्या दिवशी म्हणजे भागवत कथा समाप्तीला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.भागवत कथेला गावातून चांगला प्रतिसाद मिळत असून गावातील सामाजिक एकता घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून भागवत कथेचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

# समग्र शिक्षा अंतर्गत न. प. उर्दुशाळेत विद्यार्थ्यांना आत्मरक्षण प्रशिक्षणाचे धडे




**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - येथील हाजी रफीक अहमद लोहार नगरपरिषद उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्र. २ मध्ये आज समग्र शिक्षाअंतर्गत महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. सन २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता ६वी व ७वी मधील विद्यार्थिनींना राणी लक्ष्मीबाई आत्मारक्षण प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत आत्मरक्षण प्रशिक्षण व परीक्षण देण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश मुलींमध्ये आत्मविश्वास वाढवणे, संकटाच्या प्रसंगी स्वतःचे संरक्षण करण्याची क्षमता विकसित करणे आणि शारीरिक तसेच मानसिक सक्षमीकरण साधणे हा आहे. प्रशिक्षित मार्गदर्शकांच्या उपस्थितीत विद्यार्थिनींनी विविध आत्मरक्षण तंत्रांचे प्रात्यक्षिक सादर केले.

शाळेच्या मुख्याध्यापकांसह शिक्षकवर्ग आणि पालकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थिनींनीही उत्साहाने सहभाग नोंदवत आत्मरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. समग्र शिक्षाअंतर्गत अशा प्रकारचे उपक्रम ग्रामीण व शहरी भागातील मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# सत्यनिर्मिती महिला मंडळातर्फे ईद मिलन सोहळा उत्साहात



**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - शहरातील सत्यनिर्मिती महिला मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ईद मिलन सोहळ्याचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. जातीय सलोखा व सामाजिक एकता दृढ व्हावी या उद्देशाने आयोजित कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.

मंडळाच्या मुख्य कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात तालुक्यातील सर्व समाजातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार, महसूल व पोलीस प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी तसेच विविध राजकीय पक्षांचे नेते सहभागी झाले. उपस्थित पाहुण्यांचे अल्पोपहारासह पारंपरिक 'शाही शिरखुर्मा' देऊन स्वागत करण्यात आले. गेल्या वीस वर्षांपासून सत्यनिर्मिती महिला मंडळ ईद मिलन कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करत असून सामाजिक एकतेचा संदेश देत आहे. याशिवाय रामनवमी, शिवजयंतीनिमित्त पेयजल वाटप, 'बेटी पढाओ' अभियान, महिला सशक्तीकरण उपक्रम, स्वच्छता अभियान आदी विविध सामाजिक कार्यक्रम मंडळ राबवत आहे.

राष्ट्रीय अध्यक्षा शबाना खान शहादत खान यांच्या नेतृत्वाखाली कोणतेही अनुदान न घेता स्वतःच्या खर्चातून हा उपक्रम राबविला जात असून "हिंदू-मुस्लिम भाईचारा" या संदेशाला बळ मिळत आहे. यंदाचा ईद मिलन सोहळा आनंददायी वातावरणात यशस्वीपणे पार पडला.

# भीम आर्मीतर्फे ५ एप्रिलला सामान्य ज्ञान स्पर्धाचे आयोजन

## १७३५ विद्यार्थ्यांची नोंदणी



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भीम आर्मी भारत एकता मिशन, यवतमाळ जिल्हा यांच्या वतीने सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. ही परीक्षा रविवार, ५ एप्रिल २०२६ रोजी पुसद येथील बोरगडी रोड, लक्ष्मीनगर परिसरातील वानरे मंगल कार्यालयात होणार असून, यापूर्वी ठरविण्यात आलेल्या खुल्या मैदाना ऐवजी परीक्षा स्थळात बदल करण्यात आला आहे.

या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सामान्य ज्ञानाची आवड निर्माण करणे, स्पर्धात्मक परीक्षांसाठी प्रेरणा देणे तसेच सामाजिक व शैक्षणिक प्रगतीस चालना देणे हा आहे. जिल्हाभरातून मोठ्या प्रतिसादात एकूण १७३५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. कार्यक्रमास भीम आर्मीचे राष्ट्रीय अध्यक्ष विनयरतन सिंग प्रमुख उपस्थितीत राहणार असून, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष अशोक कांबळे अध्यक्षस्थानी असतील. उद्घाटन खासदार संजय देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. तसेच नगराध्यक्ष मोहिनी नाईक (पुसद), पंचशिला इंगोले (दिग्रस) व नालंदा भरणे (आर्णी) यांची उपस्थिती लाभणार आहे. स्पर्धा कनिष्ठ (इयत्ता ५ ते ७) व वरिष्ठ (इयत्ता ८ ते १०) अशा दोन गटांत होणार आहे. दोन्ही गटांमध्ये प्रथम क्रमांकासाठी ११ हजार रुपयांसह सात क्रमांकांपर्यंत रोख बक्षिसे, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र दिले जाणार आहेत. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या उपक्रमाचे स्वागताध्यक्ष अशोक भालेराव असून, तहसीलदार राम बोरगावकर मार्गदर्शन करणार आहेत. सूत्रसंचालन उत्तम कानिंदे, नरेंद्र पाटील व दीपक भवरे करणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/२४१/२०२६
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- १७/०३/२०२६

**जाहीरनामा**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार साजीद खान वजीर खान रा उमरखेड. ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची बहीण नामे नसरीन सुलताना वजीर खान जन्म दिनांक-09/07/1976 मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 30.03.2026 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# बाभूळगाव येथे भगवान महावीर जयंती उत्साहात साजरी



**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभूळगाव - येथे सकल जैन समाज यांचे वतीने भगवान महावीर यांचा जय जयकार करीत शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. सकाळी आठ वाजता येथील जैन स्थानका समोर सर्व समाज बांधव व गावातील प्रतिष्ठित नागरिक गोळा झाले यानंतर भगवान महावीर यांचा जयघोष करीत गावातील प्रमुख मार्गाने शोभायात्रा काढण्यात आली यात्रेदरम्यान येथील दिनेश वर्मा यांचे कडून थंडपेय ची व्यवस्था करण्यात आली होती सदर मिरवणूक गावातून फिरुन जैन स्थानकात पोचल्यानंतर भगवान महावीर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमानंतर आयोजित केलेल्या महाप्रसादाचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला. मिरवणुकी मध्ये समाज बांधवांसह गावातील प्रतिष्ठित नागरिक सहभागी झाले होते.

# संध्या रणवीर यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता गौरव राज्यस्तरीय पुरस्कार



**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - तालुक्यातील काळी दौ येथील सामाजिक कार्यकर्त्या संध्या संदेश रणवीर यांना त्यांच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल "डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता गौरव राज्यस्तरीय पुरस्कार" प्रदान करण्यात आला. डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान नांदेड यांच्या वतीने आयोजित सोनारी फाटा, हिमायतनगर येथील 9 व्या बौद्ध धम्म परिषदेत प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

सन्मानपत्रावर माजी आमदार माधवराव पाटील जळगांवकर, खासदार नागेश पाटील आष्टीकर, माजी खासदार रवींद्र चव्हाण, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, नगराध्यक्ष शेख रफिकभाई तसेच संयोजक त्रिरत्नकुमार भवरे यांच्या सह्या आहेत.संध्या रणवीर यांनी शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी व महिलांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. शेतकरी कर्जमाफी, अतिवृष्टीग्रस्तांना मदत, स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन, महिलांना शिलाई मशीन वाटप, तसेच विविध सामाजिक प्रश्नांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या या कार्यातून समाजात समतेची जाणीव निर्माण होत असून त्यांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. त्यांच्या कार्यामुळे त्या महिला व युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत.

# S.I.R. मॅपिंग कॅम्प ; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## ईतर प्रभाग मध्ये कॅम्प घेणे गरजेचे



**जनमाध्यम प्रतिनिधी**

आर्णी - शहरातील प्रभाग क्र. 2 व 5 येथील नगरसेवकांच्या पुढाकारातून S.I.R. मॅपिंगसाठी तीन दिवसीय विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक 27, 28 आणि 29 रोजी पार पडलेल्या या कॅम्पला स्थानिक नागरिकांचा मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मॅपिंग प्रक्रियेत सहभाग घेतला व प्रशासनाच्या या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला. या कॅम्पदरम्यान नायब तहसीलदार अडमुलवार यांनी भेट देऊन कामाची पाहणी केली व उपक्रमाचे कौतुक केले. या कॅम्पच्या यशस्वी आयोजनासाठी परिसरातील युवकांनीही मोलाचे सहकार्य केले. अमन शेख, अनिस खान, सलमान पठाण, सोहेल शेख, नुरोद्दीन शेख, अलीम देशमुख आणि शामोद्दीन शेख यांनी विशेष मेहनत घेत कॅम्प यशस्वी करण्यासाठी योगदान दिले. या उपक्रमाचे आयोजन स्वीकृत नगरसेवक साजिद बेग, माजी उपसरपंच मोहिबोद्दीन शेख,नगरसेवक अशफाक शेख आणि नगरसेवक परसराम कुमरे यांनी केले होते. त्यांच्या नियोजनामुळे कॅम्प सुरळीत पार पडला असून नागरिकांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी ठरल्याचे आयोजकांनी सांगितले.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/२४४/२०२६
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- १७/०३/२०२६

**जाहीरनामा**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार साजीद खान वजीर खान रा उमरखेड. ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची बहीण नामे शिरीण सुलताना वजीर खान जन्म दिनांक-13/04/1984 मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 30.03.2026 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/२३८/२०२६
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- १७/०३/२०२६

**जाहीरनामा**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नुसरत परवीन शेख अहेमद रा उमरखेड.ता.उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची स्वताची जन्म दिनांक-02/01/1986 मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 30.03.2026 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/२४७/२०२६
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- १७/०३/२०२६

**जाहीरनामा**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार साजीद खान वजीर खान रा उमरखेड.ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची बहीण नामे परवीन सुलताना वजीर खान जन्म दिनांक-०१/०९/१९६८ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक ३०.०३.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/२५०/२०२६
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- १७/०३/२०२६

**जाहीरनामा**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **मोहम्मद सलीम शेख इब्राहीम रा. उमरखेड. ता. उमरखेड जि. यवतमाळ** यांनी अर्ज सादर केला की, त्यांची बहीण नामे **शाहीनबानो मोहम्मद इब्राहीम जन्म दिनांक** -१५/०७/१९८० मौजा सुकळी ता. उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्म नोंद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक -30.03.2026 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# बिस्कीटात 'पार्ले' राहिले नावापुरते!

**भा**रताती इंडिगो या विमान कंपनीचे मालक दिल्लीहून बंगलोरला जात असताना विमानात चहाच्या ग्लासमध्ये पार्ले जी बिस्किट बुडवून खात असून शेजारी बिस्कीटांचा पाच रुपये किमतीचा पुडा आहे, असा एक फोटो व्हायरल झाला होता. इंडिगोची वार्षिक १७ हजार कोटी रुपयांची उलाढाल आहे आणि देशातील हवाई वाहतुकीत त्या कंपनीचा ६६ टक्के हिस्सा आहे. त्या कंपनीचा मालक पार्ले जी बिस्कीट चहात बुडवून खाईल, यावर विश्वासच बसेना. म्हणून खातरजमा केली, तर ते खरंच निघाले. देशात असंख्य प्रकारची व महागडी बिस्कीटं असली तरी गरीब व श्रीमंत यांनी ते बिस्कीट खाल्लेले असते वा अतिश्रीमंतही ही बिस्कीटे खातात, याची खात्री झाली.

पूर्वी पश्चिम उपनगरांतून चर्चगेटच्या दिशेने प्रवास करत असताना ट्रेन अंधेरी सोडून पुढे गेली की पार्ले ग्लुकोज बिस्कीटांचा वास येई. बिस्कीटे भाजली जात असल्याचा तो दरवळ गाडीभर पसरे. अनेकांची भूक खवळून उठे. गाढ झोपेतला प्रवासीही या घमघमाटाने जागा व्हायचा. ट्रेन पार्ल्याच्या जवळ आलीय, हे कळायचे. किती वर्षं तरी मुंबईकरांनी रेल्वेने येता जाता त्या वासामुळे मनात ती बिस्कीटे खाल्ली असतील. पूर्वी बिस्कीट म्हणजे पार्ले असंच वाटायचे. तेव्हा पार्ले ग्लुकोज म्हणून ती ओळखली जात. पुढे १९८० वा १९८२ च्या दरम्यान ती पार्ले जी झाली. 'जी' चा अर्थ म्हणे जिनियस, प्रतिभावान. खरे तर बिस्कीटाचा व प्रतिभावान असण्या वा होण्याचा संबंध नाही. पण पार्ले जी हे सुटसुटीत नाव लोकांच्या तोंडी बसले. आजही देशातील सर्वात लोकप्रिय व सर्वाधिक खाल्ले जाणारे हे बिस्कीट आहे.

खोटे वाटेल, पण देशात प्रत्येक सेकंदाला ४५०० 'पार्ले जी' बिस्कीटे खाल्ली जातात आणि रोज ४० कोटी बिस्कीटे तयार होतात. देशातील सर्व शहरात व कानाकोपऱ्यातील मोठ्या छोट्या ५० लाखांहून अधिक दुकानांत ही बिस्कीटे विक्रीसाठी ठेवलेली असतात. भारताखेरीज अमेरिका, इंग्लंड, न्यूझीलंड, फ्रांस, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, दुबई, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका, भूतान अशा असंख्य देशांमध्ये मिळतात आणि खाल्ली जातात. यावरून या बिस्कीटांची लोकप्रियता लक्षात यावी. देशात खाल्ल्या जाणाऱ्या बिस्कीटांमध्ये पार्ले जीचा वाटा आहे सुमारे ५० टक्के. एके काळी तो ६५ टक्क्याहून जास्त होता. भारतातील १२९ फॅक्टरीजमध्ये रोज या बिस्कीटांचे उत्पादन होते. सर्वात स्वस्त म्हणून ओळखले जाणारे हे बिस्कीट कुठेही तयार होऊ देत, पण नावात मात्र पार्ले असणारच. कारण या बिस्कीटांचा जन्मच झाला आहे विलेपार्ल्याच्या पूर्व भागातील एका छोट्याशा कारखान्यात.

आजपासून आणखी तीन वर्षांनी म्हणजे १९२९ साली पार्ले प्रोडक्ट या कंपनीला १०० वर्षं पूर्ण होतील. कंपनी पार्ल्यात म्हणूनच नाव पार्ले प्रोडक्ट ठेवले गेले. मालक मोहनलाल चौहान यांनी १९२९ साली विले पार्ल्याच्या पूर्वेकडील एक बंद कारखान्याची जागा विकत घेऊन



तिथे टॉफी व मिठाई बनवणे केले. सुरुवातीची काही वर्षं तिथे बिस्कीटं बनतही नव्हती. जेमतेम १३ कामगार काम करायचे. त्यांनी १९३८ साली बिस्कीटांचे उत्पादन सुरु केले अन १९३९ साली पार्ले ग्लुकोज नावाने बिस्कीटे बाजारात आणली. असे म्हणतात की हे पहिले पूर्णतः भारतीय बिस्कीट. तोपर्यंत ब्रिटिश कंपन्यांची बिस्कीटेच बाजारात होती आणि इराणी रेस्टॉरंटमध्ये तयार केलेली बिस्कीटे फक्त तिथंच विकली जात. आजच्या घडीला दरवर्षी सुमारे सात ते आठ हजार कोटी रुपयांची ही बिस्कीटे विकली जातात. याखेरीज क्रॅकजॅक, मोनॅको, हाईड अँड सीक, मेलडी, पॉपिन्स, न्यूट्रीक्रंच, पार्ले रस्क वगैरे उत्पादनंही त्याच कंपनीची. पण नुसते पार्ले म्हटले की आठवते ते आयताकृती ग्लुकोज बिस्कीट. पुढे अनेक कंपन्यांनी ग्लुकोज बिस्कीटे बनवली. पण बाजारामध्ये त्यांचा फारसा निभाव लागलाच नाही.

खरे तर पार्ले जी बिस्कीटात फारशी पोषक तत्व नाहीत. आहे मैदा, साखर, पाम तेल आणि थोडे दूध. साखर व कार्बोहायड्रेट्स असल्याने बिस्कीट खाल्ल्यावर शरीराला थोडी ताकद मिळते. पण ६८ टक्के मैदा व त्यातील साखर यांमुळे वजन वाढण्याची वा मधुमेह होण्याची शक्यता अधिक. खरे तर बहुसंख्य बिस्कीटात मैदा व साखर असल्याने ती खायचं टाळा, असे हल्ली डॉक्टर्स सांगतात. पण भारतासारख्या गरीब देशातील लाखो, करोडो लोकांना सकाळी नाश्ताही परवडत नाही. त्यामुळे एक चहा आणि पाच रुपयांचे पार्ले जीचे पाकीट याद्वारे ते सकाळची न्याहारी आटोपतात. ही बिस्कीटे लोकप्रिय असण्याचे कारण त्यांची कमी किंमत हे आहे. शिवाय लहानपणापासून याच बिस्कीटांची सवय झाल्याने मोठे वा वृद्ध झाल्यावरही तीच खाल्ली जातात. इंडिगोचे मालक ती खातात, याचे कारण लहानपणाची सवय आणि आवड हेच असणार.

आता हे सर्व सांगण्याचे कारण विलेपार्ले पूर्वेला जिथे ही बिस्कीटे तयार व्हायची, त्या फॅक्टरीचं बांधकाम तोडायला सुरुवात झाली आहे. सुमारे १५ एकर जागेवर आतापर्यंत २१ बांधकामे होती. त्या जागेत उत्पादन, पॅकिंग, कार्यालय असे सारे होत असे. ती बांधकामे खूप जुनी झाल्याने पाडण्याची परवानगी कंपनीने सरकारकडे मागितली होती. येथील बिस्कीटांचे उत्पादन तर कंपनीने १० वर्षांपूर्वी, २०१६ साली थांबवले. तेव्हाच या फॅक्टरीच्या जागी उंच इमारती येणार, इथे पुन्हा कधीही बिस्कीटे तयार होणार नाहीत, हे कळले होते. तिथं ५ इमारती बांधायला राज्य व केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. त्या जागेचा वापर अर्थातच व्यावसायिक वापरासाठी होणार आहे. फॅक्टरीच्या जागेत वेगवेगळी किमान १२५ झाडे होती. ती पाडली जाणार असून, त्या जागी जपानी पद्धतीची मियावाकी झाडे लावली जाणार आहेत. आज बिस्कीट फॅक्टरी तरी येता जाता दिसते. तीही काही वर्षांनी इतिहास बनून जाणार.

आधी मुंबईतल्या कापड गिरण्या बंद पडल्या, इंजिनीरिंग उद्योग बंद झाले, छोट्या सिल्क गिरण्या दिसेनाशा झाल्या, अनेक इंडस्ट्रियल इस्टेट बंद पडल्या, एमआयडीसीमध्ये उद्योग राहिले नाहीत, आग्रा रोडच्या औषध कंपन्या नाहीशा झाल्या अन जगभर विलेपार्ल्याचे नाव पोहोचवणारी कंपनीही आता नाहीशी होत आहे. या बिस्कीटांच्या जाहिराती काळ्या-पांढऱ्या, रंगीत जाहिराती नियमित दिसायच्या, आधी त्यात गाय असायची, मग मुलीचे चित्र दिसू लागले, नंतर बिस्कीटचे नावच बदलले. आता बिस्कीट फॅक्टरीच्या जागी वेगळ्या इमारती येणार. लोक यापुढेही पार्ले जी खात राहतील. पण त्यात 'पार्ले'चे महत्व नाममात्र राहिले असेल.

(पूर्वप्रसिद्धी : नवशक्ति)

**-संजीव साबडे**

# दर दीड मिनिटाला एक बॉम्ब, क्षेपणास्त्र किंवा ड्रोन..असे गेले ३० दिवस!

**अ**मेरिका इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्याच्या एक महिन्यातील किंमती!या तीस दिवसात दोन्ही बाजूकडून ३०,००० विविध प्रकारची क्षेपणास्त्रे, ड्रोन, बॉम्ब परस्परांच्या ठिकाणांवर टाकण्यात आले आहेत. ३० दिवस म्हणजे जवळपास ४३,००० मिनिटे होतात. म्हणजे सरासरी दीड मिनिटाला एक!

या हल्ल्यात जवळपास १५,००० ठिकाणे कमी जास्त उध्वस्त, काही पूर्ण नामशेष झाली आहेत. यात लष्करी तळ, पायाभूत सुविधा, ऊर्जा सुविधा आणि नागरी वस्त्यांचा समावेश आहे. सर्व देशांचे मिळून ८,७०० नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. तर ३४,००० नागरिक गंभीर, कमी गंभीर जखमी झाले आहेत. यातील सर्वाधिक अर्थात इराण मधील



आहेत.

आतापर्यंत ५९० बिलियन डॉलर्स म्हणजे ५० लाख कोटी रुपये, म्हणजे भारताचा यावर्षीच्या अर्थसंकल्पाएवढी साधनसामुग्री खर्च किंवा नामशेष झाली आहे.. फक्त ३० दिवसात सर्वात जास्त नुकसान इराणच्या अर्थव्यवस्थेचे झाले आहे. अंदाजे १३ लाख कोटी रुपये.युद्ध सुरू होण्यापूर्वी इराण दररोज ११०० कोटी रुपयांचे तेल निर्यात करायचा.जो त्याचा सर्वात मोठा आर्थिक स्त्रोत आहे. ती निर्यात जवळपास बंद पडली आहे. युद्धामुळे इराणची २० टक्के जीडीपी कमी होईल. जवळपास ४ कोटी नागरिक दारिद्र्य रेषेखाली ढकलले जातील.

अमेरिका दररोज एक बिलियन डॉलर्स म्हणजे ९०,०००कोटी रुपये तर इस्रायल जवळपास तेवढेच दररोज युद्धावर खर्च करत आहेत.जगातील जवळपास ३० मोठ्या अर्थव्यवस्था यामुळे कमीजास्त बाधित झाल्या आहेत. मुख्य कारण अर्थातच ऊर्जेचा तुटवडा, महाग ऊर्जा, खते, पेट्रोकेमिकल आधारित उद्योग ठप्प झाल्यामुळे. त्यांच्या आयात निर्यातीवर विपरीत परिणाम झाला आहे. होणार आहे. या वर्षात विविध अंदाजानुसार जगाची जीडीपी ०.५ ते ३ टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते.

सर्वात गंभीर परिणाम पर्यावरणावर होत आहेत. होणार आहेत. हवा, पाण्याचे होणारे प्रदूषण झालेच. पण मोठ्या प्रमाणावर जमिनी शेतीसाठी, वस्त्यांसाठी किंवा मानवी उपयोगासाठी निरुपयोगी होतील.

आणि मानवी यातना? रक्ताची, जवळची माणसे, त्यात अनेक आपल्या पोटची मुले मुलीष्ठडोळ्यादेखत मरणे? जी मेली नाहीयेत पण जायबंदी, कदाचित कायमची, झाली आहेत त्यांना बघणे? कोणते स्टॅटिस्टिकल मॉडेल एवढे प्रगत आहे की मानवी यातनांचे मूल्यांकन करू शकेल?हा झाला फक्त ३० दिवसांचा हिशोब. अजून किती दिवस?अजून किती उध्वस्त?अजून किती मानवी यातना?

इराणमधीलच नाही तर जगभरातील कोट्यवधी लोक प्रार्थना करत आहेत की हे जे काही सुरू आहे ते लवकरात लवकर थांबावे.रक्तपिपासू नेत्यानाहू बाजूला ठेवूया. एक कोटी नागरिक ५० राज्यातील ३२०० शहरात एकाचवेळी रस्त्यावर उतरतात त्या स्वतःला लोकशाही प्रणालीचा देश म्हणवणाऱ्या अमेरिकेत त्या वेड्या इसमाच्या नाकात वेसण घालणारी एकही काउंटर शक्ती/संस्था नाही? लोकशाही म्हणजे चेक्स अँड बॅलॅन्सेस सांगितले जाते,कोठे आहे काउंटर फोर्स?

**संजीव चांदोरकर**

(आकडेवारी संदर्भ:गार्डीयन २९,मार्च २०२६)

# ग्रंथालय कर्मचारी यांच्या पदरी निराशा

**म**हाराष्ट्र राज्य हे पुरोगामी लोकशाहीचे राज्य आहे. महाराष्ट्रात १९७० साली ग्रंथालय कायदा तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केला आणि 'गाव तिथे ग्रंथालय' ही चळवळ अस्तित्वात आणली. ज्या उद्देशाने ध्येय धोरणाने तत्कालिन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी योजना सुरू केली त्याची अंमलबजावणी सध्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडून अपेक्षापूर्ती होत नाही.ग्रंथालय कायदा होऊन ५८ वर्षे झाली पण महाराष्ट्रातील ११९५५ ग्रंथालयात २०३३५ कर्मचारी तुटपुंज्या वेतनावर काम करीत आहेत. किमान वेतन पासून वंचित राहिला आहे ४०% अनुदान वाढ,कर्मचारी यांना किमान वेतन मिळण्यासाठी ११ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात विधानभवनवर मोर्चा काढला होता. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी शब्द दिला होता पण काही केले नाही. किती वेळा शासनानाला सांगायचे तत्कालीन अर्थमंत्री आ.सुधीर मुनगंटीवार यांनी किती वेळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले आहेत. वास्तविक पाहता मुख्यमंत्री



यांनी पावसाळी अधिवेशनात ४०% अनुदान वाढ दर्जा बदल व नवीन ग्रंथालय मान्यतासाठी तत्वतः मान्यता देऊन अर्थ खात्याकडे फाईल मंजूरीसाठी पाठवली होती.

आज अर्थ खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे आहे. त्यांना वाचन संस्कृतीचे पाईक असणाऱ्या ग्रंथालय कर्मचारी यांच्या हितासाठी उचित निर्णय घ्यावे वाटले नाही. चालू अर्थसंकल्पात तरतूद केली नाही. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात १८ डिसेंबर २०२३ मध्ये बैठक घेऊन सांगितले होते की, लवकरच मागण्या संदर्भात निर्णय घेतले जातील वास्तविक पाहता ४०% अनुदान वाढीसाठी ४२ कोटी रक्कमेची तरतूद करण्यात आली नाही जर पुढील कॅबिनेट बैठकीत निर्णय न झाल्यास येत्या पावसाळी अधिवेशनात मुंबई विधानभवनवर मोर्चा काढण्यात येईल.

**सदाशिव बेडगे**

अध्यक्ष म.रा.सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषद

# सुका मेवा महाग, तर इन्स्टंट फूड तेजीत

**इराण हा सुक्या-मेव्याचा मुख्य पुरवठादार देश असल्याने या पदार्थाच्या किमतीत प्रचंड वाढ होत आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या गॅसच्या कमतरतेमुळे 'रेडी टू इट' पदार्थाच्या मागणीत वाढ झाल्याचे दिसते. अशा परिस्थितीमध्ये पेट्रोल, डिझेल न वापरणारा देश म्हणून आईसलँडचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

**संघर्षाचा परिणाम बाजारपेठांवर**

**प**श्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम आता थेट भारतातील बाजारपेठांवर दिसू लागला आहे. ड्रायफ्रूट्सच्या किमतीत २० ते ५० टक्क्यांपर्यंत झालेली वाढ ही केवळ आकड्यांची बाब नसून, जागतिक घडामोडींचा स्थानिक अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाचा ठोस पुरावा आहे. दिल्लीतील चांदणी चौक परिसरातील खारी बावली ही आशियातील सर्वात मोठी मलाला आणि ड्रायफ्रूट घाऊक बाजारपेठ आहे. ही बाजारपेठ सध्या या संकटाचा केंद्रबिंदू ठरली आहे. पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने व्यापारी जुना साठा वापरून व्यवहार करत आहेत, काजू वगळता बहुतांश ड्रायफ्रूट्स पश्चिम आशियातून आयात केले जातात. सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत ही आयात जवळपास ठप्प झाली आहे. रमजान आणि ईदसारख्या सणांच्या पार्श्वभूमीवर खजुराची मागणी वाढत असताना पुरवठा मात्र मर्यादित असल्याने किमतीने मोठी उसळी घेतली आहे. ही परिस्थिती केवळ किरकोळ बाजारापुरती मर्यादित नाही. घाऊक व्यापाऱ्यांच्या मते, बदाम, अंजीर, चिलगोजा, खजूर यासारख्या वस्तूंचा पुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. संघर्ष दीर्घकाळ चालू राहिला, तर येत्या काही आठवड्यांमध्ये किगती आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतातील बहुतांश ड्रायफ्रूट व्यापार दुबईमार्गे चालतो. या ट्रांझिट मार्गात निर्माण झालेल्या अडथळ्यांमुळे चांदणी चौक, भागीरथ पॅलेस, काश्मिरी गेट आणि सदरबाजार यांसारख्या प्रमुख व्यावसायिक केंद्रांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण आहे. दिल्लीतील सुमारे पाच हजार कोटी रुपयांच्या व्यापारावर युद्धाचा धोका निर्माण झाला आहे, यावरून या संकटाचा व्याप किती मोठा आहे, याची कल्पना येते. विशेषतः इराणमधून येणाऱ्या पिस्ता, मनुका, अंजीर, खजूर यांसारख्या उत्पादनांच्या किमतीत ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. म्हणजेच, हा प्रश्न केवळ पुरवठ्याचा नसून संपूर्ण व्यापारव्यवस्थेच्या स्थैर्यावर परिणाम करणारा आहे.

**औषधनिर्मिती क्षेत्रावर गंभीर परिणाम**

गंभीर बाब म्हणजे या परिस्थितीचा परिणाम औषधनिर्मिती क्षेत्रावरही होत आहे. केमिकल्स, प्लास्टिक आणि ॲल्युमिनियमसारख्या कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने फार्मा



उद्योगावर दबाव वाढला आहे. पॅरासिटामॉलसारख्या सर्वसामान्य औषधाच्या किमतीत जवळपास ४७ टक्क्यांची वाढ झाल्याचे सांगितले जाते, तर डायक्लोफेनॅक, अमॉक्सिसिलिन आणि सिप्रोफ्लॉक्सासिनसारख्या औषधांवरही त्याचा परिणाम दिसून येतो. यामुळे सामान्य नागरिकांच्या आरोग्यखर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. या साखळी परिणामाचा फटका लघु व्यवसायांनाही बसत आहे. दिल्लीतील रस्त्यांवरील सुमारे ५० हजार अन्न विक्रेत्यांपैकी २० ते ३० टक्के विक्रेते व्यवसाय बंद करण्याच्या मार्गावर आहेत. वाढत्या किमती, अनिश्चित पुरवठा आणि घटती मागणी यामुळे त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. एकूणच पश्चिम आशियातील संघर्ष हा आता केवळ भौगोलिक किंवा राजकीय विषय राहिलेला नाही, तर सामान्य नागरिकांच्या स्वयंपाकघरापासून औषधांच्या किमतीपर्यंत आणि छोट्या व्यावसायिकांच्या उपजीविकेपर्यंत पोहोचला आहे. हा जागतिक बाजारातील अस्थिरतेचा थेट परिणाम असून त्यातून भारतासारख्या आयात-निर्भर अर्थव्यवस्थेची असुरक्षितता अधोरेखित होते. हा संघर्ष लवकर न शमल्यास येणाऱ्या काळात महागाईचा दबाव अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारने पर्यायी पुरवठामार्ग, साठा व्यवस्थापन आणि बाजार सोयीची निवड नसून परिस्थितीशी जुळवून घेण्याची गरज बनली आहे. तथापि, या बदलाचा अर्थ असा नाही, की पारंपरिक खरेदी पूर्णपणे थांबली आहे. ग्राहक अजूनही धान्य, खाद्यतेल, ड्रायफ्रूट्स आणि पेय पदार्थ यांसारख्या आवश्यक वस्तूंची नियोजनबद्ध खरेदी करत आहेत. म्हणजेच,'तत्काळ सुविधा' आणि 'आवश्यक साठवण' यांचा एक संतुलित नमुना ग्राहक वर्तनात दिसून येत आहे.

**परिस्थिती नियंत्रणासाठी केंद्राचे प्रयत्न**

या सर्व घडामोडींमागे मुख्य कारण आहे वेस्ट एशियातील वाढता तगाव आणि त्यामुळे निर्माण झालेला पुरवठा साखळीतील अडथळा. उपलब्ध प्राथमिक आकडेवारीनुसार, मार्चच्या सुका मेवा महाग, तर इन्स्टंट फूड तेजीत नियंत्रण यासारख्या उपाययोजनांवर तातडीने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. अन्यथा, आंतरराष्ट्रीय संकटाचे ओझे अखेरीस सामान्य ग्राहकांनाच पेलावे लागेल.

**लोकांचा कल रेडी टू इटकडे**

देशातील एलपीजी पुरवठा संकटाचा परिणाम आता केवळ ऊर्जा क्षेत्रापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर थेट स्वयंपाकघरापासून ग्राहकांच्या सवयीपर्यंत पोहोचला आहे. गैस सिलिंडरच्या अनिश्चित उपलब्धतेमुळे लोकांचा कल झपाट्याने 'रेडी-टू-इट' आणि पॅकेज्ड अन्नपदार्थांकडे वळत आहे. बदलत्या जीवनशैलीपेक्षा हा बदल आता परिस्थितीजन्य गरज बनू लागला आहे. 'गेझॉन इंडिया'च्या आकडेवारीनुसार, त्यांच्या प्लॅटफॉर्मवर इन्स्टंट नूडल्स, पैकेज्ड मिल्स, स्नॅक्स आणि पेय पदार्थांच्या विक्रीमध्ये १५ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवली गेली आहे. हा कल केवळ महानगरांपुरता मर्यादित नसून हैदराबाद, कोलकाता, चेन्नई यांसारख्या शहरांबरोबरच सोनेप्त आणि पणजीसारख्या टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्येही ठळकपणे दिसून येत आहे. या प्रवाहाला आणखी गती मिळाली ती 'मेझॉन नाऊ' सारख्या किक कॉमर्स सेवांमुळे. या प्लॅटफॉर्मवर रेडो-टू-इट' पदार्थांच्या विक्रीमध्ये महिन्यागणिक सुमारे २० टक्क्यांची वाढ होत आहे. विशेषतः दिल्ली-एनसीआर, मुंबई आणि बंगळुरूसारख्या महानगरांमध्ये ग्राहक जलद वितरणाच्या पर्यायांवर अधिक अवलंबून राहताना दिसत आहेत. ही केवळ पहिल्या पंधरवड्यात भारतातील एलपीजी वापरात तब्बल १७.७ टक्यांची घट झाली आहे. भारत आपल्या एकूण एलपीजी गरजांपैकी सुमारे ६० टक्के आयात करतो आणि त्यातील मोठा भाग होर्मुज सामुद्रधुनीमार्गे येतो. या मार्गात निर्माण झालेल्या अडथळ्यांमुळे पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. केंद्र सरकारने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. रिफायनरीजना देशांतर्गत उत्पादन वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तज्ज्ञांच्या मते, हे संकट दीर्घकाळ टिकल्यास ग्राहकांच्या खाण्याच्या सवयींमध्ये दीर्घकालीन बदल होऊ शकतो. 'रेडी-टू-इट' आणि इन्स्टंट फूड'चा वाढता वापर हा केवळ तात्पुरता पर्याय राहणार नाही, तर तो दैनंदिन जीवनाचा भाग बनू शकतो. यामुळे ई-कॉमर्स कंपन्यांच्या व्यवसाय मॉडेलपासून अन्न उद्योगाच्या संरचनेपर्यंत व्यापक बदल घडू शकतात. एलपीजी संकटाने भारतीय ग्राहकांच्या वर्तनात एक नवा अध्याय सुरू केला आहे. स्वयंपाकघरातील अडचणी आणि पुरवठ्याची अनिश्चितता यामध्ये 'तत्काळ उपलब्धता' हीच नवी प्राथमिकता ठरत आहे; मात्र या बदलाचे दीर्घकालीन सामाजिक आणि आरोग्यविषयक परिणाम काय असतील, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे.

**तेलाच्या किमतीत वाढ**

दुसरीकडे, जीवाश्म इंधनाचा वापर न करणाऱ्या एका देशाचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे. इराणविरोधातील तणाव वाढत आहे, तशा तेलाच्या किंमती वाढत आहेत. इंधन आयातीवर अवलंबून असलेले पारतासारखे देश या युद्धाने होरपळले जात आहेत. दिवसागणिक गॅस दरवाढ, इंधन दरवाढीची भीती आणि तुटवडा सतावत आहे. देशात एलपीजी सिलेंडरसाठी लांबच लांब रांगा लागल्या आहेत; पण एक देश या ऊर्जा संकटापासून कोसो दूर आहे. या छोट्या देशाचे नाव आईसलैंड असे आहे. हा देश आपल्या ऊर्जेच्या गरजेपैकी जवळरास ८५ टक्के ते ९० टक्के गरज विना जीवाश्म इंधन स्त्रोतातून पूर्ण करतो. म्हणजे या देशाला कच्च्या तेलाची गरज नाही. इथे मुबलक पूऔष्णिक आणि जलविद्युत संसाधने आहेत. येथील ऊर्जा मॉडेल जगासाठी एक मोठे उदाहरण आहे. आईसलँडच्या ऊर्जा स्वातंत्र्यात भूऔष्णिक ऊर्जेचा सर्वात मोठा वाटा आहे. या देशात ज्वालामुखीचा वापर देशात वीज तयार करण्यासाठी आणि घरातील वातावरण उष्ण ठेवण्यासाठी होतो. आईसलँडची जवळपास ६५ टके ऊर्जा भूऔष्णिक स्त्रोताद्वारे पूर्ण होते. याचा अर्थ घरांना उष्ण ठेवण्यासाठी, पाणीपुरवठ्या-साठी आणि उद्योग चालवण्यासाठी ही ऊर्जा फायदेशीर ठरते. त्यामुळे या देशाला कच्च्या तेलावर आधारित इंधनावर अवलंबून राहण्याची गरज नाही. आईसलैंड उर्वरित ऊर्जा म्हणजे २० टक्के ते २५ टक्के ऊर्जा जलविद्युतद्वारे तयार करतो, तर हिमनद्यांमधून उगम पावणाऱ्या नद्या आणि धबधबे यांच्या माध्यमातून वीज तयार करण्यात येते. हा येथील अक्षय ऊर्जेचा एक मोठा पर्याय आहे. या देशात वीज अत्यंत स्वस्त आहे. नॉर्वे, स्वीडन, पॅराग्वे आणि कॉस्टारिका यासारखे देशसुद्धा अक्षय ऊर्जेवर अवलंबून आहेत. ते नैसर्गिक स्त्रोतापासून ऊर्जा तयार करत असल्यामुळे येथे प्रदूषणाचा टक्का घसरला आहे.

**महेश देशपांडे**

# ‘हायप्रोफाईल मैत्री’च्या नावाखाली लाखोंची उकळपट्टी

## ८० लाखांच्या सायबर फसवणुक प्रकरणी पालघरमधून दोन आरोपी ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोला ■

*सायबर गुन्हेगारीविरोधात कारवाई करत सायबर पोलीस स्टेशन अकोला यांनी तब्बल ८०,०५,८३० रुपयांच्या आर्थिक फसवणुकीप्रकरणी दोन आरोपींना मुंबईजवळील पालघर येथून ताब्यात घेत मोठा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात आरोपींनी नोकरीच्या आमिषाने फसवणूक करत ‘हायप्रोफाईल महिला व मुलींसोबत मैत्री’च्या नावाखाली गुंतवणुकीस प्रवृत्त करून लाखोंची उकळपट्टी केल्याचे उघड झाले आहे.*



सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हिरासिंग स्वरूपसिंग ठाकूर यांनी १५ डिसेंबर २०२५ रोजी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांनी वृत्तपत्रातील छोट्या जाहिरातीद्वारे दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला असता, आरोपींनी पार्टटाईम/फुलटाईम नोकरीचे आमिष दाखवले. सुरुवातीला १,००० नोंदणी शुल्क भरून घेतल्यानंतर ‘हायप्रोफाईल महिला व मुलींसोबत मैत्री करून वेळ घालवायचा आणि महिन्याला २०,००० मिळणार’ असे सांगण्यात आले.

यानंतर मसाजसाठी लागणारे साहित्य व औषधे खरेदी करण्यास सांगून तसेच कंपनीमध्ये गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळेल असे आमिष दाखवत फिर्यादीकडून टप्प्याटप्प्याने ८०,०५,८३० रुपये उकळण्यात आले. मात्र कोणतेही साहित्य न देता आरोपींनी टाळाटाळ सुरू केली. पैसे परत मागितल्यावर आणखी रकमेची मागणी केल्याने फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले.

### नोकरीच्या आमिषाने गंडा

या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३/२०२५ नोंदविण्यात आला असून भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत कलम ६६(ड) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन सायबर पोलिसांनी आधुनिक तंत्रज्ञान व डिजिटल पुराव्यांच्या आधारे तपास करत आरोपींचा माग काढला. त्यानुसार २७ मार्च २०२६ रोजी पथक मुंबई-पालघर येथे रवाना झाले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने रूबीना फारूक शेख व अतिष दिलीप गुप्ता यांना ३० मार्च रोजी ताब्यात घेण्यात आले. ३१ मार्च रोजी आरोपींना अकोला येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ३ एप्रिल २०२६ पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोनि. अनिल जुमळे, सपोनि. मनीषा तायडे तसेच पथकातील प्रशांत केदारे, तेजस देशमुख, कुंदन खराबे, किरण वाडेकर व श्रीहरी कराळे यांनी केली.

# लेखी आश्वासनानंतर मुंडगाव येथील उपोषण मागे

**- सरपंचांच्या अनुपस्थितीने नागरिकांत नाराजी**
**- १५ दिवसांत कारवाईचे आश्वासन**

■ प्रतिनिधी | अकोट ■

प्तालुक्यातील मुंडगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर सुरू असलेले अमिनपूर येथील नागरिकांचे आमरण उपोषण अखेर चौथ्या दिवशी प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. संबंधित मागण्यांवर १५ दिवसांत कार्यवाही करण्यात येईल, असे लेखी पत्र देण्यात आल्यानंतर उपोषणकर्त्यांनी निंबूपाणी घेऊन आंदोलन स्थगित केले.

अमिनपूर येथील समाजमंदिरामागील मोकळ्या जागेचा ‘८-अ’ उतारा मिळावा, तसेच अतिक्रमण हटविण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी सहा महिला व दोन पुरुषांनी २७ मार्चपासून बेमुदत आमरण उपोषण सुरू केले होते. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाची दखल घेत अकोटचे गटविकास अधिकारी रमाकांत माळी, संबंधित अधिकारी व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देत चर्चा केली.



यावेळी विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस अधिकारी तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते उपोषणकर्त्यांना निंबूपाणी देऊन आंदोलन मागे घेण्यात आले.

दरम्यान, ग्रामपंचायत सरपंचांनी उपोषणस्थळी हजेरी न लावल्याने नागरिकांत नाराजी व्यक्त करण्यात आली. उपोषणकर्त्यांसह ग्रामस्थांनी सरपंचांच्या भूमिकेवर टीका केली असून, प्रशासनाने वेळेत कारवाई न केल्यास १६ एप्रिल रोजी गटविकास अधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

अमिनपूर येथील शांतीदूत बुद्धविहार चॅरिटेबल ट्रस्ट व महिला मंडळाच्या माध्यमातून समाजमंदिरात विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविले जातात. मात्र, जागेअभावी अडचणी निर्माण होत असल्याने संबंधित मोकळ्या जागेचा अधिकृत ताबा मिळावा, अशी मागणी वारंवार करण्यात येत होती. यासंदर्भात ग्रामपंचायत व प्रशासनाकडे अनेकदा निवेदने देऊनही कार्यवाही न झाल्याने अखेर उपोषणाचा मार्ग अवलंबण्यात आला होता. आता प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानुसार ठोस पावले उचलली जातात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जागतिक संकटामुळे उद्योगांवर होणाऱ्या परिणामावर औद्योगिक बैठक संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

ईरान-अमेरिका युद्धामुळे निर्माण झालेल्या संकटाचा परिणाम स्थानिक उद्योगांवर स्पष्टपणे दिसून येत आहे. याच संदर्भात एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राजेंद्र जाधव यांच्यासोबत महत्वाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष निकेश गुप्ता उपस्थित होते. बैठकीत एमआयडीसी क्षेत्रातील विविध उद्योग संघटनांच्या प्रतिनिधींनी भाग घेऊन सद्यस्थितीचा सविस्तर आढावा सादर केला. चर्चेदरम्यान अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली, ज्यात कच्च्या मालाची उपलब्धता कमी होणे, उत्पादन खर्चात मोठी वाढ, निर्यात ऑर्डर प्रलंबित



राहिल्याने व्यापारावर प्रतिकूल परिणाम, आयातीमध्ये शिपिंग विलंब व वाढलेले फ्रेट चार्ज, पीएनजी, एलपीजी गॅस पुरवठ्यात अनियमितता, उद्योगांमध्ये संभाव्य रोजगार संकट, छंटणीची स्थिती इ. यांचा समावेश होता.बैठकीत विदर्भ चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी उद्योगांच्या वतीने प्रशासन आणि शासनासमोर मागण्या मांडल्या, ज्यात उद्योगांसाठी गॅस व इंधन पुरवठ्याला प्राधान्य देणे, लॉजिस्टिक आणि फ्रेट खर्चात सवलत देणे, एमएसएमई उद्योगांसाठी विशेष दिलासा पॅकेज जाहीर करणे इ. यांचा समावेश होता. यावर एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राजेंद्र जाधव यांनी सर्व मुद्द्यांना गंभीरतेने घेऊन आश्वासन दिले की, हे सर्व उच्च स्तरावर पाठवून लवकरात लवकर उपाययोजना करण्यात येतील. विदर्भ चेंबरने शासन आणि प्रशासनाकडून वेळीच ठोस पावले उचलली जाण्याची आशा व्यक्त केली आहे, जेणेकरून उद्योगांना दिलासा मिळेल आणि प्रादेशिक अर्थव्यवस्थेला स्थिरता प्राप्त होईल. या वेळी बहुतांश व्यापारी आणि उद्योजक उपस्थित होते.

# जिल्ह्यातील ४३ खेळाडूंना शिष्यवृत्ती, २१ बॉक्सिंगपटूंची चमक

■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यातील खेळाडूंना महाराष्ट्र शासनाकडून मोठा दिलासा मिळाला असून एकूण ४३ खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये विशेष म्हणजे २१ खेळाडू बॉक्सिंग या क्रीडा प्रकारातील असून जिल्ह्यातील बॉक्सिंग खेळाची वाढती ताकद अधोरेखित झाली आहे.

राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदवून प्राविण्य मिळवणाऱ्या या खेळाडूंना आर्थिक सहाय्य मिळणार असल्याने त्यांच्या पुढील प्रशिक्षणास मोठी चालना मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. या योजनेत राष्ट्रीय स्तरावरील सहभाग व प्राविण्यानुसार(सुवर्ण पदक ११२५०, रजत पदक ८९५०, कांस्य पदक ६७५० तसेच सहभागी खेळाडूंना ३७५०)विविध रकमेची शिष्यवृत्ती दिली जाते, ज्यामुळे खेळाडूंच्या प्रशिक्षण, आहार व साहित्य खर्चास मदत होते. या यादीत विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंचाही समावेश आहे. मात्र बॉक्सिंगमध्ये सर्वाधिक २१ खेळाडूंनी शिष्यवृत्ती मिळवत आघाडी घेतली आहे. पालक व प्रशिक्षकांनीही शासनाच्या या उपक्रमाचे स्वागत करत खेळाडूंना मिळणारे आर्थिक बळ अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.

# निवृत्ती नियोजनामध्ये सर्वात महत्त्वाची गरज म्हणजे आयुष्यभरासाठी निश्चित उत्पन्न असणे - विकास गुप्ता

■ प्रतिनिधी | अकोला ■

यूएनडीपीच्या २०२५ च्या मानव विकास अहवालानुसार, भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान १९९० मध्ये ५८.६ वर्षांवरून २०२३ मध्ये ७२ वर्षांपर्यंत वाढले आहे. विशेष म्हणजे, ’भारतातील वृद्ध’ या सरकारी आकडेवारीनुसार, २०३६ पर्यंत जवळपास प्रत्येक सात भारतीयांपैकी एक व्यक्ती ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाची असेल. हे आकडे भारतातील आरोग्यसेवा सुधारत असल्याचे चांगले संकेत दर्शवतात, पण तरी वाढत्या वयानुसार पुढील काळात येणाऱ्या खर्च आणि अडचणींसाठी प्रत्येक व्यक्तीने आधीच तयारी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. लोकांचे आयुष्य वाढत असताना निवृत्तीनंतर खर्चही वाढतो. दैनंदिन राहणीमानाचा खर्च आणि वैद्यकीय खर्च खूप महाग होत आहेत, त्यामुळे अनेकांना आर्थिक अडचणी येऊ शकतात. ही समस्या लक्षात घेऊन आणि सेवानिवृत्तीचे नियोजन सोपे करण्यासाठी, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ ने आयसीआयसीआय प्रू गॅरंटीड पेन्शन प्लॅन फ्लेक्सी तयार केला आहे.

**Change In Name**

I have changed my name from **Madhav Motilal Khatod** (Old name) -to- **Madhavv Motilal Khatod** (New Name) Passport No. AH299118 Address: Gaurakshan Road, Akola.444003

**अकोला :** पाश्चातीकरण म्हणजेच आधुनिकीकरण हा समाजात व विशेष करून युवा वर्गात वाढत चाललेला गैरसमज दूर करून फोफावलेल्या स्वैराचारावर मात करण्यासाठी व संस्काराची दुरावस्था सुरळीत करण्यासाठी संस्कृत भारती सारख्या संस्थांची समाजात आज खरी गरज असल्याचे प्रतिपादन संस्कृत भारतीचे राष्ट्रीय प्रचार प्रमुख श्रीश देवपुजारी यांनी केले.

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४६४/२०२६ — प्रोसेस नं.४०६०/२०२६
चौ.ता. ३०/०४/२०२६ — दिनांक : २३/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती सुभद्राबाई जगन्नाथ चोपडे २. सुरेश जगन्नाथ चोपडे ३. संजय जगन्नाथ चोपडे सर्व रा. वार्ड नं. २, घुसर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. राजेश जगन्नाथ चोपडे रा. वार्ड नं. २, घुसर ता. जि. अकोला. २. छाया अंबादास चिंचालकार रा. टाकरखेडा, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती.

**मयताचा पत्ता :-** मयत : जगन्नाथ रामचंद्र चोपडे

**पत्ता :-** रा. वार्ड नं. २, घुसर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जगन्नाथ रामचंद्र चोपडे यांचे दि. ०४/०८/२०२५ रोजी राहते घरी, घुसर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर सूचना**

सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे विनायक केशवराव चुटके, रा. कान्हेरी सरप, येथील वार्ड नं. २, प्लॉट नं. १४८ सदर प्लॉट ची नोंद घेण्याकरिता भूमी अभिलेख कार्यालय, बार्शीटाकळी, ता. बार्शीटाकळी जि. अकोला अर्ज केला आहे. तेथील अभिलेखावर सौ. बेबी ज कृष्णराव नामेकर या नावाने नोंद आहे, परंतु सदरची व्यक्ति हयात असल्याबाबत किंवा मयत असल्याबाबतचा कुठलाही पुरावा अथवा माहिती नाही. सदरच्या व्यक्तीचे कोणी वारस आहेत किंवा नाही याबद्दल देखील कुठलीही माहीत नाही. करिता सदर बाबी बद्दल कोणत्याही व्यक्तिला प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी नोटिस जाहीर झाल्यापासून ७ दिवसाचे आत आपले मुळ दस्तऐवज घेऊन आमचे पक्षकार यांचेशी संपर्क साधावा. करिता सदरची जाहीर सूचना.

**आमचे पक्षकार :**
**विनायक केशवराव चुटके**
मोबाइल क्र.९४२३४७३४२१ / ९९७०९५१४१४

**ॲड. व्ही. एस. कुकडे**
मोबाइल क्र. ९६६५७३२७९६

# शासकीय योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणार

## शिवसेना अनुसूचितजाती मोर्चा



■ प्रतिनिधी | अकोला ■

शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे , शिवसेनेचे युवा नेते खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून तसेच शिवसेना उपनेते मा. आ. गोपीकिशन बजरिया यांच्या मार्गदर्शनामध्ये अकोला जिल्हा ग्रामीण आणि शहरामध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध शासकीय योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प शिवसेना अनुसूचितजाती मोर्चा अकोला जिल्हा प्रमुख डॉ. रामकृष्ण डोंगरे, उपजिल्हाप्रमुख भिकाजी अवचार, मुर्तीजापुर तालुकाप्रमुख महादेव क्षीरसागर, अकोला तालुकाप्रमुख स्वप्निल आढाव सह शिवसेना अनुसूचितजाती मोर्चा जिल्हा आणि ग्रामीणचे पदाधिकारी यांनी केला आहे समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत शासन राबवत असलेल्या विविध विकास योजनेविषयी माहिती देण्यात येत असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी केलेल्या विविध विकास कामाची माहिती सुद्धा देण्यात येत आहे तसेच ग्रामीण भागातील घरकुल योजनेपासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांची यादी संग्रही करीत असून ही यादी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे शिवसेनेचे उपनेते मा. आ. गोपीकिशन बाजोरिया, शिवसेना जिल्हाप्रमुख मा. आ. नारायणराव गव्हाणकर, जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी, यांच्या सहकार्याने डॉ. रामकृष्ण डोंगरे यांचा पाठपुरावा करणार आहे.

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport No is (N8377736) From **AKSHAY SATYENDRA WALALE** -- TO -- **AKSHAY SATYENDRA KUMAR WALALE** My Residential Address is -- Near Sawalkar House, Deopeth Washim Maharashtra 444505.

**Change In Name**

I Have Change My Name in My Son's Passport No is (N8377736) From **SATYENDRA DEVIDAS WALALE** -- TO -- **SATYENDRAKUMAR DEVIDAS WALALE** My Residential Address is -- Near Sawalkar House, Deopeth Washim Maharashtra 444505.

**Change In Name**

I Have Change My Name in My Son's Passport No is (N8377736) From **SARALA SATYENDRA WALALE** -- TO -- **SARLA SATYENDRAKUMAR WALALE** My Residential Address is -- Near Sawalkar House, Deopeth Washim Maharashtra 444505.

# भव्य भजन संध्येने उसळला भक्तीचा सागर श्रीराम नवमी उत्साहात साजरी

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

शहरात श्रीराम नवमीचा उत्सव अत्यंत भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. मंत्रोच्चारात विधिवत होम-हवन, पूजा-अर्चना करत मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामांचा जन्मोत्सव साजरा झाला. यानिमित्त आयोजित भव्य भजन संध्या आणि कीर्तन कार्यक्रमाने संपूर्ण वातावरण राममय झाले होते.

जुन्या शहरातील चंद्रशेखर आजाद चौक येथे नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष आतिश महाजन व त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने भव्य भजन संध्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला हजारो भाविकांनी उपस्थित राहून भक्तीरसाचा आनंद लुटला. भजन आणि कीर्तनाच्या सुरांनी वातावरण भारावून गेले होते.कार्यक्रमस्थळी श्रीराम व खाटू श्याम दरबाराची आकर्षक मांडणी, अखंड ज्योत आणि इत्र वर्षा यामुळे भक्तीचा अनोखा अनुभव भाविकांना मिळाला. तसेच स्थळाची



मनमोहक सजावट सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

भजन संध्येसाठी कोटा (राजस्थान) येथील दीक्षा राठोड, नागपूरचे श्याम व शुभम तसेच कृष्ण प्रिया या सुप्रसिद्ध गायकांनी आपल्या सुमधुर आवाजात भजन सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्रीराम व खाटू श्याम यांच्या विधिवत पूजनाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. यावेळी गायक कलाकारांचा सत्कार आतिश महाजन, राहुल महाजन तसेच किन्नर आखाड्याच्या नेहा गुरु यांच्या हस्ते करण्यात आला.

आयोजक आतिश महाजन यांचा सत्कार डॉ. विशाल यादव, ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष विलास नसले, जयप्रकाश रावत, ज्येष्ठ पत्रकार दीपक अग्रवाल, संजय उमक, योगेश आगाशे, दिनेश श्रीवास, राहुल महाजन आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला आमदार हरीश पिंपळे, नगराध्यक्ष हर्षल साबळे, विजय भारुका यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. ठाणेदार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्तही चोख ठेवण्यात आला होता. दरम्यान, सकाळी सकल हिंदू समाजाच्या वतीने शहरातून भव्य मोटरसायकल रॅली काढण्यात आली. श्रीरामांच्या जयघोषाने संपूर्ण शहर दणाणून गेले. सायंकाळी श्रीराम जन्म शोभायात्रा समितीच्या वतीने जुन्या शहरातील श्रीराम मंदिरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

# कृषी पुरस्कारांसाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करता येणार

## दि. १५ एप्रिलपूर्वी अर्ज करण्याचे ‘एसएओं’चे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

शासनाच्या विविध कृषी पुरस्कारासाठी शेतकरी बांधवांना ऑनलाईन प्रणालीवर घरबसल्या अर्ज सादर करता येणार आहे. इच्छूकांनी दि. १५ एप्रिलपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे यांनी केले आहे.

कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला,व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. सदर पुरस्कार माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे.

सदर संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना खालीलप्रमाणे फायदा होणार आहे. ऑनलाईन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या अर्ज सादर करता येणार. ऑफलाईन चार प्रतींमधील प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचून प्रस्ताव सादरीकरण जलदगतीने होणार आहे. एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा-पुन्हा देण्याची आवश्यकता नाही. अर्ज कुठल्या टप्प्यावर आहे याची माहिती शेतकऱ्यांना सहज मिळणार आहे. छपाई, झेरॉक्स, प्रवास व पोस्ट खर्च कमी होणार असून आर्थिक भार कमी होणार आहे. मा.आयुक्त कृषी यांनी इच्छुक शेतकरी/व्यक्ती/संस्था/गट यांना सन २०२५ पासूनचे विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेबाबत आवाहन केले आहे. तरी अकोला जिल्ह्यातील इच्छुक शेतकऱ्यांनी दिनांक १५ एप्रिल २०२६ पर्यंत आपला अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करावा. अधिक माहिती करीता आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक सहाय्यक कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. मुरली इंगळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तथा प्रकल्प संचालक, आत्मा, अकोला यांनी केले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ११८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अवनीश वेल्फेअर फाउंडेशन स्पेशल चाइल्ड डेव्हलपमेंट सेंटरचा प्रथम वर्धापन दिन

## -प्रवीण पोटे यांनी पुनश्च एकदा स्वीकारली पालकत्वाची धुरा

**अमरावती/ प्रतिनिधीः-** स्थानिक नवसारी रोड वरील रेखा कॉलनी स्थित विशेष मुलांचे डेव्हलपमेंट सेंटर अवनीश वेल्फेअर फाउंडेशन चा प्रथम वर्धापन दिन नुकताच मोठ्या थाटात संपन्न झाला. विशेष मुलांच्या या डेव्हलपमेंट सेंटरमध्ये मुलांच्या वैयक्तिक , शैक्षणिक, शारीरिक व बौद्धिक गरजा लक्षात घेऊन त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करणे, त्यांना आपल्या सोबत घेऊन त्यांच्या गरजेनुसार त्यांच्यातील कमी असलेल्या बाबींचा आयुर्वेदिक, ॲलोपॅथिक, होमिओपॅथिक औषधींचा समतोल वापर करून गरजेनुसार वेळोवेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने त्या पूर्ण करणे. ब्रेन डेव्हलपमेंट आणि शारीरिक डेव्हलपमेंट यासाठी सुसज्ज परिसर आणि विशेष शिक्षक देऊन त्यांच्याकडून ॲक्टिव्हिटी करून घेणे. या विशेष मुलांना फिजिओथेरपी, आयुर्वेदिक शिरोधारा , हसत खेळत शिक्षण, वेळोवेळी दंत आणि डोळ्यांची चिकित्सा अशा पूर्ण सोयी एकाच जागी निर्माण करणे असे या डेव्हलपमेंट सेंटरचे उद्दिष्ट आहे.

अशा सर्व प्रकारच्या सोयी एकाच ठिकाणी असलेले अमरावती मधील एकमात्र सेंटर आहे. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. माजी पालकमंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी अत्यंत आत्मीयतेने सेंटरचे अवलोकन केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे आणि डॉक्टर्सच्या टीमचे रोपटे व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. अवनीश वेल्फेअर फाउंडेशनच्या संचालिका प्रांजली योगेश देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. गणेश वंदना या गीतावर वंशिका देशमुख आणि अमृता डकरे यांनी सुंदर नृत्य सादर केले.




अवनिश वेल्फेअर फाउंडेशन आणि आरोग्य भारती मेडिकल यांनी समाज भान ठेवत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरामध्ये मध्ये ३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

याप्रसंगी मंचावर माजी पालकमंत्री प्रवीण पोटे पाटील , निमाचे डॉ अमोल ढवळी, नगरसेवक ऋषिकेश देशमुख आणि विशाल खोडके उपस्थित होते. निमा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ उमेश ढालके यांनी डॉक्टर्स चमूच्या वतीने आपले विचार व्यक्त केले. बँक ऑफ इंडियाने केलेल्या सहकार्यासाठी त्यांचे देखील स्वागत करण्यात आले.

स्पेशल चाइल्ड डेव्हलपमेंट सेंटरमध्ये मागील वर्षभरापासून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या प्रगतीबद्दल मनोगत पालकांनी व्यक्त केले. पालकांनी फाउंडेशनच्या कार्यावर समाधान व्यक्त करत मुक्त कंठाने प्रशंसा केली. कार्यक्रमांमध्ये विशेष विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम देखील सादर करण्यात आले. सेंटरच्या सर्वच विशेष मुलांनी सादर केलेल्या ' तारे जमी पर ' या फॅशन शो ने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. अवनीश वेल्फेअर फाउंडेशन करीता सदैव तत्पर असणाऱ्या फाउंडेशन च्या संपूर्ण टीमचा सत्कार करण्यात आला. फाउंडेशनने वर्षभरात केलेल्या कार्याची हृदयस्पर्शी चित्रफित दाखविण्यात आली.

माजी मंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये सेंटरच्या वर्षभराच्या कार्याप्रती समाधान व्यक्त केले. फाउंडेशनला दर महिन्याला आर्थिक सहकार्य करत आलो आहे आणि यापुढे पण वाढते सहकार्य करणार असल्याचे सांगितले. सेंटरसाठी भव्य जागा उपलब्ध करून बांधकामाकरिता मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचा मानस उपस्थितांसमोर व्यक्त केला. मागील वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी येणारी अडचण पाहता प्रवीण पोटे यांनी त्यांचे वडील श्री रामचंद्र पोटे यांच्या स्मृतीमध्ये स्कूल व्हॅन उपलब्ध करून देण्याचे जाहीर करताच उपस्थित विशेष मुलांच्या पालकांना फारच आनंद झाला. उपस्थित पालकांच्या वतीने स्कूल व्हॅन करिता प्रवीण पोटे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

मी प्रत्येक अडचणीच्या वेळी विशेष मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचा विश्वास प्रवीण पोटे पाटील यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला. विशेष मुलांकरिता सदैव सेवा देणारे डॉ क्षितिज शर्मा, डॉ ऋतुराज देशमुख , डॉ उमेश ढालके, डॉ भावना देशमुख, डॉ अनुरूप काळे यांचा देखील सत्कार करण्यात आला. योगेश देशमुख आणि सचिन राहाटे यांनी उपस्थितांचे विशेष आभार व्यक्त केले.

याप्रसंगी डॉ चेतन गुल्हाने , सचिन सोनटक्के, डॉ मनीष हूसके, डॉ सतीश नागे, डॉ अभिजीत देशमुख , डॉ धनंजय चर्जन , डॉ अजीम खान , गजानन आंडे , मोहित देशमुख , डॉ आकाश चांगोले, संदीप देशमुख , पियुष लाहोटी, आदित्य देशमुख, डॉ विजय खंडारे , अमोल देशमुख ,प्रा अमोल किरकटे, शंतनू हागोणे, संदीप रेवस्कर, अन्सार खान, उमेश खैरकर प्रामुख्याने उपस्थित होते. या भावस्पर्शी कार्यक्रमाचे संचालन नीता आणि विजय धनाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन वैभव दलाल यांनी केले. ' इतनी शक्ती हमे देना दाता' या प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# स्वरांजलीतून आईच्या स्मृतींना अभिवादन

## -हृदय रोगनिदान शिबिरातून मानवसेवेचा प्रेरणादायी उपक्रम

**तिवसा/ प्रतिनिधीः-** निर्वाणस्थ लीलादेवी माहोरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित कार्यक्रमांमध्ये भावनांचा ओलावा आणि समाजसेवेची जाणीव यांचा अनोखा संगम पाहायला मिळाला. आईच्या निधनानंतर तेरा दिवस पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित स्वरांजली कार्यक्रमाने उपस्थितांना भावूक केले.

या स्वरांजली कार्यक्रमात सादर झालेल्या गीतांमधून दिवंगत आईच्या आठवणींना जिवंत उजाळा मिळाला. प्रत्येक सुरात तिचे अस्तित्व जाणवत होते, तर प्रत्येक गीत तिच्या आयुष्याच्या आठवणींचे प्रतिबिंब बनले होते. अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या क्षणी वातावरण इतके भारलेले होते की, उपस्थितांच्या डोळ्यांतून अश्रू अनावर झाले.






याच निमित्ताने दि. २९ मार्च रोजी संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल यांच्या सहकार्याने भव्य हृदय रोगनिदान तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन जेष्ठ लीलाबाई कठाणे यांच्या हस्ते झाले.

या शिबिरात शंभरहून अधिक रुग्णांनी हृदय तपासणी करून घेतली. ईसीजीसह विविध तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आल्या. या वेळी डॉ. शिवराज शिंदे, डॉ. माधव खंडारे, डॉ. अंकुश निकम, डॉ. पूर्वा बारस्कर यांनी सेवा दिली. तसेच राजेंद्र दिगंबर व बादल वाघ यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रज्ञा मनवर, अंजू अंबोने, सविता सायनारे, रवीना मोहोड, शिवानी मोंढे, वैष्णवी गोडांगे, प्रांजली भाकरे, विशाखा खैरे यांनी विशेष योगदान दिले. तसेच पत्रकार राज माहोरे, जयंत मनोहर, मुन्ना मकेश्वर, पिंटू बनसोड, प्रदीप शापामोहन, गोपाल मेंढे, संदीप दहाट, प्रशिक मकेश्वर, अक्षय माहोरे, प्रशिक शापामोहन, विशाल शापामोहन, नितीन माहोरे आदींनीही परिश्रम घेतले.

कार्यक्रमावेळी माहोरे कुटुंबातील अश्विनी माहोरे, नितीन माहोरे, मीनाक्षी माहोरे, राज माहोरे, शीतल माहोरे, सचिन माहोरे, सुनंदा माहोरे, अर्चना माहोरे, अधिराज अवर्जुन हे उपस्थित होते.

आईच्या स्मृतींना स्वरांजली अर्पण करताना कुटुंबियांनी व्यक्त केले की, 'आईचे संस्कार, तिचे प्रेम आणि माणुसकीची शिकवण हीच आमची खरी संपत्ती असून, तिच्या स्मृतींना साजेशा समाजोपयोगी उपक्रमांद्वारे तिचा वारसा पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न राहील.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६०८/२०२६
**विजयकुमार व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०२.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Vijaykumar Deoraoji Kandalkar, Age 73 Yrs. Occu.: Labour R/o Behind Satydev Furniture, Gadge Nagar, Amravati.
2. Sharad Deoraoji Kandalkar, Age 71 Yrs. Occu.: Labour R/o Near Ram Mandir, Kamnapur, Tq.Bhatkuli, Dist.Amravati
3. Jaywant Deoraoji Kandalkar, Age 66 Yrs. Occu.: Labour R/o Oppo.Government Polytechnic, Gadge Nagar, Amravati
4. Rajesh Deoraoji Kandalkar, Age 59 Yrs. Occu.: Labour R/o Oppo.Government Polytechnic, Gadge Nagar, Amravati
5. Pramila Prabhakarrao Kandalkar, Age 76 Yrs. Occu.: HOusehold
6. Sunil Prabhakar Kandalkar, Age 52 Yrs. Occu.: Labour No.5 & 6 R/o Near Satydev Furniture, Gadge Nagar, Amravati.
7. Sanjaya Ashokrao Belorkar, Age 57 Yrs. Occu.: Household R/o Near Nikita Kirana, Mahendra Colony, Amravati.
8. Chhaya Raju Rohankar, Age 54 Yrs. Occu.: Household R/o Infront of Hnauman Temple, Ward No.2, Tiwsa Ghat, Tq.Warud, Dist.Amravati
9. Veena Kishorrao Amrutkar, Age 50 Yrs. Occu.: Household R/o Ghongade Baba Layout, Babhulgaon, Tq.Babhulgaon,Dist.Yavatmal
10. Nitin Prabhakarrao Kandalkar, Age 47 Yrs. Occu.: Labour R/o Flat No.10-A, Dhanashree Pradise Anandnagar, Behind Icchamani Lawn Nashik

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **देवरावजी तुकारामजी कांडलकर** हे दिनांक **२०.१२.१९९८** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **विजयकुमार व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विजयकुमार व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

# जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **सचिन सुधाकर पकीद्दे** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन** - मौजे - वरुडा, प्रगणे - बडनेरा, सर्व्हे नं.५/५, प्लॉट क्र.१४/ए ता. आणि जिल्हा अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **सचिन सुधाकर पकीद्दे** यांच्याकडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तद्नंतर **सचिन सुधाकर पकीद्दे** यांनी PNB Housing Finance Limited Br.Amravati येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पुवीचे मूळ खरेदी खत** 25.03.2014 **रोजीचे दस्त क्र.**631 हे मूळ खरेदी खत गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **७** दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही आणि सदर मालमत्ता PNB Housing Finance Limited Br.Amravati येथे गहाण करण्यात येईल.करीता ही जाहीर सूचना देत आहे.

शिक्का

**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.**9823698745

---

# जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र. १४६/२०२६ ने.ता. ०५.०५.२०२६

**अर्जदार :**
१. हर्षल गणेशराव वैद्य, वय ४१ धंदा - शेती
२. छाया विनोद कोरडे, वय ४५ धंदा - घरकाम
३. प्रिती अनिलराव तायडे, वय ४३ धंदा - घरकाम
४. प्रांजली नरेंद्रराव पावडे, वय ४२ धंदा - घरकाम
अर्जदार नं.१, २ रा.चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.३ रा.अकोली रोड नालंदा कॉलनी, साईनगर, अमरावती
अर्जदार नं.४ रा.पळसवाडा, पो.इत्तगांव, ता. जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक गणेशराव दयारामजी वैद्य** यांचा मृत्यू दिनांक **०६.१२.२०११** रोजी गेट लाईफ हॉस्पीटल, अमरावती, ता. जि.अमरावती येथे झालेला असून ते कायमचे चांदूर बाजार, येथील रहिवासी होते. तसेच **मृतक शालिनी गणेशराव वैद्य** हिचा दि.**०३.०५.२०१२** रोजी रा.अमरावती, ता.जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१४६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२४.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

# NAME CHENGE

**OLD NAME- MOHAMMAD REHAN**
**NEW NAME- MOHAMMAD REHAN. MOHAMMAD YASIN**
**BACK SIDE FATHER NAME**
**MOHAMMED YASSEEN**
**NEW NAME : FATHER NAME**
**MOHAMMED YASIN MOHAMMAD LUKMAN**
**MOTHER NAME**
**MALIKA BI**
**NEW NAME**
**MALIKE BI MOHAMMAD YASIN**

**ADDRESS :-** AT POST WARD NUMBER 3 , SAUDAGAR PURA , KARAJGAON TQ CHANDURBAZAR DIST AMRAVATI PINCODE 444809

# पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.

शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)

**संपर्क - ९६०७५८२०९४**

# पाहिजे

गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत. तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.

**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा, एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड, अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५

---

# जाहीर नोटीस

विद्यमान प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब चांदूर बाजार यांचे न्यायालय
मि.अ.क्र./ ने.ता. / /२०२२

**१. सुलोचना शामरावजी सरदार**
वय ७४ वर्षे, धंदा – मजुरी
रा. देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती

**-- विरुद्ध --**

गैरअर्जदार-निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्राम पंचायत कार्यालय, देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती वरील अर्जदाराने विद्यमान न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदाराला देण्याकरीता प्रकरण दाखल केलेले आहे.

अर्जदार नामे सुलोचना शामरावजी सरदार ह्यांचे वडील नामे शामरावजी रामजी सरदार यांचा मृत्यू दिनांक १० .१२ .१९८९ रोजी राहत्या घरी देऊरवाडा येथे मृत्यू झालेला आहे. करीता या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याचे आत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप, प्रकरणात आक्षेपअसल्यास नोंदवावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
दि.

**आदेशानुसार,**
**सहाय्यक अधीक्षक,**
**प्रथम श्रेणी न्यायाधीश, चांदूर बाजार**

---

# जाहीर नोटीस

विद्यमान प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब चांदूर बाजार यांचे न्यायालय
मि.अ.क्र./ ने.ता. / /२०२२

**१. सुलोचना शामरावजी सरदार**
वय ७४ वर्षे, धंदा – मजुरी
रा. देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती

**-- विरुद्ध --**

गैरअर्जदार-निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्राम पंचायत कार्यालय, देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती वरील अर्जदाराने विद्यमान न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदाराला देण्याकरीता प्रकरण दाखल केलेले आहे.

अर्जदार नामे सुलोचना शामरावजी सरदार ह्यांचे आई नामे बहिणाबाई शामरावजी सरदार यांचा मृत्यू दिनांक १० .१० .१९८० रोजी राहत्या घरी देऊरवाडा येथे मृत्यू झालेला आहे. करीता या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याचे आत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप, प्रकरणात आक्षेप असल्यास नोंदवावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
दि.

**आदेशानुसार,**
**सहाय्यक अधीक्षक,**
**प्रथम श्रेणी न्यायाधीश, चांदूर बाजार**

---

# जाहीर नोटीस

**नोटीस देणार** - **पार्टी नं.१ - प्रफुल गणेशराव पचारे**
वय ३३ वर्षे, रा.परतोडा, ता.आर्वी, जि.वर्धा

**नोटीस घेणार** - **पार्टी नं.२ - सौ.शितल प्रफुल पचारे**
वय ३१ वर्षे, ह.मु.लक्ष्मी बंडु अमझरे यांच्या घरी (माहेरी)
रा.कारंजा, ता.कारंजा, जि.वर्धा

आम्ही दोघे वरील पत्त्यावर राहतो. आम्ही नात्याने पती-पत्नी आहोत. पार्टी नं.२ मागील पाच वर्षापासून माहेरी राहत आहे. पती, नातेवाईक, प्रतिष्ठीत नागरिक महिला सेलच्या माध्यमातून प्रयत्न करुनही पार्टी नं.२ पतीकडे नांदायला येण्यास तयार नाही.

पार्टी नं.२ ला आजही तिचे पती सन्मानाने आणि सुरक्षितपणे वागविण्यास तयार आहेत. ही जाहीर नोटीस वाचताच आठ दिवसांच्या आत नांदायला न आल्यास यालाच जाहीर सोडचिठ्ठी समजले जाईल.

यापुढे दोघेही पती-पत्नी दुसरा विवाह करण्यास मोकळे झालो आहे. कोणत्याही प्रकारची खाओटी पार्टी नं.२ ला पती देणार नाही. हे वैवाहिक संबंधाचे नाते येथेच संपुष्टात येत आहे. यापुढे दोघेही एक-दुसऱ्याच्या आयुष्यात हस्तक्षेप करणार नाही. एक दुसऱ्याची सामाजिक बदनामी करणार नाही.

**स्थळ** - अमरावती जिल्हा (महाराष्ट्र राज्य)
**दिनांक** - ०१.०४.२०२६

शिक्का

**जाहीर नोटीस देणार**
**पती - प्रफुल गणेशराव पचारे**

---

# जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. २४७/२०२६ ने.ता.३०.०४.२०२६

**अर्जदार** - १. संजय गणपतराव आकोलकर
वय ४७ वर्षे, धंदा - शेती
रा.निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार यांचे वडील **नामे गणपत बापुराव आकोलकर** हे दि.**०८.१०.२०१०** रोजी निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार यांची आई **नामे शारदाबाई गणपतराव आकोलकर** यांचा दि.**२०.०३.२०२२** रोजी निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २७.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,(क.स्तर)
मोर्शी

---

# जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील नमुद मालमत्ता (शेतजमीन) **श्रीमती कुमूद ज्ञानेश्वर चोरे व श्री.रोशन ज्ञानेश्वर चोरे व श्री.निखील ज्ञानेश्वर चोरे,** तिघेही रा.माहुली चोर, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती यांच्याकडून खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे.

(अ) नोंदणी तुकडी अमरावती नोंदणी पोट तुकडी माहुली चोर, जि.प.अमरावती ग्रामपंचायत कार्यालय माहुली चोर कक्षेतील मौजे माहुली चोर, भो.वर्ग-१, प्रगणे-नांदगांव खंडे., ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथील गट नं.४५/१/अ, क्षेत्रफळ १ हे.०० आर. पो.ख.०.००.००, आकार रु.१०.२५ पैसे, भो.वर्ग-१ अशी वाहिती योग्य १ हे.०० आर शेतजमीन, त्यात निंबुचा बगीचा, ठिबक सिंचनसह, झाडाझुडपासह व तदंगभूत वस्तुंसह, याची चतुःसिमा- पुर्वेस - वासंती राजेंद्र गोपाल यांचे शेत, पश्चिमेस - गजानन अंबादास चव्हाण यांचे शेत, उत्तरेस - रोशन चोरे व निखील चोरे यांचे शेत, दक्षिणेस - मंदा जनार्दन चव्हाण यांचे शेत.

ब) नोंदणी तुकडी अमरावती नोंदणी पोट तुकडी माहुली चोर, जि.प.अमरावती ग्रामपंचायत कार्यालय माहुली चोर कक्षेतील मौजे-माहुली चोर, भो.वर्ग-१, प्रगणे-नांदगांव खंडे., जि.अमरावती येथील गट नं.४५/१/अ, क्षेत्रफळ १ हे.०३ आर, पो.,ख.०.००.०० आकार रु.१०.२५ पैसे, भो.वर्ग-१ अशी वाहिती योग्य १ हे.०३ आर शेतजमीन, त्यात विहीर, मोटरपंप, इलेक्ट्रिक मिटर, निबुचा बगीचा, ठिबक सिंचनसह, झाडाझुडपासह व तदंगभूत वस्तुंसह, याची चतुःसिमा- पुर्वेस - वासंती राजेंद्र गोपाल यांचे शेत, पश्चिमेस - गजानन अंबादास चव्हाण यांचे शेत, उत्तरेस - रोड, दक्षिणेस - कुमूद ज्ञानेश्वर चोरे यांचे शेत.

उपरोक्त नमुद दोन्ही शेतजमिनीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाण, बोझा, वारसहक्क, जप्ती, कर्ज, ताबा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, सरकारी-निमसरकारी कर्ज, न्यायालयीन प्रकरण, वादविवाद, लिज पेन्डंट अथवा कोणत्याही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांचे आत पूर्ण लेखी पुराव्यासह कागदोपत्री वरील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा. मुदतीनंतर माझे पक्षकार सदरहू शेतजमिनीची खरेदी करण्यास स्वतंत्र राहतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

याकरीता सदर जाहीर नोटीस.

अमरावती
**दिनांक ३०.०३.२०२६**

(ॲड.बी.एस.तिवारी
अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २०३**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

# जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र. १४२/२०२६ ने.ता. ०४.०५.२०२६

**अर्जदार :**
१. कांता साहेबराव खटाळे, वय ६२ धंदा - घरकाम
२. पुष्पा सुरेशराव इंगोले, वय ६० धंदा - घरकाम
३. शिवशंकर रामकृष्ण तायडे, वय ५४ धंदा - शेती
४. नंदकिशोर रामकृष्ण तायडे, वय ५२ धंदा - शेती
अर्जदार नं.१ रा.खेल जाणुजी कुऱ्हा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.२ रा.येवता, ता.अचलपूर, जि.अमरावती
अर्जदार नं.३ व ४ रा.हिरुर पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक रामकृष्ण मोतीराम तायडे** यांचा मृत्यू दिनांक **०५.०१.२०२५** रोजी रा.मार्की, ता.भातकुली, जि.अमरावती येथे झालेला असून ते कायमचे रा.हिरुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते. तसेच **मृतक शांताबाई रामकृष्ण तायडे** हिचा दि.**०५.०३.२०२२** रोजी रा.हिरुर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१४२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२४.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

# जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र. १३६/२०२६ ने.ता. २४.०४.२०२६

**अर्जदार :**
१. रमेश नामदेवराव खांडेकर, वय ५७ धंदा - मजुरी
रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. लक्ष्मण नामदेवराव खांडेकर, वय ५० धंदा - मजुरी
रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. सुलोचना दिलीपराव पोहनकर, वय ५३ धंदा - घरकाम
रा.हिवरखेड, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक नामदेवराव सूर्यभान खांडेकर** यांचा मृत्यू दिनांक **२४.०७.२०१९** रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक देवकी नामदेव खांडेकर** हिचा दि.**२८.०१.२०२१** रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१३६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१३.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

# जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र. १३२/२०२६ ने.ता. २१.०४.२०२६

**अर्जदार :**
१. प्रदीप भाऊराव पाथरे, वय ५८ धंदा - शेती
रा.जवळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. प्रतिभा गणेश ठाकरे, वय ६५ धंदा - घरकाम
रा.नया अकोला, ता.जि.अमरावती
३. पद्मा अशोकराव मोहोड, वय ६१ धंदा - घरकाम
रा.कारंजा बहीरम, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
४. सविता भगवंतराव वानखडे, वय ५५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.यावली शहीद, ता.जि.अमरावती
५. छाया देवेंद्र कोवळे, वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.खंबीत, ता.आष्टी, जि.वर्धा

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक भाऊराव विश्वेश्वरराव पाथरे** यांचा मृत्यू दिनांक **०३.०८.२००६** रोजी रा.जवळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१३२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२४.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

# विदर्भातील शाळा उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ३०जुनला सुरु करा

## प्राथमिक शिक्षक समितीचे शिक्षण संचालकांना निवेदन


**अमरावती/क्रा.प्र.**
उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि. ८ जून २००७ रोजी आदेश निर्गत केल्यानंतर दरवर्षी विदर्भातील २६ जून पासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. मा. न्यायालयाचा निर्णय अजूनही कायम असून त्याबाबत घेतलेले शासन निर्णय अजूनही अधिक्रमित झालेले नाही.मात्र दि.२८ मार्च रोजी शिक्षण संचालनालयाने विदर्भातील शाळा सुद्धा १५ जून पासून सुरू करण्याचे आदेश निर्गत केले आहे. जून महिन्यात सुद्धा विदर्भात उन्हाच्या तीव्र झळा असतात व असह्य उकाडा असतो. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशास अनुसरून विदर्भातील शाळा सुरू करण्याचे बाबतीत पुनर्विचार व्हावा.याबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ने शिक्षण संचालनालयाकडे पत्र पाठविले आहे. तसेच सदर पत्राच्या प्रती मंत्री, राज्य मंत्री (शालेय शिक्षण), प्रधान सचिव (शालेय शिक्षण),राज्य आयुक्त (शिक्षण), उपसचिव (शालेय शिक्षण) यांच्याकडे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी पाठविल्या आहेत.असे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावकर यांनी सांगीतले आहे. विदर्भातील उष्णतामान कमी झाले नसून उलट मागील काही वर्षात उष्णतामानात प्रचंड वाढ झाली आहे.या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून विदर्भातील शाळांचे शैक्षणिक वर्ष सुरु करण्याच्या बाबतीत न्यायालयाच्या आदेशाचे पालन कायम राहण्याच्या दृष्टीने आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून याबाबतचा अलीकडील शासन निर्णय दि. २० एप्रिल २०२३ नुसार दरवर्षी दि. ३० जून पासून सुरु करण्याचा उल्लेख लक्षात घेऊन २०२६-२०२७ मध्ये विदर्भातील शाळा दि. ३० जून २०२७ रोजी सुरु करण्याचे पत्र निर्गत करावे अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून मागणी आहे. शिक्षकांच्या सुट्टीबाबत- दि. १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत दशवार्षिक जनगणनेचा पहिला टप्पा सुरु होत आहे. त्यासाठी जवळपास सर्वच प्राथमिक शिक्षकांना नियुक्त केले जात आहे. त्यामुळे मे-जून महिन्याच्या दीर्घ सुटीपासून शिक्षक वंचित राहणार आहे.दुसरीकडे शिक्षक दीर्घ सुटी उपभोगत असल्याने ग्रीष्मकालीन सुटी कालावधीत शिक्षकांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय केला जात नाही. शिक्षकांच्या दीर्घ सुट्टया बंद करून शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांप्रमाणे तरतुदी केल्यास दर शनिवारच्या ५२ साप्ताहिक सुटीसह, ३० दिवसाच्या अर्जित रजा, रजा रोखीकरण व कर्तव्यकाळाचा वाहतूक भत्ता मिळेल. मात्र असे होत नाही. अन्य कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या सुविधा शिक्षकांना नाकारल्या जातात आणि उलट ग्रीष्मकालीन सुटी सुद्धा कमी केली जात आहे.विदर्भातील उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन न्यायालयाने दिलेले आदेश व त्यासाठी निर्गत शासन निर्णय /परिपत्रक कायम ठेवून २०२६-२०२७ चे शैक्षणिक वर्ष विदर्भासाठी दि. ३० जून २०२७ पासून सुरु करण्यात यावे. तसेच भविष्यातही यात बदल होऊ नये अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शासनाला विनंती केली आहे.



## संक्षिप्त

### २ एप्रिलला राजेंद्र जोशी आकाशवाणीवर

**वलगाव**-येथील प्रयोगशील शेतकरी राजेंद्र नारायण जोशी यांची 'आधुनिक तंत्रज्ञान आणि आजची शेती' या विषयावर २ एप्रिलला सकाळी १०. ०० वाजता अमरावती आकाशवाणीच्या विविधा सदरा अंतर्गत ग्रामविकास व शेत शिवार या कार्यक्रमात मुलाखात प्रसारित होणार आहे. या कार्यक्रमाचे सादरकर्ते भैयालाल टेकाम असून, उदघोषिका प्रिया इंगोले यांनी राजेंद्र जोशी यांच्याशी संवाद साधला आहे. नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीत नवनवीन प्रयोग करून विक्रमी पीक घेणे, व शेतीचा पोतही कायम कसा ठेवला. याविषयी माहिती शेतकरी बंधूंना यातून निश्चितपणे मिळेल. तेव्हा या कार्यक्रमाचा आस्वाद रसिकांनी आकाशवाणीच्या एफएम बँड १०१. ५ वर किंवा न्यूज ओन एयर या ॲपच्या माध्यमातून घ्यावा असे आवाहन अखिल भारतीय रेडिओ महासंघाचे वतीने सचिव संजय वाघुळे यांनी केले आहे.





### गुणवत्ता विद्यार्थ्यांचा सत्कार उत्साहात

**टाकरखेडा संभू**-श्रीरामनवमी उत्सवानिमित्त श्रीराम मंदिर संस्थानच्या वतीने गावातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा तसेच पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याबद्दल पत्रकार संतोष शेंडे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन त्यांचा पालकांसह सन्मान करण्यात आला. यामध्ये समृद्धी देवानंद यावले (दहावी – ८७%), श्रेष्ठा सुनील शेबे (दहावी – ८४%), अक्षदा अनिरुद्ध तराळे (दहावी – ७८%), मानसी खांडेकर (बारावी – ६४%), साहिल सुरेश राठोड (बारावी – ६७%) आणि भावना तंतरपाडे (बारावी – ७०%) या विद्यार्थ्यांचा समावेश होता.कार्यक्रमादरम्यान संस्थानचे विश्वस्त यांच्यासह इतर विश्वस्त, गावकरी व रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.दरवर्षीप्रमाणे यावर्षीही हा उपक्रम उत्साहात पार पडला असून, यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## तालुक्याला वादळासह पावसाचा तडाखा

# झाडांची फांदी पडून एकाचा मृत्यू, तर एका घराचे छत उडाले

**चांदूरबाजार/वार्ताहर**
३० मार्चला रात्री अचानक वादळी वाऱ्यासह पावसाने तालुक्याला सर्वदूर जबरदस्त तडाखा दिला.या अवकाळी पावसात पाऊस कमी,पण चक्रीवादळा सारखे सुसाट वेगाने वादळ झाले.त्यामुळे पावसा पेक्षा वादळीवाऱ्याचाच तालुक्याला फटका बसला आहे. या वादळी पावसामुळे,झाडांची फांदी अंगावर पडून एकाचा मृत्यू झाला.तर एका घराचे छत वादळात उडून गेले.

तसेच चांदूरबाजार-परतवाडा मार्गावर एक मोठे, निंबाचे झाड पडल्याने काही काळ हा मार्ग बंद पडला होता.

या चक्रीवादळा मुळे शहरापासून ६ किलोमीटर अंतरावरील, खराळा येथील शेतकरी जावेद अली मिर अली कहार ( वय ५५) यांचा झाडांची फांदी पडून मृत्यू झाला. सदर इसम चांदूरबाजार वरून मोटरसायकल ने खराळा येथे जात असतांना, खराळा गावा जवळच वादळामुळे झाडांची फांदी तुटुन त्यांचे अंगावर पडली. यात त्यांना गंभीर इजा झाली.गावकर्यांनी त्यांना उपचारासाठी शहरात आणत असतांना, वाटेतच त्यांचे निधन झाले.या सुसाट वादळामुळे चांदूरबाजार शहरात,दोन ठिकाणी विद्युत तारा ही तुटल्या.तालुका कृषी विभागाकडून प्राप्त माहितीनुसार या वादळी पावसामुळे, तालुक्यात अंदाजे २२७.७० हेक्टर क्षेत्रावरी पिकांचे अंशतः नुकसान झाले आहे.



सहायक कृषी अधिकाऱ्यांनी दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार तालुक्यात, २२७.७० हेक्टर क्षेत्राला वादळी पावसाचा फटका बसला आहे.यात गहू,कांदा, भाजीपाला व संत्रा पिकांचे अंशतः नुकसान झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

**प्रवीण मोहोड,**
प्रभारी तालुका कृषी अधिकारी

तालुक्यात झालेल्या वादळी पावसामुळे रब्बी पिकांचे अंशतः नुकसान झाल्याची, प्राथमिक माहिती ग्राम महसूल अधिकारी यांचे कडून प्राप्त झाली.प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना, ग्राम महसूल अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**सोनल सुर्यवंशी,**
तहसीलदार चांदूरबाजार.

यामध्ये ४७ हेक्टर गहू,४० हेक्टर कांदा,७.१० हेक्टर भाजीपाला व १३३.६० हेक्टर संत्रा पिकाचा समावेश आहे.

### श्रीराम प्राथमिक शाळेत रमजान ईद उत्साहात



**टाकरखेडा संभू**-येथील श्रीराम प्राथमिक शाळेत रमजान ईदचा सण मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांना ईदनिमित्त मिठाई वाटप करण्यात आले. यावेळी शिक्षक अतुल खांदे यांनी रमजान महिन्याचे महत्त्व व ईद-उल-फित्रच्या परंपरेविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांसह उपस्थित पालकांनाही मिठाईचे पॅकेट वितरित करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक प्रवीण पाटील, शिक्षक अतुल खांदे, प्रमोद विघे, प्रशांत देशमुख, रेखा खटाळे, अश्विनी दिंडीलकर,गौरी जुनघरे, पद्मासवाई तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना ईदनिमित्त शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मांजरी-सावनेर रस्ता खड्ड्यांनी पोखरला

**अंजनगाव बारी/वार्ताहर**
नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मांजरी ते सावनेर हा ५ किलोमीटरचा महत्त्वाचा मार्ग पूर्णतः जीर्णावस्थेत असून नागरिक, शेतकरी व वाहनधारकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. रस्त्याची चाळण झाल्याने अरुंद मार्गावर ठिकठिकाणी गिट्टी बाहेर येऊन रस्ता धोकादायक झाला आहे. बारीक खोल खड्डे पडले आहेत. धुळीचे प्रचंड प्रमाण, उखडलेला टार, वाहने घसरून अपघातांची शक्यता यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

स्थानिकांनी सांगितले की, हा रस्ता गाव ते मुख्य बाजारपेठ, देवस्थान, शाळा, दवाखाना तसेच शेतमाल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र दीर्घकाळ रस्ता दुरुस्तीला निधी न मिळाल्याने परिस्थिती बिकट होत चालली आहे. रस्त्यालगत लावलेले दोन भूमिपूजन फलक देखील परिसरातील दुर्लक्ष अधोरेखित करत आहेत. रस्त्याचे काम मंजूर झाल्याचा उल्लेख असला तरी प्रत्यक्षात काम अद्याप सुरू झालेले नाही, अशी स्थानिकांची तक्रार आहे. नागरिकांच्या मतानुसार 'दररोज धुळीतून प्रवास करावा लागतो. मोटारसायकल घसरून अनेक अपघात झाले.'रस्ता इतका अरुंद व खड्ड्यांनी भरलेला की चारचाकी वाहने चालवणे धोकादायक झाले.'याबाबत नागरिकांनी संबंधित विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच लोकप्रतिनिधी यांनी त्वरित लक्ष घालून पक्के डांबरीकरण करावे, अशी जोरदार मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे.



# जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

## युवक-युवती व संस्थांकडून ८ एप्रिलपर्यंत अर्ज आमंत्रित

**अमरावती**-महाराष्ट्र राज्य युवा धोरणानुसार सन २०२५-२६ या वर्षाकरिता जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी पात्र युवक-युवती व संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. समाजाच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने हे पुरस्कार दिले जाणार असून, इच्छुक उमेदवारांनी ८ एप्रिल २०२६ पर्यंत आपले प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे. या पुरस्काराचे स्वरूप युवक व युवतींसाठी प्रत्येकी १० हजार रुपये रोख, गौरव पत्र आणि सन्मानचिन्ह, तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या एका नोंदणीकृत संस्थेसाठी ५० हजार रुपये रोख, गौरव पत्र आणि सन्मानचिन्ह असे आहे. पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या युवक-युवतींचे वय १ एप्रिल रोजी १५ वर्षे पूर्ण तसेच ३१ मार्च रोजी २९ वर्ष पर्यंत असावे. जिल्ह्यात सलग पाच वर्षांचे वास्तव्य असणे अनिवार्य आहे. तसेच संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम किंवा मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्टनुसार नोंदणीकृत असावी आणि ती किमान पाच वर्षे कार्यरत असावी. अर्जदारांनी आपल्या मागील तीन वर्षांतील कार्याचे पुरावे जसे की, वृत्तपत्रीय कात्रणे, प्रशस्तीपत्रे, फोटो व व्हिडिओ इत्यादी अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर पुढील किमान दोन वर्षे सक्रिय राहण्याचे हमीपत्रही उमेदवारांना द्यावे लागणार आहे. शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी, विद्यापीठातील प्राध्यापक व कर्मचारी या पुरस्कारासाठी पात्र ठरणार नाहीत. अधिक माहिती व अर्जासाठी जिल्हा क्रीडा संकुल, मार्डी रोड, तपोवन गेटजवळ, अमरावती येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

## सुबोधकुमार देशमुख यांचे निधन



**नांदगाव पेठ**-जैन समाजातील प्रतिष्ठित नागरिक व येथील नामांकित व्यावसायिक सुबोधकुमार रतनसा देशमुख यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे जैन समाजासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.सुबोधकुमार देशमुख यांनी आपल्या आयुष्यात शेतकरी ते यशस्वी व्यावसायिक असा प्रेरणादायी प्रवास केला.त्यांच्या पश्चात पत्नी मुलगी, मुलगा, सून, जावई नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर स्थानिक मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिकांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनामुळे कुटुंबियांसह जैन समाजावर शोककळा पसरली आहे.

## पी.आर.पोटे पाटील अभियांत्रीकीच्या विद्यार्थ्यांना

# सीओईपीच्या भाऊ फौंडेशनमध्ये सर्वोत्तम पारितोषिके

**अमरावती/क्रा.प्र.**
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे (सीओईपी) येथे भाऊ फौंडेशनच्यावतीने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील इग्रेटर इनव्होटर ऑफ इंडिया या स्पर्धेत स्थानिक पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील विविध विभागातील विधार्थ्यांनी एक प्रथम, एक सर्वोत्तम आणि एक इनोव्हेटिव्हमध्ये सर्वोत्तम पारितोषीक असे सर्व मिळून ३ पारितोषिके पटकावून सुयश प्राप्त केले.



पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, टेकनॉलॉजिकल विद्यापीठ, पुणे याचे भाऊ फाऊंडेशनच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. हि प्रोजेक्ट स्पर्धा एकून ५ स्तरांमधून होत असते, प्रत्येक स्तरातील प्रत्येक फेरी एलिमिनेशन फेरी होती यामध्ये संपूर्ण भारतातून अनेक अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी आपल्या नवनवीन संकल्पना आणि प्रतिकृती मधून मांडत असतात. ही स्पर्धा सीओईपीच्या भाऊ फौंडेशनमध्ये आयोजित करण्यात आली असता पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयातील एकूण ०५ चमूंनी भारतातील टॉप ३० संकल्पना मध्ये सहभाग नोंदविला होता. ज्यामध्ये १) स्मार्ट योगामॅट फॉर प्रॉपर योगसाधना २) नवजात बालकांच्या लसीकरणासाठी वेळेवर स्मरणपत्रांसह डिजिटल केअरचा प्रभावी वापर ३) पाथफाइंडर: अभियांत्रिकी संधींचे भाकीत ४) कोशफिन (योजना आणि गृह वित्त विषयक ज्ञान): भारताच्या सूक्ष्म अर्थव्यवस्थेला सक्षम करणे ५) फ्लोट अँड फ्लो : ग्रीन एनर्जी ग्रिड यांचा समावेश होता. या सर्वामधून महाविद्यालयाने सर्व सेक्टरमधून एकूण ३ पारीतोषिक प्राप्त केली. दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम म्हणून एन्ट्रप्रेनर सेक्टर मध्ये आदित्य सदाफळे आणि मनस्वी वानखडे, इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी यांनी पारितोषिक मिळवले व इनोव्हेटिव्ह कॉन्सेप्ट बाय इंनोवेटर कॉलेज म्हणून पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती यांना संपूर्ण महाराष्ट्रातून सर्वोत्तम कामगिरी करणारे महाविद्यालय म्हणून गौरवण्यात आले. सर्व ६ क्षेत्रांमधील सर्वोत्कृष्ट सर्वांगीण प्रकल्प म्हणून एचएचएच सेक्टरमध्ये वेदांत जांभळीकर, विशाल जांभेकर, ललित भाडे, यश साखरकर यांनी संगणक अभियांत्रिकी (एआयएमल) चमूला पारितोषिक मिळाले.या संपूर्ण ५ फेझोस करिता महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रभारी म्हणून प्रा. अक्षय प्र. पुंडकर यांनी सतत मार्गदर्शन आणि परिश्रम घेतले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील, उपाध्यक्ष श्रेयश पोटे पाटील, संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मोहम्मद झुहेर, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. एस. के. नंदा, त्याप्रमाणे सर्व विभाग प्रमुख, डीन्स, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर व अधिकारी व कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या.

# हवामान अनुकूल शेतीसाठी जिल्ह्यांत 'डिजिटल शेतीशाळा'

## आजपासून तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना शास्त्रोक्त मार्गदर्शन

**अमरावती/को.प्र.**
हवामानातील वाढती अनिश्चितता, पावसाचा खंड आणि नैसर्गिक आपत्तींमुळे पारंपारिक कोरडवाहू शेती संकटात सापडली असून उत्पादन खर्च वाढत आहे. यावर मात करण्यासाठी कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत महाराष्ट्र राज्याकरिता 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान' डिजीटल शेतीशाळा सुरू केली आहे. हे अभियान शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची हमी देणे या उद्देशाने राबविण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी कृषी विभागाबरोबरच, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, उमेद, माविम, पशुसंवर्धन विभाग इ. यंत्रणादेखील सहभागी होत आहेत. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पानी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल २०२६ महिन्यात चार विशेष डिजिटल शेती शाळा' आयोजित करण्यात येत आहेत. शेतकरी, महिला गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्य, कृषी मंडळे, बिजोत्पादक, फार्मर कप स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणारे निमंत्रक व शेतकरी गट, वनपट्टे धारक या सर्वांनी मोठ्या संख्येने डिजिटल शेती शाळांना जॉईन व्हावे, असे आवाहन कृषी विभाग आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत प्रसिध्दी पत्रकाव्दारे करण्यात येत आहे.सर्व शेतीशाळा वर नमूद तारखांना सायंकाळी ७.३० वाजता सुरु होणार असून या शेती शाळांचे लाइव्ह प्रसारण कृषी विभाग, कृषी संजीवनी प्रकल्प, पानी फाउंडेशन उमेदच्या युट्यूब चॅनेलवर केले जाणार आहे.

**डिजिटल शेतीशाळांचे वेळापत्रक**
शेतीशाळा (१ एप्रिल २०२६) पेरणीपूर्व तंत्रज्ञान - बेड तयार करणे व बेडवर टोकण करणे, शून्य/कमीत कमी मशागत करणे, आंतरपीक पद्धत, बियाणे उगवण क्षमता तपासणी आणि बीजप्रक्रिया. शेतीशाळा (८ एप्रिल २०२६): जैविक व नैसर्गिक निविष्ठा उत्पादन- बीजामृत, जीवामृत, लिंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, ट्रायकोडर्मा तयार करण्याच्या पद्धती व फायदे शेतीशाळा (१५ एप्रिल २०२६): एकात्मिक कीड व्यवस्थापन- सापळा पिके, पक्षी थांबे, चिकट सापळे, मित्र किटकांचे संवर्धन, लिंबोळी आणि दशपर्णी अर्काचा वापर शेतीशाळा (२२ एप्रिल २०२६) : भात शेतीसाठी सुधारित लागवड तंत्र- भाताची थेट पेरणी श्री पद्धत आणि भात लावणीसाठी यांत्रिकी पद्धत

